

# कृषितीर्थ

फेब्रुवारी २०२२ • वर्ष ४ • अंक २ • जळगाव • पृष्ठे ६० • मूल्य ₹१०



दादाजींच्या सहवासात, उमलती फुले,
अनुभवाच्या चार गोष्टींनी, भविष्याचा मार्ग खुले!



"निसर्ग म्हटला म्हणजे त्यात सुंदरता आहे, अलंकार आहेत, लावण्य आहे; पण त्याबरोबरच नागमोडी पायवाट आहे, दगड-धोंडे आहेत, खळखळणारे झरे आहेत. काटेसुद्धा आहेत, दु:ख आहे, वेदना आहे, व्यथा आहे, कथा आहे." – भवरलाल जैन

# कामातूनच जगणे सुंदर, निर्भय व निस्वार्थ होईल!



अशोक जैन
अध्यक्ष, जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.

## अध्यक्षीय

**जैन इरिगेशनचे संस्थापक आणि आमचे परमपूज्य पिताजी कै. भवरलालजी जैन उर्फ मोठे भाऊ यांची २५ फेब्रुवारीला सहावी पुण्यतिथी आहे. आयुष्यभर त्यांनी शेती आणि शेतकऱ्यांची सेवा हेच आपले जीवीतकार्य मानून कष्टाची उपासना केली. नवनिर्माणाचा प्रयत्न केला. उपासनेत भावनिकता महत्त्वाची मानली. संकल्प आणि चिंतन यांचा मिलाफ म्हणजे उपासना. शेतकऱ्यांचे कल्याण व प्रगती हाच शेवटपर्यंत त्यांच्या चिंतनाचा विषय होता. कोणतेही काम त्यांनी कधी कमीपणाचे मानले नाही. गुणवत्तेच्या कामात कधी तडजोड केली नाही. काम उत्कृष्टच व्हायला पाहिजे यासाठी ते कायम आग्रही राहिले व नवेनवे संशोधनही करीत राहिले. कामावरच्या भक्तीतूनच त्यांची ही गुणवत्तेची उपासना वाढीला लागली होती. उपासनेत मन, अभ्यास, स्फुरण, प्रयत्न या चांगल्या बाबींचा अंतर्भाव होतो. त्यामुळे नवनवीन स्फुरणे निर्माण होतात. उपासना ही पंचमहाभूतांच्या माध्यमातून झाली तर ती माणसाला दीर्घायुष्य देते. म्हणून कामाला, कष्टाला कधी कमी लेखू नका आणि हाती घेतलेले काम गुणवत्तेचेच करीन असा निर्धार करा. भाऊंच्या शब्दात सांगायचे तर याचाही अनुभव घ्या.**

चांगल्या कामाचा भाऊंना अखंड ध्यास होता. काम चोखच केले पाहिजे याबाबत ते आग्रही होते. असे काम झाले तरच आत्मानंद लाभतो. यातून सामर्थ्य मिळते. पावित्र्य कळते. हे अनंततत्वाचे तत्व होय असे ते मानीत. प्रत्येक जिवाला त्याच्या जन्मापासूनच सांगितले पाहिजे, 'तू शुद्ध आत्मतत्व आहेस. तुझी भावना निर्मल आहे. म्हणून तू शक्तिशाली आहेस' हे भान ठेवले की आपल्यातला मोठेपणा नकळत जागा होतो. म्हणून चांगले काम शोधा. ते प्राप्त करून घ्या. हीच शुभ वेळ आहे. काम निर्माण केले की, सर्व गोष्टी अनुकूल होतात. त्यासाठी धीट व्हावे लागते. निर्भयता हो कोणत्याही कर्माचे बलस्थान आहे. आपल्या देशात असे मोठे कर्मयोगी निर्माण झाले पाहिजेत ही भाऊंची आंतरिक इच्छा होती म्हणून लहानपणापासून म्हणजे शाळकरी मुलांवरच ते या विचारांचा संस्कार करण्याचा प्रयत्न करित होते. तरुणच हे करू शकतात असा त्यांचा आशावाद होता. म्हणून उत्कृष्ट कामासाठी उत्साही तरुणांची फळी निर्माण करून ती मजबुतीने उभी करण्याचा त्यांनी सदोदित प्रयत्न केला. भाऊ नेहमी म्हणायचे, 'माणूस पैसा निर्माण करतो ना? परंतु पैशांनी माणसे निर्माण झाल्याचे कधी कोणी कोठे ऐकले आहे काय?'यासाठी मन आणि मुख एक व्हायला हवेत. आपल्या कामात आपण बोलल्यासारखे वागू शकलो, तर पैसा तुमच्या पायाशी पाण्यासारखा वाहत येईल. पुढे काय होणार असे जे कर्मात विचार करतात त्यांच्या हातून काहीही होत नाही. वर्तमानात आपल्यासमोर जे आहे ते तत्काळ कृतीत उतरले पाहिजे. पुढे काय, याचे करायचे काय? दो घडीचे जीवन. त्यात जर नफा-तोट्याचा हिशेब करित बसलो, तर काहीही साधता येत नाही.

भाऊ नेहमी म्हणायचे, “आज आपल्या देशाला खरी व महत्त्वाची गरज आहे ती निष्काम कर्मयोग्यांच्या मांदियाळीची, लोखंडी स्नायूंची आणि पोलादी मज्जातंतूची. दुर्दम्य इच्छाशक्तीची आज वानवा आहे. जरूर पडल्यास तरूणांची फळी तयार करायला मला आवडेल.” त्याप्रमाणे ते काम करीत गेले. प्रत्येकाच्या गुणांचा व आवडीचा अभ्यास करून त्या कामात त्यांनी तरूणांना गुंतविले. महासागराच्या तळाशी झेप घेण्याची इच्छा असणारे तरूण त्यांना खूप आवडत. आपण करीत असलेल्या प्रत्येक कामातून, उपनिषदांचा आवाज मला ऐकू येतो असे स्वामी विवेकानंद म्हणायचे. त्यांच्या या विधानावर मोठ्या भाऊंची नितांत श्रद्धा होती. त्यामुळे त्यांनी काम हाच आयुष्यभर परमेश्वर मानला. काम हाच जगण्यातला मोठा उपदेश आहे. असे ग्राहय् मानून अनेक जन्मीची कामे त्यांनी एकाच जन्मात करून टाकली. आज अनेकांना नवल वाटते की एका जन्मात भाऊंनी एवढी सर्व मोठी कामे कशी केली असतील? हा अनेकांच्या कुतूहल व अचंबित करणारा विषय आहे. यांचे अचूक व समर्पक उत्तर देणे मला देखील शक्य नाही. पण मी एवढेच सांगू शकेन. त्यांना कामाबद्दलची जशी आस्था होती, तशी ज्ञानाबद्दल निष्ठा होती. या दोन बाबी एकत्र आल्या की, संदेह पळतो. मनामध्ये बारीकशीही शंका उरत नाही. याचे काय, त्याचे काय असले कुविचार मनात येत नाहीत. मन कामाने ओथंबते. कोणीही आपल्याला रोधू शकत नाही. श्रद्धायुक्त मनाने काम करीत गेलो की, आत्मविश्वासातून नवे समाधान मिळते. असे काम ही जनताजनार्दनाची पूजा आहे, असे मानून जर आपण काम करीत राहिलो तर आपले जगणे सुंदर होईल. जेवढे शक्य असेल तेवढे समाजासाठी चांगले करीत जावे. दोन प्रेमाचे शब्द महत्वाचे असतात. ते देण्यात कुचराई करू नका. त्यामुळे कठीण काम सोपे होते. थकवा नाहीसा होतो. कामाविषयी प्रेम वाटते. आपण आपल्या कामामुळे जगाला ज्ञात होतो. आपल्या कामातून मिळणारा हा ज्ञानप्रकाश ही राष्ट्राची संपत्ती आहे. तो प्रकाश आपल्याकडे उत्सुकतेने पाहत आहे. या प्रकाशात विश्व प्रकाशित होणार आहे. म्हणून मोठे भाऊ म्हणायचे त्या प्रमाणे चांगल्या कार्यासाठी तुमचा जन्म आहे. दुसऱ्याच्या बोलण्याने थांबू नका. आकाशातून वज्रपात झाला तरी घाबरू नका. तुमचे काम तुम्हाला ताकद देईल. चांगल्या कर्मातून समृद्ध व्हा! निस्वार्थी व्हा! निर्भय व्हा!

# भवरलालजी : जैन गुरुकुलाचे गुरु



डॉ. सुधीर भोंगळे
संपादक

## संपादकीय

**गुरू आणि शिष्य दोघेही एकमेकांच्या आचरणातून शिकतात. दोघे आजन्म विद्यार्थी असतात. जे दिले जात नाही तेच शिक्षण असते. जे घेतले असताना व्यक्तित्व उमलते ते शिक्षण असते. म्हणून गुरूकुलाची मोजदाद करता येत नाही. जीवनातून शिक्षण घ्यायचे असते. गुरूकुलातील शिक्षकाला वेदात 'गातुवित' म्हणजे मार्ग शोधून काढणारा (पाथ-फाइन्डर) म्हटले आहे. गुरू हा समर्थ मार्गदर्शक आहे. तो शिष्याला ज्ञानरूपाने नव्या जन्माला घालतो. त्याला 'शाचिष्ठ' म्हणजे 'शक्तिशाली' म्हटले आहे. तो नुसता ज्ञानात प्रवीण नको. त्याला 'सृष्टीज्ञान''अवगत पाहिजे. जीवनात विविध अनुभवांना समर्थ मनाने जाणारी जी विवेकनिष्ठ जाणीव असते तिला गुरूकुलातले शिक्षण म्हणतात आणि गुरूकुलातल्या शिक्षकाला 'आचार्य' म्हणतात. आचार्य म्हणजे आचार संपन्न. स्वत: आदर्श जीवन जगून ते आचरवून घेणार तो आचार्य. सर्व शास्त्रांचे ज्ञान मिळवून जो आपल्या विद्यार्थ्यांना देतो आणि त्या ज्ञानाला अनुसरून जो स्वत:चे वर्तन करतो तोच गृहस्थ आचार्य या पदवीला प्राप्त ठरतो.अशा आचार्यांनी राष्ट्र निर्माण केले. भवरलाल जैन ऊर्फ मोठे भाऊ हे अशा आचार्यांपैकी एक होते ही आमच्यासाठी केवढी अभिमानाची गोष्ट आहे.**



शिक्षणात मनाच्या विविध शक्तींची जोपासना आहे. समाज कार्यशील व विनयशील होण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे. वेदात शिक्षण पूर्ण झाल्यावर विद्यार्थी म्हणतो, 'चारही दिशा माझ्यासमोर नम्र होवोत.' स्वाध्यायातून आणि प्रवचनातून श्रवणाची आणि संवादाची परंपरा भारतीय मनात अखंड राहिली. आचार्य विनोबा भावे यांच्या मते एक महत्वाचे सूत्र गुरुकुल शिक्षण पद्धतीत होते, आणि ते म्हणजे "पुस्तकात शब्द असतात, अर्थ सृष्टीत असतो." हे जेव्हा कळेल तेव्हा पुनरुत्थान समरसता गुरुकुलचा अर्थ कळेल. केवळ शब्द घोकण्यात जर बुद्धी राहिली, तर ती अर्थहीन होते. त्यासाठी गुरुकुल पद्धती महत्वाची आहे. हे अचूक व चाणाक्ष बुद्धीच्या भवरलालजी जैन उर्फ मोठेभाऊ यांनी वेळीच ओळखून १५ वर्षांपूर्वी जळगावात गुरुकुल पद्धतीच्या शिक्षणाशी साधर्म्य साधणारी 'अनुभूती' नावाची शाळा सुरु केली. या शाळेत ते स्वतः नित्यनेमाने जाऊन लहान मुलांमध्ये लहानगे होऊन जात असत. लहान मुलांशी समरस होऊन त्यांच्यातलेच होऊन राहणे ही तितकीशी सहजसोपी गोष्ट नाही.

शाळा सुरु झाल्यानंतर सुरुवातीच्या काळात मी अनेकदा त्यांच्याबरोबर जाऊन ते लहान मुलांशी कसा संवाद साधतात, ममत्व कसे निर्माण करतात हे कुतूहलाने मागे लांब बसून पाहात असे. आज जेव्हा त्यांचे बोलणे, लहानांशी मिसळून समरस होणे हे आठवते आणि तटस्थपणे विचार करु लागतो तेव्हा एक गोष्ट प्राधान्याने माझ्या लक्षात येते ती म्हणजे मोठेभाऊ हे खरे आत्मज्ञानी आणि अध्यात्म जाणणारे होते. उपनिषदकारांनी सांगितलेल्या अध्यात्माच्या पायऱ्या त्यांनी स्वतःच्या जीवनात तंतोतंत उतरविल्या होत्या. त्यातली पहिली पायरी श्रवण ही आहे. भाऊ लहानांशीच काय पण मोठ्यांशी देखील जे बोलायचे ते सारे


श्रवणीय असायचे आणि मुख्य म्हणजे अतिशय हलक्या आवाजात व प्रेमळ भावाने ते सांगत. ज्याला श्रवणातला कान आहे त्याला ते बरोबर ऐकू येत असे. सतत बरोबर राहिलो आणि मागे पुढे करीत राहण्याने सहवास घडतोच असे नाही. त्यासाठी त्यांनी लिहिलेले ग्रंथ वाचणे, श्रवण करणे आवश्यक ठरते.

श्रवण म्हणचे केवळ ऐकणे नव्हे. कानांना श्रुती करणे. श्रुतयुक्त ऐकण्याची वा चांगले ऐकण्याची सवय लावणे. कान कायम उघडे असले तरी कानांनी कायम आपण ऐकतोच असे नाही. माणूस तर फार मजेशीर प्राणी आहे. तो आपल्याला सोयीचे असेल ते ऐकतो. गैरसोयीचे असेल ते सोडून देतो. कधी कधी सोडून देण्यात महत्वाचे श्रवण असते. ते त्याच्या हिताचे असते हे त्याच्या लक्षातच येत नाही. यासाठी सारी इंद्रिये सतत सावधान ठेवावी लागतात. त्याकरिता श्रद्धा व सबुरी लागते. सोशिकता श्रवणातली आंतरिक सुक्ष्मता वाढविते. ऐकताना अनुभव होऊन जाण्यात श्रवणाचे खरे गुह्य असते. फार मोजक्या लोकांना भाऊंच्या बोलण्याचा हा अनुभव आलेला असेल. फार थोड्या लोकांना 'नीट' ऐकणे जमते. बहुतांश माणसे घोड्यावरच स्वार असतात. आपल्यातच रममाण झालेली असतात. कुणाचे ऐकण्याच्या मनस्थितीत ती नसतात पण दुसऱ्यांना ऐकविण्याच्या खटपटीत असतात. ऐकविण्यासारखे स्वतःपाशी काही मुळात असावे लागते. असंख्य अज्ञानी जीवांना आपण महाज्ञानी आहोत असे वाटते. ते त्याच भ्रमात विराजमान होतात. त्यातून त्यांचे आवाज कर्कश होतात. ज्याच्यापाशी अस्सल आतला आवाज असतो ते ओरडून माणसे गोळा करीत नाहीत. मृदू, मोजके व कोंदणातले शब्द भाऊंच्या मुखातून बाहेर पडत. मेहनत व अनुभवाच्या तालमीतून ते तावून सुलाखून निघालेले असल्यामुळे व मननाची धार असल्याने ते नेहमीच बोधप्रद व श्रवणीय राहिले.

मनन ही अध्यात्मातली दुसरी पायरी विज्ञानात महत्वाची आहे. भाऊंचे शेती-माती-प्रक्रिया उद्योग-पाणलोट विकास हे सगळे काम विज्ञानावरच आधारित होते. श्रवण केलेले मनात घेणे आणि त्याचा साधकबाधक विचार करुन आत्मस्वरुपाचा निश्चय करणे यास मनन म्हणतात. कोणतीही गोष्ट तडीला व परिपूर्णतेकडे नेण्यामध्ये मननाचा मोठा सहभाग असतो. मनन हा एक प्रकारे दृढनिश्चयच असतो. येणाऱ्या प्रत्येक संकटावर व समोर उभ्या राहणाऱ्या समस्येवर मात करण्याचा व त्याच्याशी लढण्याची उर्मी या मननातूनच प्राप्त होत असते. भवरलालजींनी एवढे प्रचंड दैदीप्यमान काम एका आयुष्यात उभे करताना किती प्रश्न व संकटांशी दोन हात केले असतील याची नुसती कल्पना केली तरी थक्क व्हायला होते. विशेष म्हणजे या सर्व प्रश्नांशी लढताना ते अविचल आणि हिमालयासारखे खंबीरपणे न डगमगता उभे राहिले. इथे मननाचे महत्व कळते. मननाने अधिकतम आपण आपल्याला तपासतो. आत्मज्ञान्यांच्या सानिध्यात



*अनुभूती निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना सौर ऊर्जेचे महत्त्व व विजेची निर्मिती कशी होते हे दादाजी प्रात्यक्षिकासह समजून सांगताना.*



# आकाशाशी मोकळा संवाद

निसर्ग आणि आकाश रोज आपल्याला काहीना काही नवे शिकवीत असतो. म्हणून भवरलालजी म्हणजे 'अनुभूती' स्कूलमधील मुलांचे दादाजी त्यांना आग्रहपूर्वक आठवड्यातून एकदा तरी डोंगरावर, खुल्या वातावरणात, निसर्गाच्या सानिध्यात घेऊन जात. प्रतिभावंतांनी आकाशात आपले आकाश निर्माण केले आहे. खगोलशास्त्रज्ञांनी आकाश निरीक्षणाच्या छंदातून आपल्याला व्यापक केले आहे. संकुचितपणा नाहीसा करुन आपण व्यापक होणे हे आकाश शिकविते. म्हणून भाऊंना आकाश प्रिय होते. जैन हिल्सच्या टॉवरवर खुर्ची टाकून बऱ्याचदा ते सूर्याची किरणे अंगावर घेत आकाशाचे निरीक्षण करीत. कामाचीही तजवीज लावीत आणि गप्पांची मैफलही झोडीत. भाऊ प्रतिभावंत असल्यामुळे आकाश त्यांच्याशी मनमोकळेपणाने बोलत असे. आकाशाकडून मिळालेला संदेश भाऊ मुलांपर्यंत पोहचवीत. या जगात कुणीही मोठा नाही आणि कुणीही छोटा नाही, हे समानतेचे तत्व भाऊंना आकाशाने शिकविले. आकाशाशी झालेला हा मोकळा संवाद त्यांनी मुलांच्या मनावर बिंबविला. मुले आकाशवेडी झाली आणि दादाजी कधी एकदा येऊन डोंगरावर घेऊन जाताहेत याची वाट पाहू लागली. हा आकाशाचा भाऊंनी केलेला उचित गौरव होता.

केलेले मनन अनुभवी करते. ते आत्मानात्मविवेक देते. मननाने विद्वत्ता वाढत नाही, तर विद्वत्तेला विनम्रतेची खोली लाभते. आपण समोरच्याशी कसे वागतोय यावर मनन नसते. समोरच्याचे खरे स्वरुप त्याला कितपत आकळतेय, तो त्याच्या मनाच्या डोहातल्या तळाचा कितपत वेध घेतोय यावर मनन असते. मननात मन असते. ते कळायला अभ्यास, श्रवण, परीक्षण, आकलन हे लागते. मन समजायला मन लागते.

पहाटे उठून चालायला गेले आणि जाता जाता कामांचा निपटारा केला की मोठेभाऊ एखाद्या जागी झाडाखाली, शिळेवर, खुर्ची टाकून डोळे मिटून शांत बसायचे. यावेळी ते संवादापेक्षा काही काळ मनन करीत. मनाचा आवाज ऐकू यायला लागला की आपण हलके होत जातो. निव्वळ जडभारी असून जमत नाही. बऱ्याचदा हे मनन झाले की नाश्त्याची चाहूल लागत असे. भुकेचा डोंब कसा व किती उसळला आहे यावर नाश्ता बसल्या जागी मागवायचा की घरी जाऊन करायचा याचा निर्णय होत असे. बसलेल्या जागी नाश्ता मागविला तर सभोवताली जमलेल्या सर्वांनाच नाश्ता मिळत असे. एक तीळ सात जणांनी मिळून खायचा हीच भाऊंची वृत्ती होती. वृत्तीमधली चंचलता उपयोगाची नसते याची त्यांना

पुरेपूर जाणीव होती. एकाग्रपणे इंद्रियांना लववून मनाचा खोल विचार करु लागलो की मननाचा आरंभ होतो. मन म्हणजे फक्त माणसापुरता विचार असे नाही. मनात सृष्टी, विश्व, कुतूहल, जिज्ञासा असे सगळे येते. स्वतःचे मन स्वतःला समजणे दुर्गम आहे. स्वतःचेच मन जिथे धड कळत नाही, तिथे दुसऱ्यांचे मन काय कळणार? पण भाऊ याला अपवाद होते. आधी मन कळावे, मग ते वळावे, नि नंतर सखोल चिंतनात रमावे हे फक्त ऋषी, मुनी, संत, गुरु यांना जे जमले ते जैन गुरुकुलाचे ऋषी असलेल्या भवरलालजींनाही बरोबर जमले. श्रवणाने आत्म्याची कल्पना येते. मननाने अनेक शंकाकुशंकांचे निराकरण होते. बुद्धी ज्ञानाबद्दल निश्चिंत होते. विज्ञानात विविध प्रयोग करायला मननाची गरज असते. शेती ही शेवटी ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचाच एक भाग आहे. त्याची कास धरल्याशिवाय शेती यशस्वी होणे अवघडच. भाऊंनी ते जाणले, बरोबर ओळखले आणि शेवटपर्यंत मननाची साथ सोडली नाही. त्यामुळे जगाच्या बाजारपेठेत ते स्वतःचा आणि जैन कंपनीचा नावलौकिक व सुगंध

## कर्मातच अखंड समरसता

सतत कोणत्या ना कोणत्या कामात व्यग्र असले तरी भाऊंचे नाविन्याचे चिंतन अखंड चालूच असे. अविरत कामामुळेच त्यांच्या विचारांना नवनवीन धुमारे फुटले. कर्मफलत्यागातून जीवनात परम शांतीची आनंदमयी अवस्था लाभण्यासाठी अंतरंगात स्फुरणारा कर्तृत्वाचा अहंकार शमला पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष होता. फलाच्या अभिलाषेने अंतरंगात उमटणारे संकल्प विरले, तरीही कर्तृत्वाचे स्फुरण शमेल असे नाही. फलाभिलाषा लोपल्यामुळे मनावरील कर्मप्रवृत्तीचे एक ओझे हलके झाले, तरीही फलनिरपेक्ष कार्य करीत असल्याची जाणीव मनात जागृत असेपर्यंत मनावरील कर्तेपणाचे ओझे नाहीसे होत नाही. मनातील फलाभिषेमुळे उफाळणारी प्रवृत्ती वा फलत्यागाच्या प्रेरणेमुळे उमटणारी निवृत्ती या दोन्हीही कर्तृत्व जागृत असल्याच्याच द्योतक आहेत. कर्मफलाचा त्याग करायचा ठरवून कर्म करणे म्हणजे कृत्रिमता जोपासणे! अशा लादून घेतलेल्या निवृत्तीतून कर्म परिपूर्णतेने घडूच शकत नाही. फलाची अभिलाषा व फलत्यागाची संकल्प- प्रवृत्ती आणि निवृत्ती ही दोन्हीही अंतरंगावरील दडपणेच आहेत. ही दोन्ही ओझी उतरली, तरच समरसतेने कर्म होऊ शकते. भाऊंचे हे मनोविश्लेषण किती सूक्ष्म आहे! त्याची कास धरीतच शेवटपर्यंत ते सहकाऱ्यांबरोबर या विचारानेच काम करीत राहिले.



*गिमी फरहाद व मोठेभाऊ शाळेतील विद्यार्थ्यांना अनुभवाचे बोधामृत देताना शेजारी डॉ. दोशी.*



# भाऊही गुंतले कृष्णप्रेमात

भगवान श्रीकृष्णावर भाऊंची अपार भक्ती व श्रद्धा होती. अनिवासी भारतीयांसमोर एकदा भाषण करताना भाऊ असे म्हणाले होते, "पृथ्वीच्या पाठीवर श्रीकृष्णासारखा लोकव्यवहारात इतका निष्णात मुत्सद्दी मी अजून पाहिला नाही. त्याचे तत्वज्ञान कृतिप्रधान आहे." या कृतीची सतत आठवण राहावी म्हणून स्वतःच्या कार्यालयासमोर भाऊंनी श्रीकृष्णाची अतिशय सुंदर व देखणी अशी संगमरवरी मूर्ती बसविली. तिची कलाकुसर सतत न्याहळतच बसावी अशी आहे. मीरा श्रीकृष्णाशी एकरुप झाली. तिच्या अंगभर प्रकाशच प्रकाश झाला. तिने आत्मज्ञानाशी रतिक्रिडेला आरंभ केला. तिला रंगच रंग अनुभवास आले. रंगातून निळे मोरपिस बासरीच्या टोकावर आले. ते तिच्या सात्विक रसयुक्त चेहऱ्यावरुन कृष्णाने फिरविले. ती रोमांचित झाली. स्वेद, अश्रू, कंप, अशब्द असे भाव निर्माण झाले. ती, ती उरलीच नाही. तीच बासरी होऊन श्रीकृष्णाच्या अधरावर कायम स्थिरावली. तिच्यातल्या प्रेमळ भक्तीने तिला कृष्णार्पण प्राप्त झाले. यातली तिची समर्पणशीलता फक्त तिलाच जमली. तिचे आरपार निखळ नितळपण घनकृष्ण झाले. असे आत्मज्ञान एखाद्या मीरेला, एखाद्या राधेला, एखाद्या कृष्णेला होते. 'मीरा कहे प्रभु गिरीधर नागर | चरन कमल बलबीर |' अशी भावावस्था झाली तरच आत्मदर्शन होते. भाऊंनी ते बरोबर ओळखले होते. म्हणूनच ते कृष्णप्रेमात गुंतले होते.

दरवळत ठेवू शकले. मननाने मन मोठे होते. ते अनेक मनांना जोडते. मन जोडण्याला जीवनात फार महत्व आहे. देवाचे असलेले मन असे भाऊंचेही होते हा दैवदुर्लभ योग मानला पाहिजे.

भाऊंच्या जीवनातील यशस्वीतेची निदिध्यास ही तिसरी पायरी आहे. मननाने माणसात आत्मविश्वास येतो. यातून तो आत्मविचारात गढतो. आत्मविचार म्हणजे आत्म्याबद्दलची सुक्ष्म जाणीव. आत्म्याच्या सतत चिंतनशील प्रक्रियेस निदिध्यास म्हणतात. सत्पुरुषांकडून श्रवण केलेले, सत्संगात श्रवण केलेले, किंवा सत्संगात सुसंवादातून घडलेले, स्वतःतल्या मननातून विचाराने निश्चित केलेले ज्ञान निदिध्यासात येते. ते जेव्हा प्रत्यक्ष जीवनात प्रकटते तेव्हा जगण्यातला जिवंतपणा चोहोबाजूंनी फुलतो. आत्मचिंतनातून आत्मज्ञान स्रवते. संत ज्ञानदेवांच्या शब्दात सांगायचे तर ते 'स्वसंवेद्य' होते. स्वतःच्या संवेदना अर्थपूर्ण आकळतात. मननातला 'स्व' हे सारे समजायला सहाय्य करतो. भवरलाल जैन यांनी २००१ मध्ये लिहिलेल्या 'आजची समाजरचना, तिचे स्वरूप व पुर्नबांधणी' या छोटेखानी पण मौल्यवान ग्रंथात आचार्य विनोबा भावे यांच्या विचारांचा एक परिच्छेद उद्घृत केला आहे. त्यात ते म्हणतात, "कीर्तनघोषात म्हटले आहे ः राजनाती हे राक्षसाचे शास्त्र आहे. ही राजनीती नष्ट होईल तेव्हाच दुनियेचा बचाव होईल. राजकारणी लोकांच्या हातात जगाचे भविष्य धोक्यात आहे. समाज राजनीतीमुक्त झाला पाहिजे ही या काळाची मागणी आहे. ही गोष्ट होणारच आहे. मग ती एखाद्या महायुध्दानंतर का होईना! मला तेवढा धीर आहे. कारण त्याशिवाय जगाची धडगत नाही. पक्षीय राजकारण बंद भुयारासारखे आहे. ते कुठेच नेणार नाही हे आता लोकांच्या लक्षात येऊ लागले आहे. सत्ता स्पर्धेची निरर्थकताही त्यांना जाणवू लागली आहे. राजकीय पक्षाच्या पुढाऱ्यांना सुध्दा राजकारणाच्या मर्यादा दिसू लागल्या आहेत."

"...परस्परांवर विश्वास नसला आणि केवळ 'विरोधासाठी विरोध' होत असला तर पक्षपद्धती एखाद्या तमाशाचे स्वरुप धारण करते. किमानपक्षी राष्ट्रीय महत्वाच्या विषयांबद्दल तरी सहमतीने, परस्परांवर विश्वास ठेवूनच पक्ष चालले पाहिजेत. तसे न केल्यास राजनीती मार खाईल आणि हारही जाईल."

विनोबाजींनी अचूक व मार्मिक विश्लेषण केलेला परिच्छेद उद्‌धृत करुन मोठ्या भाऊंनी वाचन व मननातून घडलेल्या सुसंवादाचे दर्शन आपल्यापुढे ठेवले आहे. आजच्या काळालाही तंतोतंत लागू होणारा असा हा परिच्छेद आहे.

योगी अरविंदांनी 'सावित्री' या महाकाव्यात सावित्रीच्या मुखात एक वचन घातले. ते असे, "मी आत्म्याच्या निदिध्यासातून अरण्ये" तुडवीत; वादळे उलथवीत; लाटांच्या तांडवांवर स्वार होऊन आले आहे. हे यमा ! मला वरवर भोगात मळणारे ज्ञान नकोय. मला आत्मज्ञान हवे. ते तू मला सांग. मी निदिध्यासाने तुझ्यापर्यंत पोहोचलेय. आता मला आत्मज्ञानातून साक्षात्कारी व्हायचेय."

भवरलाल जैन यांचे मौलिक विचार संग्रहीत केलेल्या 'जीवनातील शाश्वत मूल्ये' या ग्रंथात भाऊंचा विज्ञान आणि अध्यात्म या संबंधीचा एक विचार दिला आहे. त्यात म्हटलंय, विज्ञानाने बुद्धी विशाल व धारदार होते, तर अध्यात्माने हृदय व आत्माही सुसंस्कारित होतो. " याचा अर्थ अध्यात्म व विज्ञान दोन्हीही अनुभवाला प्राधान्य देतात. इंद्रियांनी निरीक्षण करून बुद्धीच्या निकषांवर ते तपासणे हे विज्ञानाचे काम आहे. इंद्रियांच्या पलीकडे जाऊन विश्वाचा वेध घेणे आणि जीवनाचे सर्वोत्कृष्ट मूल्य सांगणे हे अध्यात्माचे काम आहे. निरीक्षणावर आणि परीक्षणावर विज्ञान आधारित आहे. विवेकावर आणि ध्यानावर अध्यात्म आधारित आहे. विज्ञानाचे व अध्यात्माचे भांडण नाही. तथापि माणसाच्या जिज्ञासेत सूक्ष्माचा शोध घेण्याची जी लालसा आहे ती अध्यात्माने तृप्त होते. धर्माचे पर्यवसानही अध्यात्मात होते. मी पणाचा खरा शोध येथे लागतो. तो नीतीशास्त्राचा पाया ठरतो. विज्ञान भौतिकीत अधिक रमते. अध्यात्म अंतरंगात अधिक खुलते. चिरंजीव मूल्यांचा शोध अध्यात्म घेते.




शाळेतील प्रार्थनेत सहभागी झालेले बन्सीभाऊ, भवरलालभाऊ, सुरेशदादा जैन, राजा मयूर, दलुभाऊ जैन व विद्यार्थी

आजच्या विज्ञानयुगात आत्मज्ञानाचे भान महत्त्वाचे आहे. विज्ञान आणि आत्मज्ञान दोन्ही पूरक आहेत. तू आपले सर्व काही दिलेस तर ते श्रेय होईल. आत्मज्ञानाच्या मागणीत विज्ञान येते. या विज्ञान युगात कोणतेही राष्ट्र विभक्त राहू शकत नाही. तसे नीट पाहिले तर ते जगूही शकणार नाही. एक व्हाल तर जगाल. आपले श्रेय व कल्याण संघटित होण्यात आहे. यामुळे ऐहिक जीवन सुधारेल, असे विचार मोठ्या भाऊंनी शाळकरी मुलांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला. "कठिण समस्येवर, निर्विकार व सोपा मार्ग शोधायचा असेल तर संतांच्या मधुरवाणीचे श्रवण करावे. अध्यात्म आणि वास्तव यांचा मिलाफ त्यात असतो." एवढे सांगून भाऊ थांबले नाहीत. त्यांनी "भौतिक विकासाला अध्यात्माची जोड दिली




*स्थितप्रज्ञ दादाजी ऐकती, छोट्यांचे बोल, करता येत नाही त्या बडबडीचे मोल.*

नाही तर आपण वाहतच जाऊ", असे स्पष्टपणे नमुद केले आहे. गुरूकुल पद्धतीतला एक महत्त्वाचा शैक्षणिक घटक 'अध्यात्मिक ज्ञान' हा होय. अध्यात्मिकता म्हणजे अंतरंगाचे भान. अंतरंगाची शुद्धी मी माझ्यापुरते न पाहता सहवृत्तीतून सर्वांचा होणे. सुख असेल तर ते सर्वांनी मिळून भोगायचे. दु:ख असेल तर ते सर्वांनी वाटून घ्यायचे. आम्ही सारे एक आहोत. आमच्या जगण्याचे विशिष्ट भान आम्हाला आहे. यातून सामूहिक शक्ती विधायक कार्य करते. त्यातून कामाचे विविध प्रकल्प तयार होतात. बुद्धी व्यापक होते. उत्तम कार्यकर्ते निर्माण होतात. ज्ञानी तयार होतात. वैज्ञानिक जन्माला येतात. मनुष्याची तीन परमभाग्य असतात. पहिले भाग्य म्हणजे नरदेह प्राप्त झाला आहे. दुसरे भाग्य म्हणजे, मुक्तीसाठी अभ्यास, तिसरे भाग्य म्हणजे महापुरुषांच्या आश्रयाचा लाभ. या तीनही बाबी आमच्या जगण्याला सामाजिक आणि नैतिक अधिष्ठान देतात. म्हणून अज्ञानाचा अंधार दूर करणे आणि आत्मज्ञानांच्या भानांतून नव्या वाटा निर्माण करीत नव्या काळाचे नवे सूर्य पाहणे हे 'अनुभूती' गुरूकुलाचे भाऊंनी ध्येय मानले. या गुरूकुलाचे ते स्वत: पहिले गुरू झाले.

आता मी गुरू आहे म्हणून तुम्ही सर्वांनी माझेच ऐका अशी दुराग्रही भूमिका भाऊंनी कधीच घेतली नाही. कंपनीत काम करताना, निर्णय घेताना ही त्यांनी कधीही या विचारांना थारा दिला नाही. समोरच्याचे सर्व म्हणणे शांतपणाने ऐकून घेतल्यानंतर सारासार विवेकाचा आधार घेत ते निर्णयाचा मार्ग चोखाळत. विद्यार्थ्यांनाही त्यांनी आपली बुद्धी स्वतंत्र ठेवा आणि तेच प्रथम कर्तव्य आहे असे स्पष्टपणे बजावले. असे केले तरच विद्यार्थ्यांना परिपूर्ण स्व-तंत्राचा अधिकार प्राप्त होतो. यावर भाऊंची श्रद्धा होती. श्रद्धेशिवाय विद्या नाही. म्हणून श्रद्धा हवी. त्याचबरोबर बुद्धी दोन्ही पुरक आहेत. जसे डोळे आणि कान वेगवेगळ्या शक्ती आहेत. या दोहोंचा परस्परांशी विरोध नाही तसे श्रद्धा आणि बुद्धीचे आहे.ज्ञानाचा आरंभ श्रद्धेने होतो. पण ज्ञानाची परिसमाप्ती बुद्धीत आहे. याला विनोबाजींनी चिंतन स्वातंत्र्य म्हटले आहे. विद्यार्थ्यांवर जबरदस्ती करून हे मिळत नाही. माझे म्हणणे पटत असेल तर ऐका, पटत नसेल तर मुळीच ऐकू नका. असे हाडाचा शिक्षकच म्हणू शकतो. बुद्धीस्वातंत्र्य हे महत्वाचे आहे. महापुरुषांविषयी आदर जरूर बाळगावा, पण महापुरूष म्हणून त्यांचे सारेच म्हणणे ऐकावे हे म्हणणे युक्त नाही. यासाठी स्वच्छ मनाने अभ्यासूवृत्ती जपली पाहिजे असे भाऊ आवर्जून सांगत.

स्वत: वर ताबा मिळविणे हे विद्यार्थ्यांचे दुसरे कर्तव्य आहे असे ते नेहमी सांगत. असा विद्यार्थी स्वातंत्र्याचा पूरक असतो. जो संकल्प मी करीन तो सिद्धीस नेईन, अशी निष्ठा असली पाहिजे. म्हणून देह, बुद्धी आणि मन यावर संयम हवा. प्रज्ञेने योग्य निर्णय घेण्याची जाणीव ठेवावी. निर्णयातून काळाची पावले ओळखता आली पाहिजेत. नव्या संकल्पनांना नवी मैदाने मिळाली पाहिजेत. त्यासाठी अभ्यासासह आपली सर्व शक्ती विद्यार्थ्यांनी

पणाला लावली पाहिजे. इंद्रियांवर ताबा मिळवून विधायक कामांसाठी त्या शक्तीचा उपयोग करणे हा विद्यार्थ्यांचा श्रेष्ठ निष्काम कर्मयोग आहे.

निरंतर सेवा परायणता हे विद्यार्थ्यांचे तिसरे कर्तव्य आहे असे भाऊ आवर्जून सांगायचे. सेवेविना ज्ञानप्राप्ती नाही. यासाठी संदर्भ म्हणून ते महाभारतातली एक गोष्ट नेहमी सांगायचे. अर्जुन, श्रीकृष्ण, धर्मराज एकत्र बसले होते. तेथे अर्जुनाने "जो माझ्या गांडीव धनुष्याची निंदा करील, त्याला मी ठार करीन," अशी प्रतिज्ञा केली. पुढे युद्धात धर्मराजांनी अर्जुनाच्या धनुष्याची निंदा केली. अर्जुनाला ते सहन झाले नाही. म्हणून तो धर्मराजावर हात उचलणार तोच कृष्णानी त्याचा हात मागे खेचला. कृष्ण म्हणाले, "तू मूर्ख आहेस. तुला ज्ञान नाही. तू वृद्धांची सेवा केली नाहीस तर तुला ज्ञान कसे मिळणार?". यातील भावार्थ महत्वाचा आहे. ज्ञानवानांकडून सेवेतून असे अनुभव मिळतात. म्हणून विद्यार्थ्यांनी ज्ञानी माणसांना ओळखले पाहिजे. त्यांचे जे चांगले आहे ते टिपून आपल्यात उतरविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

सर्वसावधानता हे विद्यार्थ्यांचे चौथे कर्तव्य असले पाहिजे असे भाऊ म्हणाले होते. विश्वात किंवा जगात ज्या हालचाली चालतात, घडामोडी होतात, त्या सर्वांचे विद्यार्थ्यांनी अध्ययन करावे. निरनिराळ्या वादांचा व भूमिकांचा तटस्थ बुद्धीने अभ्यास करावा. त्यातून सर्वव्यापक व्हावे. बुद्धी संकुचित असता कामा नये. ती व्यापकच हवी. मी विशिष्ट जातीचा, धर्माचा, प्रांताचा, पंथाचा, संप्रदायाचा आहे. असे मानण्याऐवजी मी भारतीय आहे अशी बुद्धी हवी. व्यापक बुद्धीने विचार व्हावा. आता तर विश्व जवळ आले आहे. सगळे जग एक कुटुंब होऊन बसले आहे. त्यामुळे विनोबांची विश्वमानवाची कल्पना आपण आज अनुभवीत आहोत. 'जय जगत' हे सूत्र आता अस्तित्वात आहे. हा विचार समाजाला अभय देईल. सर्वात जास्त जो दुःखी आहे त्याला प्रथम मदत केली पाहिजे. उच्च नीच भाव नाहीसे झाले पाहिजेत. शरीर श्रमांवर चालणारे शिक्षण दिले पाहिजे तरच 'जय जवान, जय किसान' आणि 'जय विज्ञान' ही त्रिमिती गुरूकुलाचे ब्रीदवाक्य होईल. भारतीय संस्कृतीतील विकसित मानव्य विश्वाचा आधार ठरले आहे. हे लक्षात घेतले तर आम्ही सर्वांना घेऊन विकसनशील झाले पाहिजे. ही भाऊंनी स्थापिलेल्या अनुभूती गुरूकुलाची भूमिका आहे. 'अनुभूती' ही नुसती इंग्रजी माध्यमाची शाळा नाही. शिक्षणातून धर्मचिंतनाची वैश्विक मूल्ये शिकविणारी व उत्कृष्ट दर्ज्याचे संस्कारी पिढी घडविणारी एका ध्येयवेडयाची तळहातावरच्या फोडाप्रमाणे जपलेली संस्था आहे. अशा प्रकारच्या शिक्षणामुळे 'स्व' आणि 'पर' हा भेद नाहीसा होतो. विद्यार्थी सर्वोपकारी बनतो. त्याचे हदय प्रेमाने ओतप्रोत भरलेले असते. तो उदार होतो. बुद्धीमान ठरतो.

पुराणात दधीची ऋषींची सुंदर गोष्ट आहे. ते महान तपस्वी होते. नित्य चिंतनात राहत. त्यांच्या शरीरावर फारसे मांस नव्हते. फक्त हाडे शिल्लक होती. लोक त्यांच्या जवळ आले , म्हणाले, "आम्हाला वृत्रासुराचा त्रास होत आहे. तुमच्या हाडांपासून जर आम्ही वज्र तयार केले तर त्याचा पराभव होऊ शकेल. म्हणून आपण कृपावंत होऊन आपल्या अस्थी आम्हांला द्या. अगस्ती ऋषिंनी ते आनंदाने मान्य केले. आपल्या अस्थी समाजाला अर्पण केल्या. या त्यागाला तोड नाही.आपले सर्वस्व आपण समाजाला दिले पाहिजे. सर्व धर्मांची शिकवण हीच आहे. याचे शिक्षण अवश्य दिले पाहिजे. करूणा, त्याग, प्रेम, शांतता, अहिंसा, सत्याग्रह ही गुरूकुलाची मूल्ये आज जगाची मूल्ये ठरली आहेत. याचा गुरूकुलात नित्य अभ्यास होईल यावर भाऊंचा कटाक्ष होता. त्याप्रमाणे त्यांनी व्यवस्थेचे वेळापत्रक बसविले होते.

आजच्या विज्ञानयुगात आत्मज्ञानाचे भान महत्त्वाचे आहे. विज्ञान आणि आत्मज्ञान दोन्ही पूरक आहेत. तू आपले सर्व काही दिलेस तर





*अनुभूती निवासी शाळेमध्ये नातू आत्मन याच्याबरोबर टेबल टेनिस खेळाचा मनमुराद आनंद घेताना मोठेभाऊ, शेजारी अशोक जैन, दलुभाऊ व इतर*

ते श्रेय होईल. आत्मज्ञानाच्या मागणीत विज्ञान येते. आत्मज्ञानाच्या मननातून अभ्यासात अनेक लाभ होतात. परंतु त्यातून होणारा आत्मलाभ हा सर्वात महत्त्वाचा आहे. संत ज्ञानदेवांनी आत्मज्ञानाचे तत्वज्ञान अनुभूतीच्या चिकित्सेतून मांडलेले आहे. आपले तत्वचिंतन श्रोत्यांनी तर्काच्या किंवा बुद्धीच्या आधारे जाणून घ्यावे असे त्यांना वाटत नाही. आपली कथा श्रोत्यांनी अनुभवावी असे त्यांना वाटते. ज्ञानदेवांनी ज्ञानाचे महत्व सांगताना गुरूचेही महत्त्व सांगितले आहे. गुरू हा ज्ञानाचे विश्लेषण करतो. शिष्याशी सुसंवाद साधतो. त्यामुळे भावार्थाबरोबर जीवनाची संगती लागते. हे लक्षात घेण्यासारखे आहे. ज्या ज्ञानाने मनाचे समाधान होते. ते ज्ञान अर्थपूर्ण असते. मात्र तात्पुरते समाधान नसावे. समाधानातून नव्या विचारांचा नवा प्रवाह जन्मावा. यासाठी विश्वशक्तीची जाणीवयुक्त रूपे बघण्याची तयारी ठेवावी. प्रकृतीने निर्माण केलेल्या विविध तऱ्हांमध्ये प्रकृतीचा व्यापार ओळखावा लागतो. काहींची प्रकृती मुळात शांत असते. तर काहींची वळवळी असते. काहींना आपली प्रकृती कोणती आहे हे कळतच नाही. प्रकृतीचा वेगळा अभ्यास असतो. मोठ्याभाऊंनी प्रत्येक माणसाच्या प्रकृतीचा अभ्यास करून त्याला साजेसे होईल व जमेल असेच काम देण्याचा प्रयत्न केला. माणसाच्या स्वभावाचीही त्यांना चांगलीच पारख होती. त्यामुळे स्वभाव पाहून संवाद साधण्याची हातोटी व कला त्यांना चांगली साधली होती. प्रकृतीत समतोल निर्माण झाला की, अभ्यासात संवादित्व येते. जाणणे खोलखोल होते. ज्ञानाचे वर्गीकरण करुन अभ्यासात सुसूत्रता येते. प्रकृती ही परात्म्याची शक्ती आहे. ती स्वयंप्रेरणेने कर्मप्रवण होते.


लहानपणीच जर मुलांच्या मनावर निर्भयता बिंबवली तर ती आयुष्यभर मोठी कामे करु शकतात यावर नितांत श्रद्धा व गाढ विश्वास असणारे भाऊ शाळेतल्या मुलांना एकदा निर्भयतेचे महत्व अगदी साध्या व लहानग्यांना समजेल अशा शब्दात समजून सांगत होते. माणूस जर सतत भीत राहिला तर त्याच्या वाट्याला अपमान येतो. आपल्यातल्या चांगल्या कामाने आपण तडफदार व्हायला हवे. चांगले काम म्हणजे साहस आहे हे मानून काम करायचे म्हणजे मन विशाल होते. हृदयात कळकळ निर्माण होते. बुद्धी आणि तर्क आपल्याला काही प्रमाणात पुढे घेऊन जाऊ शकतात. परंतु कामाची स्फूर्ती हृदयातून मिळते. चांगल्या कामातून प्रेम लाभते. म्हणून हृदयातली तळमळ नेहमी निर्मळ राहिली पाहिजे. केवढा मोलाचा हा संदेश आहे. एवढ्यावरच ते थांबत नाहीत. भाऊ पुढे सांगतात, “तुम्ही किती काम करता यापेक्षा तुम्ही तुमच्या कामात किती जीव ओतता, हे जास्त महत्त्वाचे आहे.” श्रद्धायुक्त मनाने काम करीत गेलो की, आत्मविश्वासातून नवे समाधान मिळते. असे काम ही जनताजनार्दनाची पूजा आहे, असे मानून जर आपण काम करीत राहिलो तर, आपले जगणे सुंदर होईल. केवळ यंत्रासारखे जगणे, हे जगणे नव्हे. यातून मनाची शक्ती निर्माण होत नाही. मनापासून केलेले कोणतेही चांगले काम चारित्र्य निर्माण करते. व्यवसायात सचोटी आणते. त्यामुळे उद्योगात निश्चितता येऊन



*मुलांच्या समवेत, चवीचवी घेऊ घास, आनंद हा नित्यास, भरूनी वाहे.*











# अभिनंदनाची ओळ-उत्तर अनुत्तरीत


संत, संतसाहित्य आणि संतांची शिकवण याबाबतचे मूलगामी चिंतन भवरलालजींनी करून त्याबाबत स्वतःची अशी काही ठाम मते बनविली होती. पूज्य मधुस्मिताजी यांनी साठाव्या वर्षात पदार्पण केले तेव्हां म्हणजे २०१० साली भाऊंनी त्यांना जे अभिनंदन व शुभेच्छांचे पत्र पाठविले त्यात, "कठीण समस्येवर, निर्विकार व सोपा मार्ग शोधायचा असेल तर संतांच्या मधुरवाणीचे श्रवण करावे. अध्यात्म आणि वास्तव यांचा मिलाफ त्यात असतो," असे वाक्य नमूद केले आहे. हे वाक्य संत साहित्याचे आणि संत कार्याचे सार आहे. संतांनी भक्तिला ज्ञानाचे डोळे दिले आणि चरणाला कर्माची दृष्टी दिली. संतांच्या भक्तीपुढे योगाने नमस्कार केला. योगाचा गौरव करूनही भक्तीत संत अधिक रमले. कारण, मानसिक शरणागतीचे सामर्थ्य मानवी मनाला योगापेक्षा लवकर लक्षात येईल. संतांनी भक्ती ही समाजाच्या गुणविकासाशी जोडली. गुणविकासाशिवाय अध्यात्माचे दरवाजे उघडत नाहीत. हे गुण मानव्याला विकसित करतात. विकसित मानव्य म्हणजे आत्म्याचे माऊलीपण आहे. संतांनी आचारविधी सुलभ केला. मानसपुजेला स्थान दिले. नामजप हा श्रेष्ठ यज्ञ मानला. जीवन हे 'सुंदर आहे. ते सुंदर' ते ध्यानात रूपांतरित करण्यासाठी सुमन व्हावे म्हणून संतांनी वर्तमानातल्या जाणीवा महत्त्वाच्या मानल्या. वर्तमानाचे नेमके भान दिले. या भानानेच भाऊंना अभिनंदनाची ओळ दिली असेल का? याचे उत्तर आता कोण देईल.?












विश्वासार्हता वाढीला लागते. अंतरंगातली साधना एकाग्रता निर्माण करते. निरनिराळी इंद्रिये यात मदत करतात. जीवनशक्तीचा लाभ होतो. सहज होणाऱ्या कामांना महत्त्व येते. आपली चिकाटी याबाबतीत सतत ठेवावी लागते. माणूस केवळ ज्ञानाने मोठा होत नाही. ज्ञानयुक्त विनम्र मनाने तो मोठा होतो. मनाची पवित्रता मनामनांना जोडण्यात असते. मनाने आणि वागण्याने सशक्त असणे हे निरोगीपणाचे लक्षण आहे. हे भाऊंचे सांगणे किती मोलाचे आहे, ते आपल्याला कधी कळेल?

# ‘बडे भाऊंच्या’ स्मरणार्थ



# तुम्ही अनुभवल्यापेक्षा अधिक चांगल्या स्थितीत जग सोडून जा!



**-प्राध्यापिका गीता धर्मपाल,**
(डीन - रिसर्च, गांधी रिसर्च फाऊंडेशन)

बडे भाऊंनी साधी राहणी व उच्च विचारसरणीतून भारताच्या नवनिर्माणाच्या प्रक्रियेत त्यांचे अमूल्य असे योगदान दिले आहे. आज भारत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव (७५ वर्षे) साजरा करीत असताना त्यांच्या विचारांच्या वाटेने वाटचाल करणे यापेक्षा त्यांना अधिक उचित श्रद्धांजली आणखी कोणती असू शकेल?

पद्मश्री आदरणीय श्री. भवरलाल जैन (१२.१२.१९३७-२५.०२.२०१६) हे एक असाधारण असे व्यक्तिमत्व होते, ते कमालीचे ज्ञानी, बुद्धिवंत असे अत्युत्तम उद्योजक आणि जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. (जेआयएसएल), चे संस्थापक अध्यक्ष होते की, जी कंपनी आज जगात दुसऱ्या क्रमांकाची सूक्ष्म जलसिंचन कंपनी आहे.

या खेरीज ते गांधीवादी विचारसरणीचे कट्टर समर्थक, परोपकारी स्वभावाचे होते आणि गांधी रिसर्च फाऊंडेशनचे (जीआरएफ) संस्थापक होते. शेवटचा पण तितकाच महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, ते मोठ्या प्रमाणावर असलेल्या एकत्र कुटुंबाचे प्रमुख होते. ते आठ नातवंडांसह चार मुलांचे पिता होते. २५ फेब्रुवारी २०१६ रोजी त्यांचे अचानक देहावसान झाल्याने केवळ वटवृक्षाप्रमाणे विशाल असलेल्या त्यांच्या कुटुंबाचेच नव्हे तर, त्यांच्या बहुराष्ट्रीय उपक्रमाची आणि एकूणच समाजाची फार मोठी हानी झाली आहे. आदरणीय बडे भाऊ(त्यांना सर्वजण प्रेमाने याच नावाने संबोधतात आणि या छोट्याशा लेखातही मी बडे भाऊ असा उल्लेख केला आहे.) आम्हा सर्वांचे प्रतिनिधित्व करीत होते आणि आजही प्रतिनिधित्व करीत आहेत आणि त्यांना प्रत्यक्ष ओळखणारे हजारोंच्या संख्येतील अनेकजण हे खरोखरीच भाग्यवान म्हटले पाहिजेत. त्यांचे औदार्य, कामावरील निष्ठा, कमालीचा धाडसीपणा, वचनबद्धता, त्यांची कडक शिस्त या त्यांच्यातील अनुकरणीय गुणांचे आकर्षण वाटायचे आणि सगळ्यात शेवटचा व तितकाच महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, सर्वसामान्यांच्या विशेषत: भारतातील शेतकऱ्यांच्या गरजांची त्यांना पुरेपूर जाणिव होती.

त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या उत्सर्जित किरणांमुळे आणि त्यांच्या जीवनातील अतुलनीय यशाच्या लाभांशामुळे, त्यांच्या चैतन्यदायी अस्तित्वामुळे, त्यांच्यापासून मिळणाऱ्या प्रेरणेतून त्यांच्या दूरदृष्टीचा भावी पिढ्यांना फायदाच होईल, हे नि:संशय! फेब्रुवारी २०११ मध्ये योगायोगाने त्यांची प्रथमच भेट होण्याचे भाग्य मला लाभले. या भेटीत, त्यांच्याविषयी वाटणाऱ्या आदराचा, सौहार्दपूर्णतेचा आणि कटिबद्धतेचा पाया घातला गेला होता. २०११ च्या वसंत ऋतूमध्ये मी सुट्टीवर होते. जर्मनीतील हेडलबर्ग विद्यापीठातील प्राध्यापकपदातून विरंगुळा म्हणून काही दिवस सुट्टी घेतली होती. त्या विद्यापीठातील दक्षिण आशिया संस्थेत मी इतिहास विभाग प्रमुख होते. मी सेवाग्रामला आले होते. माझे गांधीवादी विचारवंत असलेले वडिल श्री. धर्मपाल (१९२२-२००६) येथे अनेक दशके राहात होते. २००६ च्या ऑक्टोबर महिन्यात त्यांचे निधन झाले होते. माझ्या वडिलांचे ऐतिहासिक संशोधन बडे भाऊंच्या चांगले परिचित होते. माझे वडिल गांधीजींच्या सेवाग्राम आश्रमात अनेक दशके राहिले होते. म्हणून, त्यांनी केलेल्या संग्रहाचा फार मोठा खजिना गांधी सेवाग्रामच्या ग्रंथालयाकडे सुपूर्द करण्यात आला होता. एवढ्या मोठ्या संग्रहाच्या वारशाचे जतन कसे करावे, याची मला काळजी वाटत होती आणि हा ऐतिहासिक अमूल्य असा संग्रह, ज्यात ३० ते ४० हजार कागदपत्रांचा समावेश होता, त्याचे डिजिटलायझेशन करून तो सर्वसामान्यांसाठी उपलब्ध व्हावा ही इच्छा होती. आश्चर्याची गोष्ट अशी की, बडे भाऊंनी अत्यंत सहृदयतेने गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या डिजिटलायझेशन विभागाकडून या सर्व कागदपत्रांचे डिजिटलायझेशन करून देण्याची तयारी दर्शवली.



*सेवाग्राम येथील महात्मा गांधींचे निवासस्थान*

बडे भाऊंनी डिजिटलायझेशन कामावर लक्ष ठेवण्यासाठी मला पाचारण केले. त्यामुळे हेडलबर्ग विद्यापीठाने दिलेल्या सुट्टीच्या कालावधीत मला जैन हिल्स येथे ऑक्टोबर २०११ ते मार्च २०१२ पर्यंत 'स्कॉलर रेसीडन्स' मध्ये राहण्याची आणि 'गांधी तीर्थ' च्या अखेरच्या टप्प्यातील बांधकामात सहभागी होण्याची दुर्मिळ संधी मिळाली. तसेच, २५ मार्च २०१२ रोजी त्याच्या उद्‌घाटन समारंभास उपस्थित राहण्याचे भाग्य लाभले. तत्कालीन राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील यांच्या शुभहस्ते उद्‌घाटन झाले होते.

सहा महिन्यांच्या माझ्या वास्तव्यात, जैन परिवाराचा एक सन्माननीय पाहुणा म्हणून वागणूक मिळाली व त्यांच्या असाधारण आदरातिथ्याचा व निखळ मैत्रीचा अनुभव घेण्याचे भाग्य मला लाभले. अशा प्रकारे, बडे भाऊंनी मला लवकरात लवकर गांधी रिसर्च फाऊंडेशनमध्ये 'डीन' म्हणून सहभागी व्हावे, अशी विनंती केली. मी त्यांना हेडलबर्ग विद्यापीठातून निवृत्त झाल्यावर नवीन जबाबदारी मानद तत्त्वावर(ऑनररी बेसीस) स्वीकारेन व सेवा करेन असा शब्द दिला. फेब्रुवारी २०१६ मध्ये त्यांच्या देहावसानानंतरही मी त्यांच्या दूरदृष्टीमुळे तेथे कार्यरत राहिले.

'गांधी रिसर्च फाऊंडेशन' हे बडे भाऊंच्या प्रेमळ स्वप्नाचे प्रतिनिधित्व करीत आहे. त्यांच्या संपूर्ण आयुष्यभराच्या वाटचालीत गांधीजी हे त्यांचे प्रेरणादायी वाटाड्या होते. त्यामुळेच त्यांनी जैन इरिगेशन या भारतातील :एका आघाडीच्या बहुराष्ट्रीय कंपनीची यशस्वीरीत्या स्थापना केली. गांधीजींच्या जीवनाचा, विचारांचा, कार्याचा वारसा जतन करण्यासाठी स्वत:ला वाहून घेण्याचा निर्णय बडे भाऊंनी घेतला होता. भारतातील आणि संपूर्ण जगातील तरुणांमध्ये सत्य व अहिंसेच्या मूल्यांची प्रेरणा निर्माण व्हावी, त्याला उत्तेजन देण्यासाठी व त्याचा प्रसार करण्यासाठी कार्यरत राहणेच हे आपले जीवितकार्य आहे, मिशन आहे, असे ते मानत होते. गांधीजींचा वारसा म्हणून 'गांधी तीर्थ' या भव्य आधुनिक मंदिराची उभारणी करताना बांधकामासाठी जोधपुरी दगडांचा वापर करण्यात आला. बडे भाऊंना गांधीजींच्या भव्य आत्म्याची खरोखर जाणिव होती. कारण जरी गांधीजी हे साधेपणाचे पुरस्कर्ते होते हे आपणा सर्वांना



माहिती असले तरी, ते दारिद्र्याचे समर्थक नव्हते. खरोखर त्यांना साधेपणातील भव्यतेचे विजेते म्हणावे लागेल. त्याही पेक्षा महत्त्वाचे म्हणजे, ते स्वदेशीच्या वापराचेही विजेते होते. प्रत्यक्षात बडे भाऊंना हे माहिती होते की, जेव्हा आपण गांधीजींचा संबंध दारिद्र्याशी जोडतो तेव्हा आपण त्यांच्या जन्मजात भव्य चैतन्याला नाकारत असतो. खऱ्या गांधीवादी चैतन्याचा आणि आपल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत सध्याच्या स्वदेशी स्रोताची पुनर्निर्मिती करण्यासाठी गांधींनी आयुष्यभर केलेल्या संघर्षाने, प्रयत्नांमुळे तसेच, शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ग्रामीण-शहरी वादावर मात करून समाजात जीवंतपणा आणून ऐक्य निर्माण करण्याचे जे कार्य केले त्यामुळे बडे भाऊंना खऱ्या अर्थाने प्रेरणा मिळाली.

'तुम्ही अनुभवल्यापेक्षा अधिक चांगल्या स्थितीत जग सोडून जा.' हा त्यांचा एका वाक्यात असलेला संदेश असून त्यांचा अभिनव विचार म्हणजे, 'गांधी रिसर्च फाऊंडेशन' होय. त्याचे उद्घाटन होऊन आता एक दशकाचा कालावधी पूर्ण झाला आहे. या कालावधीत शहरी व ग्रामीण भागातील समाजावर त्याचा चांगला ठसा उमटला असून एक प्रकारची प्रेरणा मिळाली आहे. अधिक माहितीसाठी कृपया आमच्या www.gandhifoundation.net या संकेत स्थळाला भेट द्या आणि आपल्यापैकी प्रत्येकाने 'गांधी तीर्थ' ला भेट देणे स्वागतार्ह ठरेल यात शंका नाही. उत्तर महाराष्ट्रातील, खान्देशातील ते 'ओयासीस' आहे, असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही.

गांधीजींचे पुढील वचन हे अगदी खरे आहे. "जगात जे बदल झालेले पाहण्यास तुम्हाला आवडेल, ते बदल आधी स्वत:त करा." बडे भाऊंनी साधी राहणी व उच्च विचारसरणीतून भारताच्या नवनिर्माणाच्या प्रक्रियेत त्यांचे अमूल्य असे योगदान दिले आहे. आज भारत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव (७५ वर्षे) साजरा करीत असताना त्यांच्या विचारांच्या वाटेने वाटचाल करणे यापेक्षा त्यांना अधिक उचित श्रद्धांजली आणखी कोणती असू शकेल?


*"भारतातील आणि संपूर्ण जगातील तरुणांमध्ये सत्य व अहिंसेच्या मूल्यांची प्रेरणा निर्माण व्हावी, त्याला उत्तेजन देण्यासाठी व त्याचा प्रसार करण्यासाठी कार्यरत राहणे हेच आपले जीवितकार्य आहे, मिशन आहे, असे बडेभाऊ मानत होते."*



## भवरलाल जैन यांना श्रद्धांजली....



# बडे भाऊंच्या दृष्टीने काम हीच पूजा!



**- तुषार गांधी**
(संचालक, गांधी रिसर्च फाऊंडेशन)

आमच्या हातून जास्तीत जास्त चांगले काम व्हावे, यासाठी बडे भाऊ आम्हाला सतत प्रेरणा देत होते, आपण त्याच प्रेरणेने सातत्याने अधिक चांगले काम करणे, सेवा करणे, हीच खरी बडे भाऊंना उचित श्रद्धांजली ठरेल, त्यांनाही मान्य होईल व आमच्या हृदयात त्यांचे स्थान दिवसेंदिवस अधिक घट्ट होईल, यात तीळमात्र शंका नाही.



*गांधी तीर्थच्या उद्‌घाटनप्रसंगी तुषार गांधी यांचा भवरलाल जैन सत्कार करताना शेजारी राष्ट्रपती महामहीम सौ.प्रतिभाताई पाटील*

'कर के देखो', 'प्रथम करण्याचा प्रयत्न करा', हा बापूंनी आम्हाला घालून दिलेला आदर्श! बडे भाऊंनी त्यांच्या जीवनात त्याची सवय लावून घेतली होती. त्यांच्या ते अंगवळणी पडले होते. त्यांनी त्याच आदर्शाचे अनुकरण आयुष्यभर केले, त्याच मार्गाने ते वाटचाल करीत राहिले. त्यांचा एक अद्वितीय असा गुण म्हणजे, इतरांनी जे करावे अशी आपली अपेक्षा असते, ते स्वत: प्रथम करणे होय. हा गुणदेखील बापूंच्या ठायी होता. बडे भाऊंनी त्यांच्या रोजच्या उद्योग-व्यवसायात, सामाजिक कार्यात आणि कौटुंबिक जीवनातदेखील हे सर्व आदर्श आत्मसात केले होते.

त्यांच्या परिवाराची काळजी घेताना, त्यांच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येकास ते भेटत असत आणि त्या सर्वांबद्दल असलेले प्रेम, स्नेह, त्याच्याबद्दल त्यांना सतत वाटणारी काळजी यामुळे ते सर्वांना चकीत करीत असत. मला त्यांचे प्रेम, आशीर्वाद फार अल्प काळ लाभले असले तरी, त्याचा ठसा माझ्या जीवनावर प्रदीर्घ काळ उमटला आहे. या अल्प काळातही आयुष्यभराचे प्रेम, स्नेह त्यांच्याकडून मिळाले असे मला वाटते. परंतु, भाऊ हे कठोर परिश्रम करणारेही होते. त्यामुळे त्यांच्याबरोबर काम करणे हे आणखीनच कठीण वाटत असे. त्यांच्या बरोबर काम करणाऱ्या कोणालाही आपण त्यांच्यासाठी काम करतोय, असे भाऊ वाटू देत नसत. प्रत्येकाने त्याचे काम जास्तीत जास्त चांगले करावे, अशी भाऊंची अपेक्षा असे. त्यापेक्षा त्यांची अन्य काहीही अपेक्षा नसे. जर एखाद्याचे काम चांगले, दर्जेदार झाले नाही तर, भाऊ ते काम स्वत: पूर्ण करीत आणि अधिक चांगले परिणाम दिसून येत. त्यामुळे प्रत्येकजण आपले स्वत:चे काम जास्तीत जास्त चांगले कसे होईल, यावर अधिक भर देत असे. मग ते व्यवसाय उभारणी असो की, निव्वळ कल्पनेच्या पायावर एखादी संस्था उभारणी असो की, हरित क्षेत्र प्रकल्पाची सुरुवात असो, ती करताना त्यात सातत्याने नावीन्य, सुधारणा व दूरदृष्टी असली पहिजे, असे ते म्हणायचे. बडे भाऊंना कोणीही थांबवू शकत नसे.

जेव्हा मी प्रथम भाऊंना भेटलो, तेव्हा 'गांधी तीर्थ' निर्माण करण्याचे स्वप्न ते पाहात होते. जेव्हा त्यांनी मला त्याचे प्रथम वर्णन केले तेव्हा मी अतिशय प्रभावित झालो होतो; मात्र, मी त्याबद्दल साशंकही होतो. अशा प्रकारच्या अनेक भव्य कल्पनांबाबत मी ऐकले होते आणि त्यापैकी बहुसंख्य धडपडत, रडतखडत वाटचाल करीत आहेत. परंतु, मी बडे भाऊंची आवड, त्यांचा निर्धार, त्यांची जिद्द याला तेच मापदंड लावले नाहीत. नंतर, काळ जसजसा पुढे गेला, तसे त्यात प्रगती होऊन, ज्या कल्पनांबाबत मी साशंक होतो, त्या मूर्त स्वरूपात साकार झाल्या. त्या कल्पना वास्तवात साकारल्या. 'गांधी



*गांधीतीर्थात दाखविलेले जालियनवाला बागेतील हत्याकांडाचे दृश्य.*



*बांधकाम चालू असलेल्या गांधीतीर्थाची मोठे भाऊ हे तुषार गांधी यांना माहिती देताना. शेजारी उदय महाजन.*

तीर्थ' निर्मितीच्या वाटचालीत बहुसंख्य वेळा मी भाऊंच्या बरोबर होतो, त्याबद्दल मी स्वत:ला भाग्यवान समजतो.

दंतकथा झालेला ताजमहाल तयार होत असताना त्याचे साक्षीदार असण्यासारखेच हे आहे. भव्यतेत कोठेही कमी नाही, आकर्षकपणातही तसूभर कमी नाही. तथापि, बडे भाऊंसाठी ही केवळ एका स्मारकाची भव्य वास्तू नाही. त्यांनी अखेरच्या श्वासापर्यंत आपले संपूर्ण आयुष्य त्यासाठी पणाला लावण्याचा निर्धार केला होता. आत्मसमर्पण केले होते. एकीकडे हा सांगाडा उभा करीत असताना दुसरीकडे त्याच वेळी ते 'गांधी तीर्थ' चालविण्यासाठी जीव ओतून काम करणारा एक संच तयार करीत होते. एक टीम तयार करीत होते. त्याच वेळी त्या ठिकाणी त्यांनी अशी एक़ यंत्रणा उभी केली होती की, ज्याद्वारे 'गांधी रिसर्च फाऊंडेशन' ही एक शाश्वत संस्था निर्माण होईल. केवळ ते एका माणसाचे स्वप्न राहणार नाही. तर तो एका माणसाने मानवतेसाठी मागे ठेवलेला शाश्वत असा वारसा होय.


संस्था उभारणे हे अतिशय सोपे असते. अनेकदा अशा संस्थांची भरभराट जोपर्यंत संस्थापक हयात असतो, तोपर्यंत होते, त्या संस्था टिकून राहतात. संस्थापक हेच त्या संस्थेचे कवचकुंडल असते. परंतु, त्या व्यक्तीच्या माघारी त्या संस्थेची पडझड सुरू होऊन अल्पावधीत ती संस्था मृतप्राय होते. लयास जाते.



मला खात्री आहे की, बडे भाऊंनाही अशा पेचप्रसंगांना सामोरे जावे लागले असेल. परंतु, नेहमीप्रमाणे अशा चिंता, काळजीची त्यांनी कधीच पर्वा केली नाही. त्यांनी आपल्या संस्थेची 'ब्ल्यू प्रिन्ट' अशी तयार केली होती, ती भावी पिढ्यांसाठी कायमस्वरूपी वारसा बनून राहिल. त्याच समर्पण भावनेने ते निरंतर कार्यरत राहिले, त्यामुळे ते स्वत:चे असे मिशनही तयार करू शकले. रोजच्या दैनंदिन कामाची जबाबदारी असलेल्या टीममध्ये अभिमानाची व स्वामित्वाची भावना त्यांनी निर्माण केली ज्यामुळे ती टीम त्याच भावनेने, आवडीने काम करेल. जेव्हा स्वत: ते प्रत्येक गोष्टीत बारकाईने लक्ष घालत होते, तेव्हा त्यांनी भविष्यात संस्थेची वाटचाल चांगली व्हावी, यासाठी निवडक, सक्षम हातात त्यांनी संस्थेचे सुकाणू सोपविले. केवळ दूरदृष्टी असलेली व्यक्तीच असे करू शकते. बडे भाऊ या बाबतीत कोठेही तसूभरही कमी नव्हते.

ऑगस्ट १९४७ मध्ये जेव्हा भारताला स्वातंत्र्य मिळणार होते, तेव्हा बापू लिहितात-

"जोपर्यंत माझ्या श्रद्धा प्रखर, तेजस्वी आहेत, तोपर्यंत मी एकटा जरी असलो तरी थडग्यातही मी जीवंत असेन आणि तेथून बोलत राहीन, ७४ वर्षांच्या बापूंचा आवाज आजही ऐकू येतो. गदारोळातही मोठ्याने ऐकू येत आहे. पथभ्रष्ट न होण्याबाबत आजही ते सावधगिरीचा इशारा देत आहेत. बडे भाऊ आज जरी आपल्यात नसले तरी, त्यांचा वारसा पुढे




*सर्व विदेशी मालावर बहिष्कार टाकण्याची हांक गांधीजींनी दिली होती. त्याचा परिणाम म्हणून कपड्यांच्या होळीच्या ज्वाळा गगनाला भिडल्या. मंत्रमुग्ध करणारं हे चित्र कित्येक घटनांच्या नाट्यमय सादरीकरणापैकी एक आहे.*



नेण्याबाबत, त्यांचे स्वप्न आमचे म्हणून साकार करण्याबाबत आम्ही त्यांना जे वचन दिले आहे, त्याचे स्मरण आम्हाला सदैव होत आहे. मग ते त्यांनी स्थापन केलेल्या व विकसित केलेल्या उद्योग साम्राजाविषयी असो की, त्यांनी स्थापन केलेल्या संस्था असोत, त्यांनी त्याची जबाबदारी स्वत:च्या आयुष्यात जे मजबूत खांदे तयार केले होते, त्या मजबूत खांद्यावर सोपविली होती.

'बडे भाऊ' हे स्वत:च एक चमत्कार होते, एक अद्वितीय असे व्यक्तिमत्व होते. त्यांनाही बापू आवडायचे. त्यांच्या शाश्वत मूल्यांचा त्यांनी अंगीकार केला. फार कमी लोकांच्या नशिबात हा योग असतो. बापूंच्या बाबतीत उर्दूतील या दोन ओळी अतिशय चपखल लागू होतात-

"खुदी को कर बुलंद इतना की हर तकदीर से पहले
खुदा बंदे से खुद पुछे, बता तेरी रझा क्या है?

बडे भाऊंचे अनुकरण करणे हे फार अवघड आहे. मात्र, त्यांच्यासारखे होण्याचा प्रयत्न करण्यासाठी झगडले पाहिजे. त्यांच्या हयातीत त्यांचा आम्हाला सहवास लाभला, त्यांचा आशीर्वाद आम्हाला मिळाला, त्यांच्यापासून प्रेरणा घेऊ शकलो, हे आमचे भाग्य होय. कोणालाही हेवा वाटेल असे हे भाग्य म्हणावे लागेल. बडे भाऊ हयात असताना ते जसे आमच्या हातून जास्तीत जास्त चांगले काम व्हावे, यासाठी सतत प्रेरणा देत होते, आम्ही त्याच प्रेरणेने सातत्याने कार्य केले पाहिजे, सेवा केली पाहिजे. कारण, तिच खरी श्रद्धांजली बडे भाऊंना मान्य होईल व आमच्या हृदयात त्यांचे स्थान दिवसेंदिवस अधिक घट्ट होईल, यात तीळमात्र शंका नाही.




# जीवनशैलीतली दूरदृष्टी

डॉ. भालचंद्र नेमाडे

*ज्ञानपीठकार डॉ. भालचंद्र नेमाडे आणि डॉ. भवरलाल जैन यांची घनदाट मैत्री सर्वश्रुत आहे. दोघांनी एकमेकांवर निस्सीम प्रेम केले. आपल्या दृष्टीने हे प्रकाश देणारे दोन दिवे आहेत. ते नुसता प्रकाश देत नाहीत तर अंतरंगातल्या जाणिवा प्रकाशतात. दिव्याने परिसर उजळतो. उजळण्यातून आयुष्याची उजळणी सुरू होते. दिवा जन्मजात आत्मप्रकाशी असतो. मनाला सुख मिळते. मनोमीलनासाठी दिवा तेवतो. कृतज्ञतेच्या मोरपंखी स्वप्नांना सांभाळतो. काही दिव्यांच्या संगतीत नुसते आपण असलो तरी अस्तित्वाचा समग्र गाभा ढवळून निघतो. आपण आपला दिवा होतो. आपल्या प्रकाश वाटा शोधताना अंधाराच्या नरकासुरांना भ्यायचे नसते. अंधार उगाच कधी कधी भिववितो. शंकांच्या पाली चुकचुकतात. भीतीची वटवाघळे निर्माण होतात. यासाठी दिव्याच्या जळण्यातले मौन जपायचे असते. मनामनांच्या प्रकाशांगणात एकमेकांनी एकमेकांच्या संगतीने वाढायचे असते. याला 'दिव्याने दिवा लावणे' असे म्हणतात. भवरलालजींच्या आठवणींचा हा दिवा जो डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी या लेखातून लावला आहे, तो आपले आयुष्य निश्चित उजळून टाकील या विश्वासासह सादर.*

भवरलाल भाऊ हल्ली सदैव माझ्याबरोबर असतात. मी इथे जळगावात आल्यापासून कुठेही फेरी मारली की, भाऊंचा सहवास जाणवतो. जैन हिल्सच्या परिसरात भाऊंच्याबरोबर मी कुठे झाडं लावलेली आहेत, कुठे आम्ही बसून गप्पा मारल्या आहेत, कुठे काही विचार सुचले आहेत, ते कधी-कधी माझं मत ऐकून म्हणायचे, “तुला त्यातलं काही कळत नाही.” ते मला नेहमी आठवतं. कधी कधी म्हणायचे, “मी तुझ्यापेक्षा चार महिन्यांनी मोठा आहे. त्यामुळे माझं तू ऐकलं पाहिजेस. तुला हा माझा देशीवाद मान्यच करावा लागेल.” अशी ती हुशारी होती आणि आमच्यात नंतर खूप घनिष्ठ मैत्री झाली. त्यांनी फार उत्तम पुस्तकंही लिहिली आहेत. त्यावेळी मी त्यांना म्हणालो होतो, “भाऊ तुम्ही खरं तर लेखक व्हायला पाहिजे होते, पण बरं झालं तुम्ही लेखक झाला नाही. नाही तर आमच्यासारख्यांचं काही खरं नव्हतं, आम्हांला कोणी लेखक म्हणून विचारलं नसतं.” त्यावर ते भयंकर हसले. इतकं मोठ्यानं हसतांना त्यांना मी कधी पाहिलं नव्हतं.




## कार्यशैलीत सर्जनशीलता

जी सर्जनशीलता – क्रिएटिव्हिटी – असते ती अनेक क्षेत्रांत असते. इथेच कुठे तरी मी साहित्य अकादमीतर्फे भाषांतराचं एक वर्कशॉप घेतलं होतं, त्यात मी उद्घाटनपर बोललो. त्याचे भवरलाल भाऊ अध्यक्ष होते. त्यावेळी मी सांगितलं होतं : आपल्याकडे संस्कृत साहित्य शास्त्रात ६४ कला सांगितलेल्या आहेत, पण जैन आगमांत ७२ कला सांगितल्या आहेत. पाश्चात्य समीक्षक सातच कला मानतात. चित्र, शिल्प, साहित्य, नाटक वगैरे. त्या आता एकदम सात झाल्या, हे चुकीचं आहे. या जैन आगमांतल्या कलांमध्ये स्वयंपाक कसा करावा, भाजी वाढताना ती कशी वाढावी, ताटात पदार्थ कसे लावावे, हीसुद्धा कला मानली आहे आणि जगण्यासाठी अशा अनेक कला महत्त्वाच्या आहेत, त्या लहान-मोठ्या असतील. पण त्यात काही निश्चितच सौंदर्यनिर्मिति आहे. भाऊंचं उद्यान म्हणा किंवा भाऊंनी लावलेली झाडं, सर्वत्र केलेली पाण्याची व्यवस्था, इथले प्राणी, पक्षी, भूगोलाचा सर्जनशील वापर – हे सगळं कलेचाच एक प्रकार आहे, सर्जनाचाच एक प्रकार आहे, हे मला भाऊंमुळे अगदी मनापासून पटलं.

## सज्जनशक्तीच्या विचारातून मैत्री

आमची पहिली ओळख झाली ती १९९२ च्या सुमारास. मला आणि आशा भोसले यांना जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात – आताचं कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात डी.लिट. दिली होती. तोपर्यंत माझा भाऊंशी वैयक्तिक परिचय नव्हता. आमचे मित्र डॉ. निम्बा ठाकरे कुलगुरू झाले, तेव्हा ह्या डी.लिट.च्यावेळी भवरलालजींनी आदरानं आम्हा दोघांना आमच्याकडे एक दिवस तरी थांबा, असं म्हणून ना. धों. महानोरांमार्फत आग्रहाचं आमंत्रण पाठवलं.

त्याआधी मी त्यांची सज्जन शक्ती ह्या विषयावर एक पुस्तिका नुकतीच वाचली होती, आणि ती मला अतिशय आवडली होती, आजच्या दुष्ट प्रवृत्तींवर चालणाऱ्या समाजात आपल्याला फार काही बदल करता येत नाही. पण निदान जे सज्जन लोक आहेत, त्यांनी तरी सगळ्यांनी एकत्रित आल्यास काहीतरी विधायक कार्य थोडफार तरी होऊ शकेल, हा भाऊंचा विचार मौलिक होता, तो मला पटला, कारण मी आतापर्यंत अनेक विद्यापीठांमध्ये, शिक्षणक्षेत्रात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला, कुठे कुठे वाईटपणाही घेतला खूप. पण भाऊंची सज्जनशक्ती एकत्र करणं ही जी दृष्टी आहे, ती लक्ष्यात आली नव्हती. त्या-त्या क्षेत्रात चांगले वाईट लोक असतातच, ते वेगळे करणं आणि आपल्या बाजूनं सज्जन घेतल्यानं एक दुर्दम्य शक्ती तयार होते, हे मला पटलं. एखादी चांगली गोष्ट शंभर लोकांनी केली तरच ती प्रभावी ठरते, त्यामुळे काहीतरी ठोस घडतं – एकेकट्यानं वेगवेगळ्या वेळी किंवा ठिकाणी केली तर तिचा फारसा परिणाम होत नाही.

त्यामुळे भवरलालजी जैन यांनी मला आमंत्रण दिलं, म्हणून इथे पहिल्यांदा जैन हिल्सवर मी आनंदानं आलो. त्यावेळी आमच्यात चांगल्या गप्पाही झाल्या, त्यावेळी आशा भोसलेसुद्धा होत्या. मला सांगवीला लगेच जायचं होते, त्यामुळे मी लवकर गेलो. पण त्यानंतर माझं जाणं-येणं सारखं वाढत गेलं. नंतर मी कामानिमित्त जेव्हा जेव्हा जळगावला विद्यापीठात यायचो तेव्हा त्यांना कसं कळायचं कुणाच ठाऊक. मला पुढे आमचं गाव सांगवीला – ते जवळच आहे एक अर्ध्यातासावर




*समारंभाचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना भवरलाल जैन, शेजारी डॉ. भालचंद्र नेमाडे व कवी ना. धों. महानोर*




मोठ्या भाऊंच्या जळगावातील निवासस्थानी गप्पांमध्ये रममाण झालेले डॉ. भालचंद्र नेमाडे, सौ. प्रतिभा नेमाडे आणि भवरलाल जैन.

– तिथे जायचं असायचं. भवरलाल भाऊ मला नेहमी नेहमी बोलावून घ्यायचे आणि आर्जवानं म्हणायचे की, इथे आमच्याकडेच थांबत चला. माझ्याकडे आधी आल्याशिवाय पुढे थेट जायचे नाही. तुम्ही रेल्वेनी या, विमानाने या... विद्यापीठाच्या कामाला या, सांगवीला गावी जा, पण भेटत जा. आमच्याकडे राहा. तुमच्याशी गप्पा मारल्या की बरं वाटत मला. मी स्वतः तुमची सगळी व्यवस्था करत जाईन. आम्ही तुम्हाला परत मुंबईच्या, दिल्लीच्या गाडीत बसवून देत जावू. मग मी त्यावेळी हो म्हणालो. तेव्हा ते म्हणाले, "नुसतं 'हो' नाही, वचन द्या." त्यांचं 'वचन द्या' हे मला फार घरच्यासारखं वाटलं. कारण काय ते मला पटलं, मी इथे उतरलो की, पुढे सांगवीला जाणं हे मुंबईहून-दिल्लीहून येण्याइतकंच तापदायक असतं. तेव्हापासून मी जैन कुटुंबाचा एक सभासद झालो. मग दर वेळी घाई असली तरी यांच्याकडे जाणं-येणं घरी गावातही असायचं. त्यानंतर गावी जातांना त्यांच्याकडे राहणं, हा एक नियमित कार्यक्रम ठरला. भाऊंनी माझ्यासाठी *अनुभूती* शाळेच्या आवारात स्वैंपाकघर वगैरे सोयी असलेलं एक क्वार्टर्ससुद्धा तयार करून दिलं होतं.

### श्यामची आई पुस्तक आम्हा दोघांच्या आवडीचे

अशीच एक त्या वेळेची गोष्ट मला आठवते आहे. भाऊ कांताई ऑफीसमध्ये त्यावेळी बसायचे, आणि काही तिथे लोक बसलेले असले की, मी बाजूला बसायचो. ते मला त्यांच्यासमोर बोलावून घ्यायचे. म्हणायचे, "या तुम्ही आत बसा इकडे. ऐका, आम्ही काही गुप्त बोलत नाही."




त्यावेळी एकदा कुठल्यातरी चर्चेत मध्येच ते मला म्हणाले की, "हे पहा *श्यामची आई* वर तुम्ही तुमच्या एका मुलाखतीत सांगितलेलं मी कुठे तरी वाचलं आहे. त्यात मराठीत श्यामची आई सर्वश्रेष्ठ पुस्तक आहे, असं सांगितलं होतं."

तेव्हा साने गुरूजींना मराठी समीक्षक तुच्छ लेखायचे त्यांची भावनाप्रधान भाषा रडकी आहे वगैरे वगैरे. पण मी ठासून सांगितले होतं की, हीच एक कादंबरी मराठीत टिकेल असं हे मौलिक, थोर पुस्तक आहे. अजूनही त्याच्या लाखो प्रती खपत असतात आणि जवळपास प्रत्येक सुशिक्षित मराठी माणसानं ती वाचली आहे, असं हे एकच पुस्तक असेल. *ज्ञानेश्वरी, तुकाराम* गाथेच्या खालोखाल ते घरोघर वाचलं जातं. हे माझं मत त्यांना फार पटलं होतं. भाऊ म्हणाले, "मी सुद्धा *श्यामची आई* मुळे प्रभावित झालो असून मला या पुस्तकानं घडवलं." ह्यामुळे मला त्यांच्याबद्दल आणखी प्रेम वाटायला लागलं. मी सुद्धा साने गुरुजींचा त्यांच्यासारख्या कर्तबगार उद्योगपती इतकाच भक्त आहे, याचा मला अभिमान वाटला. आमच्या दोघांमधला एक भक्कम दुवा राहिला.


### भाऊंचा परिसरवाद

मग कधी काहीतरी वृक्षारोपण कार्यक्रम असायचा. तेव्हा मी कधी नाही ते सकाळी लवकर उठून त्यांच्याबरोबर ह्या परिसरात झाडंही लावली आहेत. आता मी जेव्हा फिरायला जातो तेव्हा ती एवढी मोठी झालेली झाडं पाहून अतिशय गहिवरून जातो. कारण भाऊ आणि आम्ही गांधीतीर्थच्या मागे जी आंब्याची झाडं आहेत ती

मिळून लावलेली आहेत. मला माझ्या आईबरोबर लहानपणी आमच्या सांगवीच्या शेतात लावलेली झाडं आहेत, ती आता आठवून वाटतं, तसंच मला इथे भाऊंबरोबर ३०-३५ वर्षांची झालेली ती झाडं पाहून आज अतिशय आनंद होतो. आपण लावलेले जीव आपोआप कसे वाढतात, काहीही आपल्याला करावं लागत नाही. म्हणजे परिसरवाद जो काही आहे, तो मला इथे नेहमी तीव्रतेनं जाणवतो. भाऊंबरोबर केलेली ही मला नेहमी मोठी आनंददायक, अतिशय प्रेरणादायी गोष्ट वाटते.

## भाऊंचं कार्य अमर्याद

भाऊंनी एवढं अफाट काम केलं आहे की, आता मला नुसतं आठवायचं म्हटलं तरी कठीण जाईल. मी प्राध्यापक, शिकवतांना महाकाव्य म्हणजे काय, नाटक म्हणजे काय, पंधरा-पंधरा वीस-वीस मुद्दे माझ्या डोळ्यासमोर पाठ असतात, पण भाऊंनी एकूण उभारलेली कामं म्हटल्यावर मला ती इतकी अफाट वाटतात की, ती पंचवीस काय, चाळीस काय अमर्याद क्षेत्रं आहेत : शेती, उद्योग, व्यापार, संशोधन, अभियांत्रिकी, सतत चालणारी शिबिरं, शैक्षणिक, सामाजिक, ज्ञानाचा प्रसार, आरोग्य – यासह 'स्नेहाची शिदोरी' हे अन्नछत्र, चोपड्याजवळील गौऱ्यापाड्या या आदिवासी बांधवांसाठी केलेले प्रकल्प, नंतर इथल्या *गांधीतीर्थ* च्या माध्यमातून सुरू असलेलं सेवाकार्य तर खूप मोठं सांस्कृतिक कार्य आहे. *गांधीतीर्थ* मधे एक ग्रेट फोटो आहे : दुसरीकडे तो मी कुठेच पाहिला नव्हता. विनोबा भावेंचा. दांडी यात्रेच्या सत्याग्रहावेळी गांधीजी विनोबाजींच्या खांद्यावर धीराचा हात ठेवताहेत. विनोबा भावेंचा मी अतिशय मोठा भक्त आहे. त्यावेळचे जे गांधींजींच्या चेहऱ्यावर योद्ध्यासारखे भाव आणि विनोबांच्या चेहऱ्यावरील दृढनिश्चयी निर्भयता त्या फोटोत आली आहे, ते प्रत्येकानं पाहण्यासारखं आहे. एवढ्या मोठी जगात प्रथमच ब्रिटिश साम्राज्याचा ऱ्हास सुरु करणारी ही घटना दर्शवणारं हे चित्र मला अतिशय भावलं. तर अशा अनेक गोष्टी भाऊंनी तिथे जमवल्या आहेत, त्यातली आता आठवलेली ही एक सांगितली. भाऊंनी अशा कितीतरी कलाकृतींचा संग्रह करुन ठेवला आहे. साहित्य, कला असो, अध्यात्म बरेच काही, एकूण अनेक पुरस्कार, मेडल्स, शिष्यवृत्या अफाटच असं काम आहे. ही प्रगती तर आहेच, पण ह्या प्रगतीला निश्चित अशी विधायक दिशा आहे.



*ऑक्टोबर १९४० मध्ये वैय्यक्तिक सत्याग्रहाचे नेतृत्व करण्यासाठी विनोबा भावे यांची निवड करण्यात आली तेव्हा महात्मा गांधी विनोबाजींच्या खांद्यावर हात ठेवून आंदोलनाची दिशा समजून सांगताना.*

## भाऊ : दुर्मिळ व्यक्तिमत्त्व


भाऊंच्या उद्यानामधल्या वसंत वानखेडे कला दालनामुळे जळगावकरांना चित्रकलेचीही आवड निर्माण होऊ लागली आहे. जळगावमध्ये अशी गॅलरी नव्हती. आता जर निदान इथे कुणी पेंटर असला, तर त्याची चित्रं दाखवायची सोय झाली. चित्रं पाहणं हा एक मोठा अनुभव असतो. जळगावच्या लोकांना तो कधीच नव्हता. कलेशी नातं असणं, त्यातला अनुभव असणं फार महत्त्वाचं आहे. त्या सगळ्या अफाट गोष्टी भवरलाल भाऊंनी केल्या, आणि झाडं-झुडपं, पशु-पक्षी जे काही इथे – इतकं – ही एक सर्जनशीलताच आहे मला ती एक गौरवाची गोष्ट वाटते. भाऊ कसं एक दुर्मिळ व्यक्तिमत्त्व आहे, हे मी सगळीकडे सांगत असतो. आपल्या खानदेशात जळगाव शहरात असं व्यक्तिमत्त्व असणं, म्हणजे आपल्या सगळ्यांना खानदेशी लोकांना अभिमान वाटण्यासारखी गोष्ट आहे आणि भाऊंच्या कुटुंबातल्या पुढच्या पिढीनं हा वारसा टिकवला आहे, तो ते वाढवत आहेत, हीसुद्धा एक उत्साहवर्धक गोष्ट आहे.



*भाऊंचे उद्यान - जळगाव मधील वसंत वानखेडे कलादालन*

## भाषांतराचे वर्कशॉप

आता मला एक आठवतं आहे की, भाऊंनी एकदा सांगितलं होतं मला, "काही कार्यक्रम करायचे असतील तर इथे करत जा, तुमची सगळी व्यवस्था आम्ही इथे करु." मी माझ्या अखत्यारीतले शक्य ते कार्यक्रम फक्त दिल्ली किंवा मुंबईत न करता छोट्या-छोट्या ठिकाणी जिथे कानाकोपऱ्यातल्या दुर्लक्षित लोकांना कधीच ऐकायला मिळत नाहीत अशा


गांधीतीर्थ मधील ग्रंथालयात डॉ. भवरलाल जैन

आसाम, लक्षद्वीप वगैरे ठिकाणी केंद्र सरकारचा रोष पत्करून करायचो. गडचिरोली, चंद्रपूर या ठिकाणी पण मी असे काही कार्यक्रम, सेमिनार वगैरे तिथल्या लोकांना ऐकायला-पाहायला मिळावे म्हणून केले.

तर त्यानुसार एक साहित्य अकादमीचं भाषांतराचं वर्कशॉप जैन हिल्स येथे घेतलं होतं. मराठीतून, हिंदीत, कोकणीत, गुजराथीत, गुजराथीतून राजस्थानीत, राजस्थानीतून हिंदीत वगैरे भाषांतर करणारे चाळीसेक भाषांतरकार लेखक आमंत्रित होते. ह्या कार्यशाळेच्या उद्‌घाटनाला आमंत्रित म्हणून त्यावेळी भाऊ अध्यक्षस्थानी होते. भाऊ त्यावेळी भाषांतरावर इतके चांगले बोलले, त्यांनी किती वाचलं असेल, याची कल्पना सर्वांना आली. त्यांच्या स्वतःच्या क्षेत्राबद्दल तर ते उत्कृष्ट बोलले. मला त्यांचं एक वाक्य आठवतं, भाषांतर म्हणजे काय ह्या विषयी ते खरं चिंतन वाटलं. ते म्हणाले की, “भाषांतर म्हणजे जे आपल्या भाषेत नसतं, समाजात नसतं ते दुसरीकडून आणणं. तरच आपण त्यांच्यासारखे होतो.” मला ते अतिशय आवडलं. आपण भाषांतरात नेमकं हेच करतं असतो. आपल्याकडे नाही ते आणायचं, जे आपल्यात आहे ते आणण्यात काही अर्थ नाही. म्हणून इंग्रजीत समजा शेक्सपिअरसारखा आपल्याकडे एवढा मोठा नाटककार नाही तो नेमका मराठीत आणणं. त्याप्रमाणे भाषांतरमीमांसेत एक मोठा सिद्धांत आहे : तुमच्या भाषेत जे नाही आणि दुसरीकडे जे काही वाचलं ते शब्द असो, वाक्य असो, एखादी प्रतिमा असते, एखादा फॉर्म असो – ते सर्व आयात करणं, हे एक महत्त्वाचं काम असतं.

एकदा आमचं असंही बोलणं झालं होतं : इथे विद्यापीठामध्ये भाऊंनी गांधी अध्यासन केंद्र सुरू केलं होतं, त्याबद्दल बोलणं चाललं होतं. ते समाधानकारक वाटत नव्हतं. मराठीला अभिजात भाषा म्हणून मान्यता मिळवून देण्याच्या सरकारी कमिटीचा मी भाषाशास्त्रज्ञ म्हणून एक सदस्य होतो. तर मी असं सुचवलं की, भाऊ, आपलं एवढं मोठं गुरुकुल आहे. जैन संन्याशीही इथे येत-जात असतात. जीला जैन महाराष्ट्रीही म्हणतात ती प्राकृत भाषा ही मराठीची जननी आहे. महाराष्ट्री प्राकृत भाषा माझ्या जिव्हाळ्याचा विषय आहे. आपल्याकडे मराठीच्या खालोखाल महाराष्ट्री प्राकृत शिकवली गेली पाहिजे. तर आपण जळगावात प्राकृत विद्यापीठ का काढू नये? आणि मुख्य म्हणजे या प्राकृत भाषेत विशेषतः इसवी सनाच्या आधीपासून तर दहाव्या शतकापर्यंत आणि नंतरही सगळे महाराष्ट्री प्राकृतचे मोठमोठे लेखक जैन होते. कोषवाङ्‌मय, व्याकरणं, औषधशास्त्र, कथाकादंबऱ्या, कविता, अध्यात्म इतर बाकीच्या क्षेत्रांत त्यांनी खूप मोलाचं वाङ्‌मय लिहून ठेवलं आहे. ते आपण दुर्दैवानं विसरलो संस्कृतचं प्रस्थ वाढल्यामुळे. संस्कृत इतकीच प्राकृतही समृद्ध भाषा आहे. ते प्राकृत विद्यापीठ इथे सुरू करू. तेव्हा ते उत्साहात म्हणाले, “असं करा नेमाडे, तुम्ही अशा प्रस्तावाची एक नोट तयार करून मला द्या.” प्राकृतचं विद्यापीठ कां आवश्यक आहे त्यावर ती नोट त्यांच्याकडे कुठंतरी असेल. कारण आता एकदोन ठिकाणी काहीतरी पाठशाळेसारखी प्राकृतची विद्यालयं चालतात. पूर्ण प्राकृत भाषा विषय शिकवणारी संशोधन करणारी अशी युनिव्हर्सिटी नाही. सोलापूरच्या विद्यापीठात हल्ली एक विषय शिकवला जातो. पण असा एक अनिवार्य पेपर मराठी विभागांमध्ये सर्व विद्यापीठांत सगळीकडे पाहिजे.

एकूण भाऊंना पटलं होतं की, प्राकृत भाषेचं एक विद्यापीठ महाराष्ट्रात आवश्यक आहे. याचे मॉडेल्स पण दाखविले मी त्यांना काही. सुरूवातीला पंधरा ते वीस लोक फक्त आपल्याला नेमावे लागतील. यू.जी.सी.ची ग्रॅण्टही आपल्याला नक्की मिळेल. हळूहळू प्राकृतचं महत्व आपल्याला वाढवता येईलं. ह्या मराठी प्राकृत विद्यापीठाची त्यांना मोठी आस्था होती. ते आता त्यांच्या बरोबर गेलं. सोलापूरच्या एका प्राकृतच्या विद्वान शास्त्रींशी भाऊंची काही चर्चाही झाल्याचं आठवतं, साहित्य अकादमीतर्फे आम्ही त्यांना पुरस्कारही दिला आहे, असं एक मोठं प्रोजेक्ट आमचं त्यावेळी ठरलं होतं.

आणखीन भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन ट्रस्टतर्फे दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांची आधी जी पद्धत होती पुरस्कार द्यायची, त्याबद्दल नाराजीनं ते मला एकदा म्हणाले की, “नेमाडे, आमच्या साहित्य विषयक पुरस्काराचं जरा बघा.” म्हटलं, मी आता खूप कामात आहे. तिकडे खूप कामं असायची. पंचवीस तीस गोष्टी माझ्याकडे असायच्या. मिनिस्ट्री ऑफ ह्यूमन रिसोर्सेस, डिपार्टमेंट ऑफ कल्चर...नंतर साहित्य अकादमी, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्सड स्टडी वगैरेंचे मी खूप प्रोजेक्ट सुरू केले होते. तेव्हा उत्साहही खूप असायचा. तर त्यावर रागावून विनोदान ते म्हणाले, “चार महिने मोठा आहे ना मी तुमच्यापेक्षा ...मग तुम्हाला हे करावं लागेल.” म्हटलं, चला या निमित्तानं आपल्याला इकडेही काही काम करता येईल. मग आम्ही पुरस्कार कसे द्यायचे याची एक नवी पद्धत तयार केली : पहिल्यांदा महाराष्ट्रभराच्या चार पाचशे लोकांना पत्रं पाठवायची आणि शिफारसी मागवायच्या, मग प्रौढ अनुभवी अशा लोकांची एक समिती करायची. त्यांनी सगळीकडून आलेल्या शिफारसींमधून उत्तम अशा निवडक लेखकांची निवड करायची. शेवटी पुरस्कार अध्यक्षांनी सर्वमान्य नावं निवडून मग ते पुरस्कार जाहीर करायचे. ह्या पद्धतीत एकालाच कुणाला आपलंच

मत चालवता येत नाही. पण निदान त्यातल्या त्यात आपण ज्यांना देतो, ते सर्वांची मान्यता असलेले असावेत - अशी एक पुरस्कार वितरणाची नवी पद्धत आम्ही सुरू केली.

आणखी मला असं वाटतं आमच्या बोलण्यात आपली एक मोठी लायब्ररी असणं आवश्यक आहे असा विषय निघाला होता. गांधीतीर्थची लायब्ररी त्या स्वरूपात आपोआपच झाली आहे. पण एक मोठी लायब्ररी असणं त्यांना पण पटलं होतं, की आपल्याकडे जळगावात एक अशी लायब्ररी पाहिजे, जिथे प्रत्येक आवश्यक पुस्तक मिळालं पाहिजे. एखादं पुस्तक असं असतं की ते कधी पुढे अनेक पिढ्यांनंतर मोठी व्यक्ती निर्माण करू शकतं. हेही त्यांना पटलं होतं. असे खूप नवे-नवे विचार त्यांना पटायचे आणि ते मान्य करायचे.

आणखी मला आठवतंय पाहा की, मी शिमल्याला असताना जळगावला ती आणि मी हे आत्मकथन भाऊंनी लिहायला घेतलं होतं. त्यावेळी मी शिमल्यातील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ अॅडव्हान्सड स्टडी ह्या संस्थेत नॅशनल फेलो होतो. तिथे राहायचं आणि आपापलं काम करायचं, एक दिवस फक्त तिथे तरूण संशोधक प्राध्यापकांना शिकवायचं वगैरे असं काम असतं. तर त्यावेळी ते मला त्यांच्या ह्या आत्मकथनाची लिहून झालेली पानं पाठवायचे. तिथे शिमल्यातही एक ऑफिस आहे जैन इरिगेशनचं. तिथला माणूस मला ती आणून द्यायचा आणि मी तपासून दुरुस्त्या वगैरे केलेली पानं पुन्हा येऊन घेऊनही जायचा आणि भाऊंना जळगावला पाठवायचा. त्यामुळे मला काही त्रास होत नव्हता, पण मी लिहून पाठवलेल्यात काही स्पष्टीकरण वगैरे मला विचारायचा त्यांनाच त्रास होत असावा. म्हणून ते एकदा मला म्हणाले, 'हे पहा नेमाडे! तुम्ही तुमचं जुनं हे सगळं आता सोडून द्या, आता तुम्हाला एक मोबाईल मी पाठवून देतो, त्याच्यावर आपण बोलत जाऊ. म्हणजे काय होईल, मला लिहितांनाही त्याचा उपयोग होत जाईल, काही दुरुस्त्या वगैरे करायच्या, वाटलं तर काही फरक करायचा त्या मजकुरात याच्याबद्दलही आपलं बोलणं होत जाईल वगैरे. नंतर लगेच त्यांनी एक भारी मोबाईलही त्यांच्या तिथल्या माणसाकडून माझ्या क्वार्टर्सवर आणून दिला.

त्या मोबाईलमध्ये इतक्या काही गोष्टी करता येत होत्या, की मला त्या काहीच माहीत नव्हत्या. फक्त मोबाईलवर त्यांचा कॉल आला, की ऐकणं आणि हॅलो हॅलो करून बोलणं एवढचं मला करता यायचं... तेवढंच ते मी वापरायचो त्यातलं. पण तो भारी मोबाईल मी अधूनमधून दुसरीकडेही वापरायला सुरूवात केल्यावर इतक्या लोकांना तो नंबर कळला, की मला काही कळेना की एकाला माझा नंबर कळला की तो शंभर लोकांना कसा आठवडाभरात कळला असेल. तर मग मला सगळीकडून इतके फोन यायला लागले की,



*साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्यानंतर डॉ. भालचंद्र नेमाडे यांचा पुष्पगुच्छ देऊन डॉ. भवरलाल जैन सत्कार करताना.*

तासातासाला "सर, मला मुलगा झाला," किंवा "नेमाडे, मी इथे इथे व्हाइसचॅन्सलर झालो. तुम्हाला इथे एकदा तरी यावं लागेल" आता केरळ पासून.. म्हणजे गोव्यातून मी होतो तिथून तिथून सगळीकडून तिकडे आसामात इकडे मुंबई, पुणे सगळीकडे आमचे विद्यार्थी मित्र, वाचक होते ते केव्हाही फोन करायला लागले आणि माझं कामच होईना मग... त्यावेळी हिंदू कादंबरी लिहित होतो मी ...तीस पस्तीस वर्षं वेळेअभावी पडून राहिलेलं, आता काही झालं तरी संपवलंच पाहिजे असं मी ठरवून काढलेलं ते काम. त्यात ह्या मोबाईलचा व्यत्यय सतत. तर मी भाऊंना कळवळून म्हटलं की, "भाऊ हे घेऊन जा लफडं परत. नको मला ते. परवडत नाहीये, इतके लोक सारखे त्रास देताहेत. माझ्याकडचा नेहमीचा आमच्या ऑफीसातला जूना लॅण्डलाईनच बरा." तर ते हसले आणि म्हणाले," छान, ठीक आहे." ती आणि मी च्या काळातला ही एक मजेदार आठवण आणि अनुभव आहे.

*ती आणि मी* च्या वेळेस आणखी एक असा अनुभव आहे की, भाऊ जे लहानपणापासूनच्या त्यांच्या घरातल्या बाहेरच्या घटना, प्रसंग वगैरे लिहून पाठवायचे त्यांत त्यांचे अतिशय कडू, गोड अनुभव, प्रत्यक्ष त्यांनी भोगलेले विशेषत: पूर्वीच्या काळातले – ते विद्यार्थी असतांना वाकोद पासूनचे ते बदल, तरूणपणातले.. ते विषय अगदी अनन्यसाधारण, ह्रदयस्पर्शी असे होते. तर मी त्यांना म्हणायचो की तुम्ही हे जास्तीत जास्त लिहा आणि ते तुमच्या 'मेकींग ऑफ मॅन' म्हणतात ना त्यात फार मोलाचे आहेत. मोठा माणूस कसा परिस्थितीतून तयार होत जातो, ते त्यात पहिल्यांदा मला दिसलं. ते म्हणायचे, "मी आहे ते लिहितो." अगदी घरातल्या खाजगी गोष्टीही ते आत्मकथनात लिहून पाठवायचे आणि त्यावरही आमची चर्चा






ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर झाल्यानंतर डॉ. भालचंद्र नेमाडे व सौ. प्रतिभा नेमाडे यांचा निवासस्थानी श्री गणेशाची मूर्ती देऊन सत्कार करतांना शेजारी डॉ. भवरलाल जैन, निशा जैन, शोभना जैन, अशोक जैन, अथांग जैन आणि अभंग जैन.

चालायची. ते म्हणायचे, मी तुम्हाला घरातलाच एक समजतो, त्यामुळे सरळ सांगत चला काय वाटलं ते. तरी त्यांना मी लहानपणी त्यांची मुलं कशी वागायची, नंतर मग घरातलं वातावरण, लग्नाच्या वेळच्या भानगडी – या सगळ्या गोष्टी मी त्यांना बऱ्याच बदलून लिहायला भाग पाडलं.

त्यांनाही हे पटलं की, आत्मचरित्र हा लिटररी फॉर्म आहे. केवळ सब्जेक्टिव्ह लिहू नये. आत्मचरित्र आणि चरित्र यांच्यात फरक आहे. चरित्र मी जेव्हा लिहितो तेव्हा मला जे काही दिसतं ते सगळं आहे तसं मी मांडायला पाहिजे. पण आत्मचरित्र असं आहे की, त्यात तुम्ही तुमच्या स्वत:च्या जीवनाकडे पाहतांना जरी खरं सांगता, तरी त्यातलं आपलं खाजगी आयुष्य हे नंतर वाचणाऱ्या वाचकांसाठी मुख्यत: आपण सार्वजनिक करतो. आणि आपल्याला जीवनाचा जो अर्थ कळला, त्याचा बोध त्यांनी घ्यायला पाहिजे त्याकडे आपलं जास्त लक्ष असायला पाहिजे. त्यामुळे आपल्याला जे बारीकसारीक वैयक्तिक डिटेल्स महत्त्वाचे वाटले, तरी ते सार्वजनिक करणं एखाद्या वेळेस आपल्यालाच पुढे त्रासदायक ठरू शकतं. वाचकाला काही गरजही नसते त्यांची. मी फक्त तुम्हाला पॉइंट आऊट करतो, ते तुम्हाला पटलं तर ठेवत चला, नाही तर नाही. ह्यावर ते म्हणाले, तुम्हाला जसं वाटतं तसं बिनधास्तपणे मला कळवत चला. तुम्हाला जे जे बरोबर वाटत नाही, ते स्पष्टपणे कळवत चला आणि त्याप्रमाणे ते मी दुरुस्त करत जाईन. असं पाचसहा महिन्यात सविस्तर चर्चा करत *ती आणि मी* सबंध पुस्तक व्यवस्थितपणे लिहून झालं, आणि माझ्या मते ते पुस्तक अतिशय चांगलं झालं. मला आवडलं. इतर भाषांमध्येही ते भाषांतरीत व्हायला पाहिजे, कारण भाऊंसारखं




व्यक्तिमत्व सर्व देशभर माहीत झालं पाहिजे, या मताचा मी होतो. म्हणून ते हिंदीत मी स्वत: माझे प्रकाशक राजकमल प्रकाशनाचे अशोक माहेश्वरी – हे मोठे प्रकाशक हिंदीतले, त्यांच्याकडून भाऊंना लगेच प्रकाशित करायला लावलं. ते इतर भाषांमध्येही यायला पाहिजे होतं. पण त्यांचे खूप उद्योग होते आणि मी ही तिकडे आसामकडे अनेक भानगडीत शिमल्याच्या संशोधन प्रकल्पात अडकलेला. त्यात पुन्हा माझं स्वत:चं *हिंदू* – पुढचे भाग लिहिणं राहून गेलं. *हिंदू* चा पुढला भाग जैन हिल्सवर बसून संपवाच, असा त्यांचा फार आग्रह होता आणि मी त्यांना तसं वचनही दिलं होतं. पण दुर्दैवानं तो योग ते असेपर्यंत सिद्धीला गेला नाही.

एक मोठी आठवण : *हिंदू* : जगण्याची समृद्ध अडगळ प्रसिद्ध झाल्याबरोबर त्यांनी ती वाचली आणि तिच्या पाचशे प्रती एकदम प्रकाशकाकडून विकत घेऊन त्यांच्या मित्रांना, परिचितांना भेट पाठवल्या. किती मी हा. –

### भवरलाल भाऊ शेतकरी

आणखी एक माझी अगदी आतली आठवण अशी की, मला जेव्हा सुवर्ण महोत्सवी ज्ञानपीठ मिळालं तेव्हा आमच्या गावी सांगवीला एक कार्यक्रम तिथल्या ग्रामपंचायतच्या लोकांनी केला. ती नवीन पोरं आहेत, त्यांना फार आनंद झाला आपल्या गावचाच तो सन्मान आहे म्हणून. मलाही वाटलं की आपण जावं तिथे कारण त्यांनी माझं नाव देऊन तिथल्या शाळेचं नामकरण केलं. उद्योगपती भवरलाल माझे मित्र आहेत, हे त्यांना माहीत होतं. कारण आमच्या गावातलं केळींचं बरंच काम जैन ॲग्रीवर चालतं. त्यामुळे त्यांनी भवरलाल भाऊंना अध्यक्ष बोलावलं. भाऊही ताबडतोब आले

आणि त्यांच्याच हस्ते ते नामकरण वगैरे झालं. तर त्यावेळी ते आमच्या राहत्या घरी आले आणि तिथून चहा वगैरे घेऊन मग आम्ही शाळेत गेलो. त्यावेळी मला माझ्या वडिलांची तीव्रतेनं आठवण झाली, कारण माझे वडील पूर्वी त्यांच्या फार आठवणी काढायचे. आमच्या सांगवीची सगळी शेतकरी मंडळी जी पारावर गप्पा छाटत त्यांत वडीलांसह सगळे भवरलाल भाऊंचं सारखं कौतुक करायचे की, पहा एका सामान्य कुटुंबातल्या शेतकऱ्यानं केवढं हे आपल्या शेतकऱ्यांसाठी काम केलं आहे. ते मला तेव्हा काही माहीत नव्हते, कोण आहे भवरलाल जैन? पण भवरलाल भाऊ ..भवरलाल भाऊ नाव सारखं... त्यांच्या तोंडातून यायचं. आता तेच भवरलाल प्रत्यक्ष आमच्या घरीच जेव्हा आले तेव्हा आमचे वडील नेमके नाहीत. आधीच अकाली वारलेले. एक फोटो फक्त भिंतीवर. त्यावेळी मला सारखी आमच्या वडिलांची आठवण आली की, आता आमचे वडील असते तर त्यांना किती आनंद झाला असता. माझ्याबद्दलही त्यांना अभिमान वाटला असता की, पहा, त्यांना जो वाटायचा इतका मोठा शेतकरी तो आपल्या मुलामुळे आपल्या घरी आला आहे.

मला सारखं असं वाटतं की, भाऊंना एक देणगीच होती अशी काहीतरी... इनस्टिन्क्ट - अंत:प्रेरणेसारखी, की आपण इतरांसाठी काही केलं पाहिजे. म्हणजे आपल्यासाठी जे आहे, ते इतरांनासुद्धा द्यावं. हीच जैन महात्म्यांचीही प्राचीन काळापासून शिकवण आहे की, आपल्यातला थोडातरी वाटा इतरांना दिला पाहिजे - पवित्र दानकर्म म्हणून. मला सारखं वाटायचं की एवढं त्यांनी उभं केलं ते इतरांशी जोडून घेण्याची संवेदनशीलता अंगी होती म्हणून. ही संवेदनशीलता फार कमी लोकांमध्ये असते. तर हे मला भाऊंच्या एकूण जीवनशैलीचं एक उदाहरण म्हणून सांगता येईल की, त्यांनी स्वत:मध्ये इतरांना सामावून घेण्याच्या प्रक्रियेमध्ये फार मोठमोठ्या गोष्टी निर्माण करून ठेवल्या. त्यावेळी एकट्यापुरत्या मिळकती त्यांनी खूपच केल्या असत्या आणि ते आणखी वर गेले असते. त्या पण इतरांसाठी देखील त्यांनी खूप केलं - हजारोंना रोजगारापासून वृक्ष संवर्धनापर्यंत आणि मोठ्या प्रमाणावर यशस्वी झाले.



*डॉ. भवरलाल जैन यांनी लिहिलेल्या 'ती आणि मी' या पुस्तकाच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. भालचंद्र नेमाडे ,सौ. विजया राजाध्यक्ष आणि भवरलाल जैन*

आम्ही ज्याला भाऊंचा धक्का म्हणायचो तिथे आता अशोकभाऊंनी फार सुंदर परिसर केला आहे तो म्हणजे 'श्रद्धाधाम.' तिथे पंचमहा णमोकार कोरलेले आहेत. त्यात शेवटचा एक असा आहे. *लोए सव्वसाहूणं* म्हणजे सर्व साधू / सज्जन लोकांना नमस्कार असो. मला वाटतं की भाऊंच्या जीवनाचं तेसुद्धा एक तत्त्व असावं. तिर्थ संभ्रमम साधुनाम हे मोठं जैन तत्त्व आहे, ते भाऊंनी पाळलं. ते आपल्या सगळ्या संस्कृतीला धरून आहे, कारण आपल्याकडे बौद्ध धर्म धरून सगळेच नंतरचे धर्म हे जैन आगमांनी प्रभावित झालेले आहेत. त्यामुळे हा मंत्र आपल्याला अतिशय उपयोगी आहे. आजही हे सर्व साहूंना जवळ घेणं हे फार आवश्यक आहे आणि भाऊंनी हे जे जळगावमध्ये अनेक क्षेत्रांमध्ये अफाट काम केलं आहे, ते आपल्या सगळयांना अनुकरणीय ठरेल.

मी कुठेही गेलो तरी - अगदी काझीरंगा अभयारण्याकडे जातांनासुद्धा कुठेही रस्त्यावर अचानक जैन इरिगेशनची पाटी दिसली. - ठिबक सिंचन वगैरे आणि मला अभिमान वाटतो. भाऊंनी अनेकांच्या आयुष्याचं भलं व्हावं इतक्या संधी अनेक क्षेत्रात निर्माण करून ठेवल्या आहेत. एकाच माणसाला अशक्य अशा अनेक क्षेत्रांमध्ये जी काही त्यांची कामगिरी दिसते, त्यामागे कष्ट तर आहेतच पण आणखी खूप विकासाच्याही शक्यता आहेत. या पाठीमागे कौतुकास्पद दूरदृष्टी दिसते. ठिबक सिंचन कशामुळे, तर पुढे उद्या पाण्याचा प्रॉब्लेम होणारच आहे. विजेसाठी सोलर सिस्टीमचा जो काही उपक्रम त्यांनी चालू केला तो कशामुळे, तर उद्या आपल्याकडे इंधनाची मोठी समस्या येणार आहे. मी काही फार मोठा तज्ज्ञ नाही, पण मला वाटतं की अगदी परिसरवाद घेतला, पाण्याचे प्रश्न घेतले. शेतीचे प्रश्न घेतले, तर ह्या सगळ्यांमध्ये भविष्यातले खाण्यापिण्याचे आरोग्याचे प्रश्न आहेत. इथला सगळा परिसर सुद्धा त्यांच्या ह्या दूरदृष्टीवर उभारलेला आहे. त्यामुळे मला त्यांचा सगळ्यात मोठा अत्यंत आदरणीय वाटतो असा हा दूरदृष्टीचा गुण आहे. खानदेशात तर सोडाच पण महाराष्ट्रात आणि हिंदुस्थानातसुद्धा हा गुण दुर्मिळच आहे. आजच्यापुरतं फक्त पहायचं, आपण बेफिकीर होऊन स्वत:चा फायदा करून घ्यायचा, पुढची पिढी मरे ना का - ही वृत्ती आज सर्व क्षेत्रांत दिसते. आपण पुढच्याही पिढीचं देणं लागतो, ही दूरदृष्टी त्यांच्या जीवनशैलीत दिसते, ती मला अतिशय वंदनीय वाटते आणि जरी आमचे मैत्रीचे संबंध असले तरी मला अतिशय आदरणीय आणि सतत आपल्या समोर आदर्श ठेवून वागावं असं हे व्यक्तिमत्त्व वाटतं.

शेवटून भवरलाल भाऊंची एक आठवण सांगावशी वाटते : त्या वेळी मी दोनेकवर्षं एक्स झेड पोलीस संरक्षणात असतांना जैन हिल्सवर येण्याचा योग आला. तेव्हा माझ्याबरोबर कायम हत्यारबंद पोलिस पाहून आणि माझी अस्वस्थता ओळखून भाऊ म्हणाले, "नेमाडे मी तुमच्यापेक्षा चार महिन्यांनी मोठा आहे, त्यामुळे तुम्हांला माझं ऐकावंच लागेल. तुम्ही तुमच्या भक्तांच्या गर्दीपायी भाषणं देणं, मुलाखती देणं यासह सर्व उद्योग बंद करून आता फक्त लिहिण्याकडे लक्ष द्या."

फक्त लिहा – असं माझा जवळचा मित्रच मला हक्कानं सांगू शकतो.



# भाऊ : प्रतिभावंत शेतकरी

- ना. धों. महानोर

आदरणीय भवरलालभाऊ एक अत्यंत कष्टाळू, निष्ठावंत आणि प्रतिभावंत शेतकरी. ज्यांनी हजारो शेतकरी उभे केले. मीही शेतकरी. माझा आणि त्यांचाही जीव शेतीत गुंतलेला. आपल्या मायभूमीच्या हिरवाईत गुंफलेला! भाऊंच आणि माझं नात काय तरी आहे? भाऊंच्या विषयी बोलत असताना माझ्या एका कवितेच्या चार ओळी आणि दुसऱ्या एका कवितेच्या चार ओळी हे जर लक्षात घेतल्या तर भाऊंचं जगणच समोर दिसू लागतं.

**"या शेताने लळा लावला असा असा की**
**सुखदुखांना परस्परांशी हसलो रडलो**
**आता तर हा जीवच अवघा जखडला**
**मी त्याच्या हिरव्या बोलीचा शब्द जाहलो."**

आणि हे मूळ सूत्र आहे. कवितेच सूत्र किर्तनकारांप्रमाणे दृष्टांत-दाखल्यासह रसाळ निरूपण केलं तर ते एक तासही होऊ शकतं. हिरव्यागार नंदनवनाचे सृजनकर्ते भाऊंनी जे निर्माण केल त्याविषयी आपल्याला निश्चितच अभिमान वाटतो. आमच्या दोघांच्या मैत्रभावाला या सृजनसृष्टीने जोडलं, शेती-माती 'पिकपाणी' हेच आमचं आयुष्य आणि आमच्या पुढील पिढीचाही हाच वसा आणि हाच वारसा!

मी माझ्या मुलखात नांदतो ऐश्वर्याचा राजा हे ऐश्वर्य झाडाझुडपाचं, मातीच आणि टिळ्याचं आहे. ते ऐश्वर्य काही इमारतीचं आणि पैशाचं नाही.

**"मी माझ्या मुलखात नांदतो ऐश्वर्याचा राजा**
**इथल्या मातीमध्ये रूजवल्या चैतन्याच्या बागा**
**इथले राघू-मैना सगळीकडे पसरवीत हिरवी ग्वाही**
**झुलत झुलत मस्तीत बुडाले गाणी आणि कवीही"**

आणि अशा अवस्थेतल्या हिरव्या सृष्टीच्या रूपाचा हा भाग मी माझ्या

कवितेत मांडू शकलो. शेतकऱ्याची कविताही आहेच, मातीची आहे. ह्या बलदंड महाराष्ट्राच्या-देशाच्या शेतकऱ्याची म्हणूनच मला ही कविता सातासमुद्रापार घेऊन गेली. कारण सगळ्या जगाच रहस्य सार रूप शेतीत आणि पाण्यात दडलेलं आहे.

पाच वर्षापूर्वी प्रत्यक्ष पाहिलेलं आहे, पण ते गेले आहेत असं वाटतच नाही, आठवणी सांगताना कंठ दाटून येतो. अनेक गोष्टींचा गुंता मनात गरगर करीत राहतो. आठवणी सांगता येतील, नाही असं नाही मात्र संपूर्ण सांगणं इतक अवाढव्य आहे की, त्याचा व्याप आणि विस्तार खूप मोठा आहे इतके आम्ही आयुष्यभर एकमेकांच्या सोबत आहोत. साठ-सत्तर वर्षांचा कालावधी. वाकोद आणि पळसखेड तसं अंतर दोन किलोमीटरचं फक्त. अजिंठ्याच्या पायथ्याशी भाऊंच गाव वाकोद. माझं गावं शेजारीच पळसखेड. दोन-तीन हजार लोकवस्तीची गाव. शंभर-दोनशे घर त्याकाळची बांधलेली. कुठल्याही अत्याधुनिक सोयी नाहीत, शेतीचे कष्ट आणि खेडयातलं ते निर्मळ जीवन. निसर्गसृष्टी, नदी-नाले. भाऊ वाकोदला होते. भाऊंचासुद्धा संपूर्ण परिवार महानोर परिवारातील प्रत्येक सदस्याला ओळखत होता. मी नेहमी 'दैवी' हा शब्द वापरतो. सगळे घरी असले की सुखानं जगणं. काय असतं हे पहायला मिळायचं. आनंदाने फिरण आणि जगणं आनंदाने व्यतीत करणं. सगळया कुटुंबियांना आणि मित्रांना घेऊन चालणं. हे जे होतं ते भाऊंच्या दृष्टीने जसं वाकोदला तसं माझ्या दृष्टीने पळसखेडलाही होतं. माझंही कुटंब मोठं. आम्हीही सर्वसाधारण परिस्थितीतले गरिबीतून आम्ही आलो. पण तसं



आम्ही कधी कुठे जाणवू दिलं नाही. भाऊंच्या घरी तिथे गेलो. वाकोदला ते तिथे शाळेत असायचे. मोठ्याभाऊंच्या वडिलांची हिरालालजींची आणि माझ्या वडिलांची ओळख. आर्थिक परिस्थिती सर्वसाधारण असली दोघाही परिवाराची तरी ऋणानुबंध घट्ट होते. शेंदुर्णीसारख्या ठिकाणी तेथे काही शेतमालाची विक्री करीत असतं, आमचंही तसंच. त्यांच्या वडिलांनी जसा छोटामोठा धंदा केला. तसंच मी शेती जसं वाडवडिलांनी केलं तसं आमच्या घरी बागायती जमिनी केल्या आणि त्यावेळी नात्याची गुंफण मजबूत होती, अर्थात आजही आहे. वाकोदला गेलो आम्ही तर त्यांच्या घरी जायचो. पळसखेडला आमच्याकडेही ते यायचे. आमच्या गावी त्यांचे दोन-चार नातेवाईकही होते. त्याही वेळी त्यांच्याकडे जैन मुनींची प्रवचन असायची. आमच्याकडे दहा-बारा घर होती. एकमेकांच्या घरी जायचो. साधुसंताची आणि जैनमुनींचा सत्संग-प्रवचने जशी वाकोदला होत होती तशी पळसखेडला संख्या मात्र जास्त होती. त्यांच्यामुळे त्यांचे कुटुंबच आमच्याकडे पळसखेडला यायचे. आम्हीसुद्धा त्यांच्या जैनमुनींची प्रवचनं ऐकायचो. अशा वेळी आई गौराई असायच्या. घरातल्या सगळया बायका यायच्या. हे सगळं ९ ते ११ झाल्यानंतर ते माझ्या घरी यायचे. आमच्या कुटुंबाशी गप्पा मारायचे. बाबा म्हणायचे माझ्याकडे म्हशीचे दूध आहे. तुम्ही दूध घ्या. दूध घेऊन ते निरोप घ्यायचे. आम्ही दोघेही श्रीमंतीने नांदत होतो असं नाही. आमचंही तसं नव्हतं. थोडीशी भाजी-भाकरी खाऊ. मात्र गुण्यागोविंदाने राहू ही समजउमज मात्र होती. तर ते जाणं येणं. मोठेभाऊ वाकोदला शिक्षण घेत होते, पुढे जळगाव त्यानंतर मुंबईला गेले. शिक्षणाने त्यांच्या परीने ते मोठे झाले. त्यांनी ते उच्चशिक्षण घेतलं. शेंदुर्णीला मी मॅट्रिक केलं आणि घरी आलो. शेतीत आणि रानात माझा जीवं गुंतला. शेती करायला सुरूवात केली. सगळयात महत्त्वाची गोष्ट अधोरेखित करायलाच हवी. भाऊंनी मोठं कुटुंब चालवण्यासाठी त्यांच्या बाकीच्या सगळया घटकांना जसं हया छोटयामोठया गोष्टी, शेतीची अवजारं वगैरे कापसाचे, शेंगांचे वगैरे असे छोटेमोठे उद्योग असे केले. त्याहीपेक्षा अतिशय परिश्रम वेचले. तशी त्यांची छोटी भरड जमीन होती. हलकी जमीन. माझी जमीनही शेतीसाठी होती. अजिंठाच्या पायथ्याशी भरड जमीन. जमिनी होत्या त्या. शेतीला माउलीच म्हणतो, काळ्या मातीची सेवा आपण केली पाहिजे. हे जे आईंच म्हणणं होतं. त्यांच्या आणि माझ्या आईचं सुद्धा हेचं म्हणणं होतं. गौराईंचंही म्हणणं तेचं होत. दोघांच्याही आईचे विचार सारखे. म्हणून आम्ही शेतीमध्ये ज्वारी-बाजरी पेरता-पेरता विहिरी खोद इकडचं पाणी आण, ते तिकडे टाक, असं सुरु असायचं. पिकांना पाणी वेळच्यावेळी मुबलक उपलब्ध असायचच असं नाही. दुष्काळ आला. पिके बऱ्याचदा उद्ध्वस्त झाली आणि आम्ही कर्जबाजारीही झालो. हा जो शाप असतो शेतकऱ्याला तो भाऊंनी आम्ही मी बरोबर भोगला. मी अनेक पाईपलाईन केल्या, नवीन प्रकल्प केले. आम्ही आधुनिक पद्धतीने शेती केली. भाऊ आणि मी कायम सोबत होतो आणि विशेषतः १९७२च्या दुष्काळानंतर अत्यंत कठीण काळात पाईपलाईनचे कामही झाले.



पळसखेड येथे ना. धों महानोर यांच्या शेतात झाडाला लागलेल्या सिताफळांची पाहणी करताना भवरलाल जैन शेजारी कवी महानोर.

वाकोदकडे येणारी पाईपलाईन केली. आधी छोट्या स्वरूपात, नंतर व्याप वाढत गेला. त्यांनी पाणी आणलं. त्यांनी फळबागा केल्या. आम्ही केळीही लावली मोठ्याभाऊंचं म्हणणं हेच असायचं की, “कठोर परिश्रमाला पर्याय नाही!” भाऊंनी जीवनमार्ग निश्चित केला होता. कृषिक्षेत्रात ध्येय उद्दिष्ट पक्की होती. नोकरी करायचीच नाही, याबाबत ठाम होते भाऊ. वेळप्रसंगी घरातील दागिने गहाण ठेवू-विकू पण शेतीच शेतीशिवाय देशाला भवितव्य नाही. शेतीइतकं पवित्र आणि सुंदर दुसरं असं काहीच नाही. सर्वांच्या उदरभरणासाठी, धनधान्य सुजलाम् सुफलाम् करण्यासाठी सगळयात सेवाभावी काही असेल तर ती शेतीच आहे. दुसरे काही नाही. भाऊंनी कष्टाचा मार्ग निवडला आणि अर्थातच मीही निवडला होताच. आम्ही एकाच क्षेत्रातले मित्र होतो. ‘एकमेकां साह्य’ हे आमचं ब्रीद होणं, कायम राहीलं. यश मिळेल नक्की विश्वास होता. माझ्या शेतात वैविध्यपूर्ण प्रयोग करीत असताना जे जे शक्य झालं, ते सारं काही केलं. शेतीसाठी पाणी मुलभूत विषय. भाऊंनी त्या दिशेने कायम संशोधन केलं, नवनवीन प्रयोग केले. पाण्याच्या योग्य पद्धतीने, योग्य वापराबाबत त्यांच्या आणि माझ्यातील विचारविनिमय मला आजही आठवतो. ज्वारी, बाजरी, मका होतीच या भागात. मोसंबीच्या संत्र्याच्या फळबागाही केल्या. कडुलिंबही लावलं. जे जे केलं ते विचारपूर्वक. भाऊंचा अभ्यास, भाऊंचं अवलोकन महत्त्वाचं होतचं. आमच्या एकमेकांच्या अनुभवाची जोडही महत्त्वाची होती. भाऊंची शेती पहायला मी जात असे आणि तेही पळसखेडच्या शेतशिवाराला भेट देत. आमचं नातं या निसर्गाने शेतीच्या माध्यमातून चैतन्यशील ठेवले वाढवले. शेती-मातीत सातत्याने अभ्यासपूर्ण प्रयोग करुन वैशिष्ट्यपूर्ण कामसिद्ध करण्याची भाऊंची जिद्द महत्त्वाची होती. भाऊंमध्ये नाविन्याची आवड असणारा शेतकरी दडलेला होता. प्रयोगशीलता हाच या शेतकऱ्याचा गुण होता. या गुणाला संशोधनांची साथ लाभली. उद्योजकाची दृष्टी होतीच. एकसंध मित्रत्व शेतीमाउलीमुळे होतं. आयुष्यात मूलभूत आणि महत्त्वाच्या बाबींमध्ये आमच्या दोघांच्याही अग्रस्थानी ‘शेती’ हाच विषय होता आणि आयुष्यभर राहिला. काही केलं नाही, इथून पळून गेलो तर ते हया देशातील धान्याचे-अन्नाचे प्रश्न कोण जनावरांचा चारा, घास कसा निर्माण होणार? शेती महत्त्वाची. शेतीने जगवलेली-जोपासलेली माणुसकी देणारा भूमिपुत्र आम्हाला आमच्या हृदयाचा साथीदार वाटला. महत्त्वाची ती ग्राम संस्कृती मोकळी. शहरीपणातील कृत्रिमता आम्हाला दोघांना कधीही भावली नाही. अन्नाचा घास हे सूत्र घेऊन मी आणि भाऊ जगलो. देश-विदेशातील कृषिप्रयोगांचं वाचन केलं होतं. मी माझ्या शेतीच्या संबंधामध्ये. अनुभव सांगायचे. दुष्काळ पाहिले होते. लदबदलेली पिके घेतली होती. फळबागा केल्या.

आर्थिक परिस्थिती सशक्त नव्हती, निसर्गाचीही फारशी नव्हती. जे जे काही केलं आहे ते अनेक पुस्तकं वाचूनही अनेकदा केलं. भाऊंच्या आणि त्यांच्या पत्नी कांताबाई यांनीही भाऊंप्रमाणे आमच्या परिवारातील सर्वांना आपलंस केलं.

काहीवेळा इतकी गंभीर परिस्थिती निर्माण होते की माणूस हतबल होतो. अक्षरश: दुबळा होतो. त्या काळात भाऊंनी बाईला आणि माझ्या कवितेने मला तारलं. शेतीचे नव नवे प्रयोग करीत असताना नवीन बियाणे, खते, नवीन यंत्रसामग्रीचा अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला. त्यावेळी सात रूपयांना सिमेंटची गोणी मिळत होती असा तो काळ होता. पाईपलाईन शेतकरी टाकणार, कसं होणार, एकुणच या कामाला मर्यादा होती आणि म्हणून त्यावेळी जळगावचा सहकारी केळी भुकटी कारखाना जो होता तर तो नेहमीप्रमाणे राज्यकर्त्यांनी नुकसानीमध्ये घातला होता. लिलाव निघाला भाऊंनी हिंमत करून पैसे नसताना टोकण दिलं. विश्वास निर्माण केला, आणि मी तुम्हाला पैसे वाट्टेल ते करून देतो अभिवचन दिलं आणि तो कारखाना घेतला. रात्रीचा दिवस करणं काय असतं, श्रम काय असतात हे जवळून पाहिलं आम्ही. भाऊ खूप परिश्रम घेत असत. घाम गाळणं काय असतं हे अनेकांना माहिती नाही. दारात पैसे मागायला आले की अपमान सहन करणं काय असतं हे सहन करणाऱ्यालाच माहिती. भाऊंनी सारा वनवास सहन केला. मित्र म्हणून सांगतो. मी ते काट्याकुट्यातले दिवसही जवळून पाहिले आहेत. अदम्य आपली इच्छाशक्ती, अदम्य अशा: अशा पद्धतीने भाऊ आघातावर आघात होत असताना सक्षमपणे उभे राहिले. दूरवर पाईपलाईनची सुविधा करणं, तीही रात्रीचा दिवस करुन करणं काय असतं, हे लोकांनी यावेळी पाहिलं. पाईपच्या कारखानामुळे भाऊंचं नशिब उजळलं आणि हा शेतीसाठी आधारित पाईप हे सूत्र झालं. सर्वांना माहीत आहे की कमी पाण्यावर, कमी अन्नावर, कमी गरजांवर माणूस जसं सुटसुटीत आणि छान जगतो तसं कमी पाण्यावर, कमी खतांवर झाडंही जगतात. हे सूत्र घेऊन जगातला सगळा सिद्धांत आणि आधुनिकता घेऊन परंपरेतलं सगळं चांगले घेऊन भाऊंनी शेतीत जळगावला शिरसोली रोडवर बरड माळरान विकत घेतलं. रुक्ष जागा. ओसाड जमीन. आज या जागेला जैन हिल्स म्हणतात. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय व्याप विस्तार असलेल्या जैन इरिगेशन कंपनीचं मुख्य कार्यालय जैन हिल्सवर आहे. निसर्गरम्य सृष्टीतील हिरवेगार चैतन्य पाहण्यासारखं कवी डॉ. राजेंद्र मलोसे यांची 'स्वप्नवेडा' कविता त्यात आहे हे वर्णन जैन हिल्स पूर्वी कसं होतं आणि आजकसं आहे. लोक हसायचे की आता या जागी विशेष असं काय होणार आहे, हा वेडा माणूस आहे. चांगल्या जमिनीत पिकत नाही आणि इथं बरड माळरानावर घेतली. वेगवेगळी फळं लावली. पाईप लावले ते जोडले आणि शास्त्रशुद्ध पद्धतीनं ठिबकने रोपांना पाणी दिले आणि वेगवेळ्या व्हरायटीज लावल्या देशी-विदेशी वाण आणले. आधुनिक जगातलं जे असेल तेही केलं. त्या काळात हे सारखं नवीन होते. ते सारं काही भाऊंनी केलं. लदबदलेली फुलं, फळं झाडं मिळाले, चार पैसेही मिळाले. लोकांनी जेव्हा प्रत्यक्ष डोळ्यांनी हे सारंकाही बघितलं, अनुभवलं त्यावेळी लोकांचा विश्वास बसला. विश्वास बसल्यानंतर भाऊ आनंदाने म्हणाले होते, "नामदेव, खरे सेवेचे काम हेच आहे. तू तुझ्या शेतीत प्रयोग कर, ठिबकचा पहिला प्रयोग आहे. तुझ्या शेतीतलं पाणी देतात अनेक लोक. शेतात आपण ठिबक सिंचन माध्यमात शास्त्रीय पद्धतीने पाणी द्यायला हवं. तुझ्या शेतात करू मोसंबी आणि नंतर



*जळगावातील जैन हिल्सवर झालेल्या 'डॉ. आप्पासाहेब पवार पुरस्कार' वितरण समारंभात शरद पवार यांच्या शेजारी डॉ. भवरलाल जैन आणि कवी ना. धों. महानोर.*

सीताफळावरचा प्रयोग किंवा नंतर अनेक फळांवरचा. १९८४ ते ८६ मध्ये जैन उद्योग समूहाने पळसखेडला पहिला प्रयोग केला. माझ्याकडे येणारे साहित्यिक, राजकारणी, शरदराव पवार, यशवंतराव चव्हाण असो किंवा कोणत्याही पक्षाचे नेते ज्यावेळी माझ्या कवितेमुळे पळसखेडला आले त्यांची जैन हिल्सवरील प्रयोगही जवळून पाहिले. विशेषतः शेतकऱ्यांनी पाहिले. जैन हिल्सवरील १० एकर, १०० एकर असे प्रयोग यशस्वी झाले आणि जे प्रयोग फसले तेही भाऊंनी सांगितले. काय करावे आणि काय करू नये हेसुद्धा भाऊंनी सांगितले. टेकड्या कापताना बुलडोझरमधून धूर निघतो आहे, दगड उडत आहेत. एकुणच सारेच आव्हानात्मक. सगळे म्हणायचे ही मरायची लक्षणं आहेत का? घरातले, दारातले सगळे जीव मुठीत घेतलेले मी पाहिले आहेत. भाऊ छोटीशी छत्री घ्यायचे, मला एक खुर्ची, त्यांची एक खुर्ची असायची. "मी मरणार नाही आणि त्या ड्रायव्हरलाही हिंमत द्यायचे, सांगायचे तूही मरणार नाही. तू बुलडोझर सुरु



*ब्राझीलहून आणून जळगावात वाढविलेल्या मोसंबीच्या झाडाला गुच्छाने लगड लेली फळे दाखविताना मोठे भाऊ.*

ठेव. चालू दे, मी उभा आहे ना." एवढा आत्मविश्वास, एवढी रिस्क घेऊन माणूस बुलडोझर चालवतो आहे आणि उतारावर डोंगर कापतो आहे अशा वेळी सोळा-सोळा फुटाचे बेड तयार करताना भाऊंनी आणि मी त्याच ठिकाणी, त्याच वातावरणात एका छोट्याशा ताटात भाकरी-भाजी खाल्ली. त्यातलीच भाजी-भाकरी त्या ड्रायव्हरलाही दिली. पटकन खाऊन घे, आम्हीही खातो ते तू खा!" या पद्धतीने जैन हिल्स मधल्या टेकड्यांचं काम सुरू झालं. विश्वमित्राने सृष्टी एक केली असं म्हणतात परंतु वेगळ्या पद्धतची जी सृष्टी घास देणारी आहे, भारताच्या शेतीला आर्थिक उलाढाल शेतकऱ्यांना आमच्या कामाचा केंद्रबिंदू मानून कृषिक्षेत्रात पायाभरणीच काम कोणी जर केलं असेल, पैसा मिळवून देण्याचं काम कोणी केलं असेल तर ते प्रतिभावंत शेतकरी भवरलालजी जैन यांनी! प्रतिभावंत कवी असतात, प्रतिभावंत गायक, प्रतिभावंत नाटककार असं गौरवाने म्हणतो आपण मात्र 'प्रतिभावंत शेतकरी' असं कुणालाही म्हणत नाही. मला मात्र कुणी विचारलं, 'प्रतिभावंत' शेतकरी कोण? तर मी मोठ्याभाऊंकडेच आदराने पाहणार. भाऊंसारखा प्रतिभावंत शेतकरी, अनेक शेतकऱ्यांचे सहकार्य घेऊन, अनेक राज्यकर्त्यांची मदत घेऊन त्यांनी शेतकऱ्यांच्या विकासासाठी अनेक धोरणात्मक निर्णय घ्यायला सरकारला भाग पाडले. 'आजची समाज रचना' या पुस्तकात त्यांनी स्पष्टपणे या संदर्भात लिहिलं आहे. वैयक्तिक कुणावरही टीका न करता, परंतु असं करीत असताना शेवटी चांगल्या माणसाचा चांगुलपणा अधोरेखित केला आहे. वाईट बाजूला सारायचं. जे चांगलं असेल त्याचा उपयोग करून इथे असो किंवा देशात-परदेशात असो. हजारो-लाखो माणसं जोडली. विचारवंत-शास्त्रज्ञ-समाजसेवक जोडले. डॉ. आप्पासाहेब पवारांपासून ते डॉ. अण्णासाहेब शिंदेंपासून तर शेतीत ज्यांनी प्रदीर्घ काळ अनुभव घेतला, शरद पवारांसारख्या नेत्यांनी या क्षेत्रात जो अनुभव घेतला, सर्वांशी मोठ्या भाऊंचा ऋणानुबंध जुळला. बलदंड शेतकरी की त्यांच्या शेतात प्रयोग केले. आमच्याही शेतात प्रयोग केले. विविध राज्यातील कृषी क्षेत्रातील अनेक प्रयोग आम्ही सोबत असताना पाहिलं. आजही ते अनुभव जसेच्या तसे आठवतात. इस्त्रायलमध्येही आम्ही सोबत गेलो होतो.

शेतीवर आधारितच सगळं प्रयोग करीत असताना जे काही उभं केलं त्यातून उज्वल भवितव्याचा मार्ग गवसत गेला. त्या कष्टाला, त्या चिवटपणाला व्हिजनला तोड नाही. त्यांच्याबरोबर मी त्यांचा मित्र होतो. या पद्धतीने शेती जी आहे तर थेट शेवटपर्यंत ५०० एकर पर्यंत जी उभी केली. तिसऱ्या-चौथ्या दिवशी आम्ही बरोबर असायचो. त्यांची इच्छा होती तो डोंगर पोखरून, दगड फोडून, ब्लास्टींग करून हे करत असताना एक मोठा माणूस, एक मोठा करोडपती, एक मोठा नाजूक शरीराचा संवेदनशील मनाचा माणूस असतानासुद्धा. मृत्युला न घाबरता कष्ट करीत राहिला. संपूर्ण दगडांची तोडमोड करून आणि तिथचं बसून उभं करणं. आणि त्यावर आधारित ते पाणी घेऊन त्या डोंगर टेकड्यांना, वैराण माळरानाला हिरवं केलं. भाऊंच्या कारकीर्दीत भाऊंनी कृषिविषयक अनेक उद्योग केले. काही यशस्वी तर काही अपयशी ठरले. अपयशातून काही जीवनशिक्षण झाले. चांगल्या लोकांना बरोबर घेऊन जैन हिल्स उभं राहिलं. मला वाटतं आज की, शेवटच्या तीन-चार वर्षांमध्ये जी सृष्टी उभी केली ती तर कुठल्याही भारतातल्या माणसाने बारकाईने पहावी. कारण कोरडवाहू शेतीत जगू शकत नाही आणि कमीत कमी पाण्यात फळप्रक्रिया गुणवत्तापूर्ण होऊ शकते हे उदाहरण जगासमोर ठेवलं. शेतीच्या बाबतीत जी काही पडझड झाली तिथून चंद्र-सूर्याला ग्रहण आहे ना, आपल्याला लागलं तर काय? निघून जातं ग्रहण. पुन्हा सारं आकाश स्वच्छ होतं. पुन्हा प्रकाश येतो. तसं माणसाच आहे. 'आपलं काय चुकलं



*एकात्मिक पाणलोट विकासाचा एक उत्कृष्ट व आदर्श नमुना म्हणून जळगावातील जैन हिल्स या पाणलोटाकडे पाहिले जाते.*

## भाऊंची अनुभूती स्वसंवेद्य!

भाऊंच्या जीवनात प्रतिभा, कर्म आणि तत्वज्ञान यांचा उत्कृष्ट व रमणीय मिलाफ होता. तत्वज्ञान हा त्यांच्या अविरत ध्येयाचा प्राण होता. कर्म हे त्यांच्या तत्त्वचिंतनाचे मर्म होते. त्यांचे तत्त्वचिंतन आशय आणि अभिव्यक्तीच्या अद्वैतातून फुलले होते. त्यांची अनुभूती स्व सं वे द्य होती. म्हणजे ती जाणती होती. त्यात हळूवारपणा आणि आत्म्याचा प्रकाश होता. भाऊंच्या प्रतिभेविषयी आणि तत्त्वज्ञानाविषयी जितका विचार करु लागतो तितके मन अथांग होत जाते. ठाव शोधूनही नाही लागत. म्हणून एक करतो, मनाने त्यांना आलिंगन देतो. डोळ्यांमधून इंद्रायणी सुटते. भाऊंच्या सृष्टीमधला सोन्याचा पिंपळ सळसळतो. त्यांच्या ध्यानाच्या जागेतून अनाहत नाद रुंजी घालतो. देहातून बुक्का फुटतो. मी भाऊंचा हात पक्का धरतो नि सांगतो, "सोडू नकोस. तू आहेस. तुझा हात माझ्या हातात आहे तोवर मी असेन."


हे जर आपण नीट लक्षात घेतलं आणि काय करायला पाहिजे हे चार लोकांना विचारून, विचारवंतांना विचारून दुरुस्त करुन घेतलं तर आयुष्यात पुन्हा अपयश येणार नाही, असं नाही पण क्वचित येईल आणि त्याची झळही कमी कमी होत जाईल.' या पद्धतीने यशोगाथा मांडणारा प्रतीभाली-प्रयोगशील शेतकरी मी भाऊंमध्ये पाहिला.

माझ्या आयुष्यात माझ्या शेतीत, माझ्या सुखदु:खात आणि माझ्या धडपडीत भाऊंनी जे मला सांगितलं ते केलं. शासनात 'पाणी अडवा, पाणी जिरवा', फलोद्यान पासून ते इकॉनॉमीपासून तर ड्रीपपर्यंत जे जे काही शक्य असेल ते केलं. भाऊंच्या सांगण्यावरून केलं आणि राज्याने देशाला संदेश शेतीचा व्यापक असा कृतिशील धडा दिला. कोरडवाहू फळबागेचा, सबसिडीचा, आम्ही महाराष्ट्रातल्या- देशातल्या शेतकऱ्यांसाठी केलं. त्यामुळे त्याच्याइतकी दुसरी मोठी सेवा कोणतीच नाही. भाऊंची आई हेच संस्कार करीत असे. माझी आईसुद्धा! आम्ही आयुष्यभर याचं खेड्यात राहिलो. या मातीचं पांग फेडण्यासाठी. शेतकऱ्यांचं पांग फेडण्यासाठी आम्ही व्रतस्थ आयुष्यभर राहिलो. तो काळ भूमिपुत्रांच्या सेवेचा काळ टिळा आम्ही कपाळावर लावला आणि या पद्धतीनं शेतीबाडी, संसार, खेडी हेच आमचं भावविश्व झालं. १९३६ ला काँग्रेसचं अधिवेशन जळगाव जिल्ह्यात फैजपूर येथे भरलं होतं. महात्मा गांधींनी सांगितलं, 'शहरी होत राहिलं, पण खेड्यातला शेतकरी विशेषत: शेतकऱ्याबरोबर राहिलेला मजूर, चिमणी-पाखरं जगणारं तरी कशी?" जगाच्या पाठीवर सर्वात जास्त मानलं जातं, अशा महात्मा गांधीजींनी हे सांगितलं. माझं म्हणणं आहे की तोच टिळा ग्रामसंस्कृतीचा, भूमिपुत्रांच्या विचारांचा भाऊंनी लावला.



# केळी पिकात भवरलालजींमुळेच भारतात क्रांती

भारत देश केळी उत्पादनात जगाच्या पाठीवर पहिल्या क्रमांकावर असला तरी सुद्धा जागतीक स्तरावर भारतातील केळीची उत्पादकता, गुणवत्ता अतिशय कमी होती. केळी निर्यातीत आपला वाटा शून्य होता. केळी उत्पादकांची आर्थिक स्थिती चांगली नव्हती. केळी पिकातून फार काही नफा मिळत नव्हता. अशा या सर्व कारणांनी व हे चित्र कसे बदलता येईल या प्रश्नाने आदरणीय भवरलालभाऊ जैन खूप चिंतीत होते. नवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने यात काय बदल घडवून आणता येईल, यासाठी त्यांचे द्रष्टे व्यक्तिमत्त्व केळीच्या विकासाचे स्वप्न पहात होते. ही गोष्ट आहे १९८९ सालाची. केळीचा सर्वांगीण विकास व्हावा. भारतीय केळीला एक मानाचे स्थान मिळावे, व केळी उत्पादकांच्या जीवनात उत्कर्ष व्हावा, या उदात्त हेतूने आदरणीय मोठ्याभाऊंनी आयुष्यभर नवनवीन तंत्रज्ञान निर्माण केले आणि त्याची प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या शेतावर अंमलबजावणी सुद्धा केली. भाऊंनी जी केळी पिकाच्या विकासाची दूरदृष्टी ठेवली. ती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी अतिशय शास्त्रोक्त व अप्रतिम असे काम केले. त्याची परिणती म्हणजे आज देशातील केळीच्या विकासाचे चित्र आपण बघत आहोत.



**वसंतराव लक्ष्मण महाजन**
एम.एसस्सी (ॲग्री), केळी तज्ज्ञ व सचिव
अखिल भारतीय केळी उत्पादक संघ नवी दिल्ली, मु.पो.चिनावल,ता,रावेर जि. जळगाव
मो. ९४२२९७६३२७

## केळीसाठी ठिबक सिंचन

केळी पिकामध्ये आमूलाग्र बदल घडवायचा असेल तर सर्वप्रथम केळीला पाणी देण्याचीपद्धत बदलली पाहिजे, असा पहिला विचार भाऊंनी मांडला. त्यावेळेस देशामध्ये साधारण ३.० लाख हेक्टर क्षेत्र केळी पिकाखाली होते. संपूर्ण केळीच्या बागा पाटपाणी पद्धतीवर होत्या. जळगाव केळीचे आगार त्यामुळे येथील केळीचा शेतकरी अनुभवी व केळी पिकाचे ज्ञान असलेला, परंतु केळीची उत्पादकता अतिशय कमी साधारण २४ ते २५ टन प्रति हेक्टरी केळीची उत्पादकता होती.

कापणीचा कालावधी १८ ते २० महिन्याचा होता. भाऊ जेव्हा ठिबक सिंचनाच्या अभ्यासाकरीता जगभर फिरले तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, जगामध्ये केळीची शेती एक तर पावसाच्या पाण्यावर केली जाते किंवा स्प्रिंकलर पद्धतीने केली जाते. प्रति झाड पाणी न देता प्रति हेक्टर तत्त्वावर पाणी दिले जात असे. साधारण ६ ते ७ मि.मी. एवढे पाणी दिले जात असे. परंतु मोठ्याभाऊंची दृष्टी वेगळी होती. विचार वेगळा होता म्हणून हे तंत्रज्ञान जर देशात विकसित करायचे असेल तर आपणास नुसते अनुकरण करून चालणार नाही. आपली पाण्याची उपलब्धतता, आपल्या जमिनीचा प्रकार व लहान शेतकरी यासाठी अतिशय आधुनिक व अचूक असे तंत्रज्ञान म्हणजे ठिबक सिंचनाच्या माध्यमातून केळीचे पाणी व्यवस्थापन. हे भाऊंना चांगले समजले होते. देशामध्ये ठिबक सिंचनाचा प्रसार व्हावा व पाण्याचा अपव्यय थांबावा म्हणून १९८६ सालामध्ये देशात सर्वप्रथम ठिबक सिंचनाची आयात करून पहिला प्रयोग केळी पिकावर करण्याचे ठरवले. केळीसाठी ठिबक सिंचन कसे फायद्याचे आहे. केळीची उत्पादकता व गुणवत्ता कशी वाढू शकते. याबाबत अनेक केळी उत्पादकांशी खुद्द मोठ्याभाऊंनी चर्चा केली. परंतु ज्यांनी आपले

उभे आयुष्य केळी पिकाची शेती करण्यात खर्ची घातले असे. विश्वनाथ वामन पाटील, निंबोल, श्री. दिगंबर शेठ नारखेडे, चिनावल, पंढरीनाथ रामू पाटील, शेमळदा, आत्माराम घना भंगाळे, विष्णु विठू बोरोले - न्हावी, गंभीर हरी महाजन - ऐनपूर, राजाराम गणु महाजन आणि कन्हैया कालू पाटील, पातोंडा, शंकर शेठ अग्रवाल अटवाडा या सर्व दिग्गज केळी उत्पादकांना सुरुवातीस काही हे पटले नाही आणि ते म्हणाले, "भाऊ, आपण क्रूड ऑईल आणले आम्ही घेतले, आपण ट्रॅक्टर व राजदूत गाडी आणली आम्ही घेतली. पीव्हीसी पाईप सिमेंट पाईप समोर टिकणार नाही. असे वाटत असतानासुद्धा आपण पीव्हीसी पाईप दिले, आम्ही पाईप लाईन टाकल्या. तापी नदी व हतनुर धरणावरून पाणी आणले. परंतु भाऊ थेंब थेंब पाण्याने केळीचे पीक येईल, हे काही आम्हाला पटत नाही. कारण उन्हाळ्यात आम्ही गुडघाभर पाणी भरतो तरीसुद्धा बागांना उष्णतेचा ताण बसतो व बागा खराब होतात आणि आपण म्हणता ठिबक सिंचनाने थेंब-थेंब पाण्यावर केळी करा. हे काही पटण्यासारखे नाही आणि जमणार पण नाही." भाऊंचा नाईलाज झाला आणि केळीसाठी ठिबक सिंचनाची पहिली बाग आमडद्याला धनराज अण्णा पाटील यांचेकडे व जैन हिल्सच्या संशोधन केंद्रावर लागली. बाग अतिशय चांगली आली. वाढ जोमदार, झाडाचा पेंदा चांगला, पाने हिरवीगार व मोठी. ठिबकमुळे बाग अतिशय सुंदर आली. तेव्हा भाऊंनी रावेर, यावल, मुक्ताईनगर, जळगाव, ब्हाणपूर या तालुक्यातील केळी उत्पादकांना बसमध्ये बसवून आमडदा, ता. भडगांव येथे नेले. शेतावर पोहचेपर्यंत अनेक केळी उत्पादकांना असे वाटत होते की आपल्या बागा एवढे पाणी असून खराब झाल्या. या बागेची अवस्था काय असेल. सर्व बागेत पोहोचले आणि बाग बघून अवाक झाले. ठिबक सिंचनामुळे बाग जोमदार होती. नंतर बागेचे उत्पादन जवळपास ५० टक्के जास्त आले. कालावधी कमी झाला जळगाव आणि देशातील केळीला भाऊंच्या दृष्टीने नव संजीवनी मिळाली. त्यात रावेर, यावल तालुका आघाडीवर राहिला नंतरच्या काळात या तालुक्यांनी व या पिकाने देशाला ठिबकचे तंत्रज्ञान शिकविले. एक काळ असा होता आज तांदलवाडी हे संपूर्ण गाव निर्यातक्षम गांव म्हणून नावारूपास आले परंतू साधारण पणे १९४८ ते १९६२ या कालावधीत राजाराम महाजन आइल इन्जीनच्या सहाय्याने केळीला पाणी देवून केळीची लागवड करीत होतो. बसराई ही जात लावायची पाटी पाणी पाणी देत असत, १६ ते १७ किलोची रास पडत होती परंतु संपूर्ण कापणी होईपर्यंत सरासरी वजन १२ किलोचे मिळत होते. साधारणपणे ६५ टक्के केळी कापणी होत होती. त्यानी १९६२ ला दुसरी विहीर खोदली व १९६४ ला तीसरी विहीर खोदली इलेक्ट्रीक मोटार बसवून १७००० केळीच्या कंदांची लागवड केली होती. परंतु मोकळे पाणी, बसराई जात आणि पारंपारिक पद्धत, खतांचे ३ ते ४ डोस त्या मुळे केळीच्या शेतीत फार काही शिल्लक राहत नव्हते. परंतु भाऊंनी पीव्हीसी पाईप आणले आणि तापीच्या पट्ट्यात केळीची शेती फुलायला लागली. श्री. राजाराम भाऊ महाजन यांनी सर्वांत प्रथम केळीला ठिबक सिंचन टाकले. असे ते मला म्हणाले.

*भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना जैन कंपनीने बनविलेली टिश्यूकल्चर केळी व डाळिंबाचे रोपे दाखविताना अजित जैन, डॉ. भवरलाल जैन आणि डॉ. अनिल काकोडकर.*



## केळीसाठी टिश्यूकल्चर व निर्यातक्षम जात

भारतीय केळी उत्पादनाचा वाटा जगात ३० टक्के असला तरी जगाच्या बाजारात भारतीय केळीचे नाव सुद्धा नाही आणि भारतीय केळीला जगात कुठेच प्रतिष्ठा नाही. आपले उत्पादन तंत्रज्ञान अतिशय पारंपारिक आहे. उत्पादकता एकदम कमी आहे. गुणवत्ता चांगली नाही. आपण ज्या केळीच्या जातीची / वाणाची लागवड करीत आहोत त्याला प्रचंड मर्यादा आहे. गुणवत्तेचे खूप मोठे आव्हान आहे. हे भाऊ जेव्हा १९९३ साली होंडूरस या देशात गेले आणि तेथील केळी बघितली. त्याच वेळेस त्यांनी ठरवले की भारत देशाला केळी निर्यातदार देश करायचा असेल आणि केळी उत्पादकांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडवायची असेल तर पायाभूत काम करणे गरजेचे आहे. पारंपारीक केळीची शेती बदलून आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करणे फायद्याचे ठरणार आहे.



तेव्हा आपण बसराई, श्रीमंती, अर्धापुरी, रोबेष्ट्रा, आंबेमोहोर अशा पारंपारीक जातींची केळी लागवड करीत होतो. केळी कापणीचा कालावधी १८ चे २० महिने होता. सरासरी घडाचे वजन १० ते १२ किलो होते. केळी कापणीचे प्रमाण ६० चे ६५ टक्के होते आणि केळीची लांबी कमी होती, केळ्याचा आकार गोलाकार होता आणि या जातीमध्ये उत्तम पिल बाग (खोडवा) देण्याची क्षमता नव्हती. परंतु परदेशी बाजारपेठेत दाग विरहित, लांब, सरळ व साधारणत: १५० ते २०० ग्रॅम वजनाच्या केळीच निर्यातीसाठी चालत होती. केळी उत्पादकांची आर्थिक स्थिती फार काही चांगली नव्हती. १९८९ साली जेव्हा जळगाव फ्रुटसेल सोसायटीचा रौप्य महोत्सव साजरा करण्यात आला. त्या विशेषांकामध्ये मी स्वत: एक लेख लिहून केळीचे अर्थशास्त्र मांडले आहे. त्यात केळी उत्पादकांच्या घरातील सदस्यांची मजुरी सोडली तर एकरी सात हजार रूपये नफा पारंपारीक केळीच्या शेतीतून मिळतो आहे असे नमूद केले आहे. हे चित्र बदलण्याची दृष्टी फक्त मोठ्या भाऊंजवळ होती.

हे चित्र बदलायचे असेल तर सर्व प्रथम निर्यातक्षम जास्त उत्पादन देणारी व उत्तम खोडवा देणारी जात केळीमध्ये निर्माण करणे गरजेचे आहे. हे भाऊंना चांगलेच ठाऊक होते. त्यासाठी १९९४ सालामध्ये विल्लीयम, झेलींग व ग्रॅड नैन अशा तीन जातींची आयात देशांमध्ये सर्व प्रथम केली तोपर्यंत कोणतीही निर्यातक्षम जात देशांत नव्हती. त्यामध्ये ग्रॅंडनैन ही जातीने फिलीपीन्स, होंदूरस, इक्वेडोर, कोस्टारीका, इस्त्राइल, कोलंबिया या देशात निर्यातीमध्ये नावलौकीक मिळविला होता व आपल्याही वातावरणात ग्रॅडनैनच सरस ठरली. श्री डी. के. महाजन, वाघोदा, श्री धनू भोळे, न्हावी, वाय. आर. चौधरी, खिरोदा, मनहरभाई पटेल, राजपिपळा, श्री. भीलाभाऊ गोटू सोनवणे, मोहाडी आणि जैन आर अँण्ड डी फार्म, जैन हिल्स जळगाव या सर्व प्रायोगिक प्लॉटमध्ये ग्रॅड नैन ही जात ११ ते १२ महिन्यात कापणीला आली. सरासरी २४ किलोचे वजन मिळाले. केळीला लांब, वाधा , चकाकी रंग अतिशय उत्तम आला. लागवडीपासून आठव्या महिन्यात खोडवा ठेवला २० महिन्यात दुसरे पीक आले आणि २७ महिन्यात तिसरे पीक मिळाले. श्री. डी. के. महाजन यांनी तर चिनावल रस्त्यावरच्या शेतात सात खोडवे घेतले. केळीचा उत्पादन खर्च कमी झाला. एकरी साधारण ३५ ते ४० टन उत्पादन मिळाले आणि केळी विकासाच्या आणखी एका पर्वाला सुरूवात झाली.

परंतु हे तंत्रज्ञान सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहचवायचे असेल तर पारंपारीक कंद पद्धतीने देशात ग्रॅड नैन जातीचा प्रसार व्हायला पन्नास वर्षे लागतील. त्यासाठी श्री. भवरलाल भाऊंनी निर्णय घेतला की उत्तम गुणवत्तेची अनुवंशीक शुद्धततेची, एक समान वयाची व एक सारखी व्हायरस मुक्त रोपे द्यायची असेल तर टिश्यूकल्चर तंत्रज्ञानाशिवाय पर्याय नाही. अतिशय जलद गतीने रोपे बनविण्याची ही पद्धत त्यामुळे जैन टिश्यूकल्चरचा जन्म झाला. १९९५ सालामध्ये टिश्यूकल्चर प्रयोग शाळा उभी राहिली व ५० हजार रोपांपासून रोपे बनवायला सुरूवात केली.

टिश्यूकल्चर केळी रोपे लागवड व पारंपारीक रोपे लागवड यामध्ये फार मोठा फरक होता. भाऊ म्हटले रोपांच्या मुळा पाने कार्यक्षम आहे तर कंदाला मुळांची व पानांची निर्मिती करावे लागते. कंद जास्त पाण्याला किंवा त्या बागेचे व्यवस्थापन चांगले झाले नाही तरी तो मरत नाही. रोपांना मात्र अत्यंत काळजीपूर्वक जोपासणे गरजेचे आहे आणि कंपनीने नियम बनवला की जैन टिश्यूकल्चर केळी बिना ठिबक लागवड होणार नाही व ठिबक न लावणाऱ्याला रोपे देणार नाही आणि दुसरा नियम लगावला की प्रायमरी हार्डनिंग ची रोपे पुरवणार नाही. सुरूवातीला भाऊंचा नियम केळी उत्पादकांना थोडा कडक वाटला. परंतु जेव्हा ठिबकवर बागा लागल्या, लागवडीच्या सातव्या दिवशी बागांना फर्टिगेशन सूरू झाले. बागें जोमदार झाल्या. वर्षभर वाढीच्या अवस्थेनुसार फर्टिगेशन तंत्रज्ञान विकसीत केले. असे संपूर्ण केळी उत्पादनाचे "जैन मॉडेल" उभे करून देशांतील केळी बागायतदारापर्यंत पोहोचवले त्याचा परिणाम आज आपण बघत आहात, टिश्यूकल्चर, ठिबक सिंचन व फर्टिगेशन या तंत्रज्ञानाने केळी उत्पादकांचे जीवनमान बदलले व जळगाव सह भारतीय केळीला एक मानाचे स्थान निर्माण झाले. जैन टिश्यूकल्चर केळी म्हणजे शेतकऱ्यांच्या गळ्यातले ताईत बनले. वर्षाला १० कोटी रोपे निर्माण करण्याचा व लागवड करण्याचा विक्रम इतर कुठेही निर्माण होऊ शकत नाही. अतिशय शास्त्रोक्त पद्धतीने रोपे निर्माण करणारी "प्लॅन्ट फॅक्टरी" म्हणून जैन टिश्यूला नावलौकिक मिळाला ते निव्वळ भाऊंची दृष्टी, गुणवत्तेवरील अपार निष्ठा आणि गुणवत्ता सांभाळण्यासाठी प्रचंड मेहनत. २७० एकरावर जैन टिसी पार्क म्हणजे केळी उत्पादकांचे तीर्थ असे समीकरण गेल्या पंचविस वर्षात निर्माण झाले. ग्रॅड नैन या निर्यातक्षम जातीचा जगाच्या बाजारपेठेत बोलबाला आहे. सर्वत्र याच गुणवत्तेच्या केळीची मागणी आहे. मोठ्या प्रमाणात आता देशात ग्रॅंड नैन ही जात उपलब्ध आहे. एकूण लागवडीच्या ६० टक्के क्षेत्र या व्हरायटीखाली आहे. महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश व छत्तीसगड मध्ये शंभर टक्के ग्रॅंड नैन आहे. ही आदरणीय भवरलाल भाऊंनी केळी उत्पादकांना दिलेली एक भेट आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

### केळी निर्यातीसाठी पायाभूत कार्य

श्री भवरलालजी भाऊ यांच्या दिव्य दृष्टीतून भारतीय केळीला एक मानाचे स्थान मिळाले. देशात ८.३० लाख हेक्टरवर केळी लागू लागली. ३० दशलक्ष टनाचे उत्पादन होऊ लागले. केळीची उत्पादकता ३५० टक्क्यांनी वाढली हे जरी खरे असले तरी सुद्धा जगाच्या बाजारपेठेत



*माननीय श्री. भवरलाल भाऊ जैन, श्री. अशोकभाऊ जैन व श्री. अजितभाऊ जैन केळी निर्यातीसाठीच्या प्रक्रीया,फण्या कापणे, केळी धुवून, निर्जंतुक करून पॅकींग करण्याचे प्रात्यक्षिक जैन संशोधन केंद्रावर प्रत्यक्ष मार्गदर्शन करतांना (वर्ष २००७)*




*जळगावच्या जैन हिल्सवर डिसेंबर २०१० मध्ये झालेल्या दुसऱ्या राष्ट्रीय केळी परिषदेमध्ये चिनावल फ्रूड सेल सोसायटीचे चेअरमन डिगंबरशेठ नारखेडे यांचा भवरलाल जैन आणि ना. धों. महानोर, जैन टिश्यूकल्चर जीवनगौरव पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला त्यावेळी व्यासपीठावर अखिल भारतीय केळी उत्पादक संघाचे अध्यक्ष भागवत पाटील, अतुल जैन, डॉ. एच. पी. सिंग, डॉ. एम. एम. मुस्तफा, डॉ. पी. सुंदर राजू*

केळीला मोठी मागणी आहे. भारतीय केळीला, इराण, इराक, सौदी, दुबई, ओमान, कुवेत, बहरीन, अझहर बेजान, रशिया, जापान ह्या मोठ्या केळी आयातदार देशांना केळी पुरविण्याची संधी आहे हे अभ्यासातून भाऊंनी दाखवून दिले होते. परंतु केळी निर्यात तंत्रज्ञान म्हणजे निर्यातक्षम वाणाची म्हणजे ग्रॅंड नैन केळीची लागवड, फ्रूट केअर मॅनेजमेंट, केळी काढणी पूर्वचे घडाचे व्यवस्थापन, केळी काढणी पश्चात हाताळणीचे तंत्रज्ञान व पॅकींग यासाठी कडी मेहनत भाऊंनी घेतली. त्यासाठी १९९५ सालामध्ये जैन हिल्स च्या पायथ्याच्या प्लॉट मध्ये टिश्यूकल्चर केळीची दोन एकराची बाग उभी केली त्याबागेला निर्यातीच्या निकषानुसार सर्व ट्रीटमेंट केले. जेव्हा बागेचा निसवा होऊ लागले तेव्हा फण्या कमी करून घडावर आठ फण्या ठेवल्या. केळीवरील फ्लोरेट काढले, घडावर, फवारण्या केल्या, घडावर स्करटींग बॅग घातल्या. प्रत्येक घडाला एज टॅग




बांधले, प्रत्येक झाडाला आधार दिला, बागेवर वायर रोप तयार केला व दाग विरहीत सरळ, उत्तम रंग व चांगल्या कॅलियर केळी काढून तीच्या फण्या वेगळ्या करून फण्या धूवून क्रेटस मध्ये भरून जैन व्हॅली येथील राइपनिंग चेंबर मध्ये पिकवून दाग विरहीत गोल्डन बनानाचा मंत्र या देशाला दिला. केळी निर्यातीचे निकष कुठल्याही उत्पादकाला किंवा अधिकाऱ्याला माहीत नव्हते. देशातून जेव्हा केव्हा केळी निर्यात झाली त्यांचा निष्कर्ष होता आपल्याकडे निर्यातक्षम जात नाही. केळी पॅकींगचे तंत्रज्ञान माहीत नाही. त्यामुळे आपल्या केळी परदेशात पोहचेपर्यंत सडून जाते व समुद्रात फेकावी लागते. अशा प्रकारचे सरकारी निष्कर्ष होते. परंतु भाऊंनी ठरवले होते की आम्हाला देशाच्या केळीला जागतिक स्तरावर पोहचवायचे आहे व त्या दृष्टीने प्रयत्न करायचे आहे. साधारण २००३ सालापर्यंत संपूर्ण देशात हा संदेश गेला होता की केळीमध्ये काही करायचे असेल तर जैन इरिगेशन मध्ये जावून शिकून या बघून या , तो पर्यंत केळी प्रक्रिया उद्योगही सुरळीत सुरू झाला होता. २००३ सालामध्ये भारत सरकारच्या कृषी मंत्रालय व फलोद्यान आयुक्त डॉ. एच. पी. सिंग, नवी दिल्ली यांनी कृषी भवन येथे केळी निर्यातीला चालना देण्यासाठी देशातील फलोद्यान संचालक, कृषी सचिव व शास्त्रज्ञ यांच्यासाठी एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यासाठी जैन इरिगेशनची निवड करण्यात आली होती. जिल्ह्यातून मी, डिगंबरशेठ, भागवत विश्वनाथ पाटील, डी. के महाजन, कडू धोंडू चौधरी, अशोक जगन्नाथ पाटील, पांडूरंग बाजीराव पाटील, हरि भिका पाटील, लिलाधर पाचपांडे असे एकुण ७० उत्पादक हजर होते. श्री मोठेभाऊ यांनी स्वत: बसून केळी पॅकींग साठी

# भवरलालजींच्या प्रयत्नांमुळेच खानदेशी केळींनी पाहिली जगाची बाजारपेठ

## माजी आमदार राजाराम गणू महाजन, तांदलवाडी यांचे उद्‌गार

"तापी नदीतले पाणी उचलून रावेर तालुक्यातली शेती बागायत करण्यासाठी भवरलाल भाऊंनी पीव्हीसी पाईप उपलब्ध करून दिला म्हणूनच केळीची लागवड सर्वत्र मोठ्या प्रमाणात होऊ शकली.", असे सांगून माझी आमदार व मोठे केळी बागायदार श्री. राजाराम गणू महाजन म्हणाले की, १९७७ साली माझी पहिल्यांदा भवरलाल भाऊंशी भेट झाली. माझी जमीन तापी नदीच्या काठाने होती. दुसखेडा रेल्वेस्टेशन ते बऱ्हाणपूर हा सगळा दुष्काळी पट्टा होता. निंबोरा फ्रुट सेल सोसायटीशी मोठ्या भाऊंचा संबंध होता. तिथे ते नेहमी यायची.एक दिवस मी त्यांना सोसायटीत जाऊन भेटलो आणि पाईप लाईन करायची आहे असे सांगितले. जी. आय, सिमेंट, बिडाचे की पीव्हीसी पाईप वापरायचे ते विचारले. त्यांनी मला पीव्हीसी पाईप वापरण्याची सूचना केली. मला चार इंची पीव्हीसी पाईप हवे होते. भाऊ साईट बघायला आले. तापीच्या काठाकाठाने हिंडले आणि सहा इंची पाईपलाईन करण्याची सूचना केली. तेव्हां भाऊंची स्वत:ची पाईप फॅक्टरी नव्हती. त्यामुळे मद्रासहून पाईप मागविण्याचे ठरले. पण त्याच वेळी मद्रासच्या कंपनीत आठ इंची पाईप तयार होत होते. पाईप काही लवकर येईना. पावसाळा तोंडावर आला होता. जमीन खोदून ठेवली होती. शेवटी भाऊंनी मला विचारले, "आठ इंची पाईप घेता का माननीय राजाराम भाऊ?" लगेच होकार दिला. ५२०० फूट पाईपलाईन केली. शेतात पाणी गेले. लोक पाहायला येऊ लागले. तापीचे पाणी शेतात आले याचे सर्वांना मोठे आश्चर्य वाटायचे. मग नदीकाठच्या सगळ्या लोकांनी पीव्हीसी पाईप टाकायचा धडाका लावला. भाऊंनी माझ्यासह सगळ्यांना कोट्यावधी रूपयांचे पाईप उधार दिले. भाऊंच्या या पाईप पुरवठ्यामुळे तालुक्यातली खूप मोठी शेती बागायत झाली. सगळ्यांनी केळी लावली. पिकाचे चांगले पैसे मिळाले. मग शेतकऱ्यांनी भाऊंना पाईपाचे पैसे दिले. रावेर तालुक्यातील एकाही शेतकऱ्याने पाईपाचे पैसे बुडविले नाहीत.



केळीला पहिली जैनची मायक्रोट्यूब आम्हीच बसविली असे सांगून राजारामभाऊ महाजन म्हणाले, "टिश्यूकल्चर ग्रॅन्डनैन केळीचे रोप, त्याला ठिबकची जोड आणि फर्टीगेशनची साथ असे उत्तम गणित भवरलालजींनी बसवून दिल्यामुळे केळी पिकाच्या उत्पादनात मोठी क्रांती झाली. त्यामुळे केळी पिकाच्या विकासात भवरलाल जैन यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. ठिबक संचामधून इंजेक्शन दिल्यासारखे फर्टीगेशन केले जाते. त्यामुळे खताच्या खर्चात बचत तर होतेच पण केळी मोठी व एकसारखी होऊन एकावेळी काढायला येतात. आजच (१८ फेब्रुवारी,२०२२) माझ्या शेतातून एका दिवसात तीन ट्रक केळी गेली आणि पावणे अठरा रूपये किलोला भाव मिळाला. पूर्वी आम्ही बसराई केळी लावायचो. सरासरी १२ किलोची रास पडायची. सगळी केळी कापायला १८ महिने लागायचे. आता ११ महिन्यात पीक कापले जाते. भवरलाल जैन यांनी केळी पिकासाठी जे प्रचंड संशोधन करून शास्त्र विकसीत केले व संपूर्ण पिकाच्या व्यवस्थापनाचे जे वेळापत्रक बनविले त्यामुळे खानदेशाची केळी जगाच्या बाजारपेठेत जाऊ शकली. भाऊंचे केळी निर्यातीचे स्वप्न आता पूर्ण होते आहे याचा आम्हां शेतकऱ्यांना खूप आनंद आहे."



*जैन हिल्स वरील निर्यातक्षम केळी बागेची पाहणी करतांना श्री भवरलालभाऊ जैन व डॉ. डी. एन. कुलकर्णी*

दोन किलोचे व १३.५ किलोचे बॉक्स कसे असावे, याची संकल्पना मांडली आणि दिल्लीच्या परिषदेसाठी २ किलो चे ४०० बॉक्सेस घेऊन आम्हाला पाठवले व ही संपूर्ण कनसेप्ट देशातील अधिकारी, शास्त्रज्ञ व उद्योजक यांना कशी समजून सांगावी याचे ही मार्गदर्शन केले. जैन फार्मफ्रेश बनाना हा परिषदेतील चर्चेचा विषय झाला. खुद्द, तत्कालीन कृषी मंत्री राजनाथ सिंग यांनी कौतुक केले व एका महत्त्वाच्या कार्याला दिशा मिळाली.

मागील वर्षी देशातून साधारण पणे २.०५ लाख टनाची केळीची निर्यात झाली. देशाला ६५० कोटी रूपयाचे परकीय चलन मिळाले. भारतीय केळीला मान सन्मान मिळाला, जगाच्या बाजाराच्या नजरा आपल्याकडे वळल्या. फिलपीन्स पेक्षा चांगली गुणवत्ता आपण देऊ लागलो. जळगाव, सोलापूर, सुरत, अनंतपुर, कडप्पा, थेणी,बऱ्हाणपूर, भरूच ही जिल्हे केळी निर्यातीचे हब बनले. लॉकडाऊनच्या काळात निर्यातीने अनेक केळी उत्पादकांना तारले. केळीच्या पट्ट्यात आर्थिक समृद्धी निर्माण झाली हे केवळ आणि केवळ पद्मश्री भवरलाल भाऊ जैन यांच्या दिव्य दृष्टीतून निर्माण झाले. यात कोणाच्याही मनात शंका असण्याचे कारण नाही. परंतु शासकीय स्तरावर जी अनास्था केळीच्या विकासाची दिसत आहे त्यामुळे प्रचंड मागणी असतांना सुध्दा, पायाभूत सुविधा नाही. पॅक हाऊसेस नाही. कोल्ड स्टोरेज नाही. केळीचे कंटेनर वाहून नेण्यासाठी रेल्वे स्टेशनवर तशी सुविधा नाही त्यामुळे केळीचा विकास मंदावल्याचे चित्र दिसत आहे. राज्य व केंद्र सरकारची अनास्था तर आहेच, परंतु केळी उत्पादक सुद्धा दूरदृष्टी ठेवून सांघिकरित्या काही करताना दिसत नाही. आमच्या काळात आम्ही प्रत्येक स्थरावर केळीचा विषय मांडत होतो. आता नविन पीढी केळीच्या शेतीत आली आहे. त्यांच्यासाठी अतिशय आधुनिक असं केळी उत्पादनाचं मॉडेल श्री. भवरलाल भाऊ यांनी उभे करायला दिले आहे. त्याच मार्गावर जर आपण चाललो तर केळी पिकात फार मोठी क्रांती घडेल असे मला वाटते. ज्यांनी दिशा दिली, मार्ग दाखविला अशा या महान द्रष्ट्या व्यक्तिमत्त्वास माझा साष्टांग दंडवत प्रणाम!

# आज मी लक्झरी जीवन जगतो आहे ते भवरलाल भाऊंच्या तंत्रज्ञानामुळे

**किशोर रविंद्र फालक,** मु. पो. हिंगोणा, ता. यावल जि. जळगाव, मो. ९७३०२८७०३९

माझे वडील पारंपारिक पद्धतीने केळीची शेती करीत होते. मी फारसे शेतीकडे लक्ष देत नव्हतो थोडी राजकारणात गोडी असल्यामुळे काही वर्ष राजकारणात फिरलो परंतु असे लक्षात आले की, जीवनमान बदलाचे असेल तर केळीची शेती शास्त्रोक्त पद्धतीने केली पाहिजे. कुठल्याही नोकरीत एवढी प्रगती करता येणार नाही किंवा राजकारणातही फार काही करता येणार नाही असे माझे ठाम मत झाले. २००४ सालापर्यंत मी कधीतरी शेतात फेरफटका मारत असे बाबा मात्र फार मेहनती व कष्टाळू. घरची नऊ एकर जमीन होती. मी सर्व प्रथम ६००० कंदांच्या केळीची लागवड २००५ साली केली. आणि माझ्या केळीच्या शेतीचा श्रीगणेशा केला. २००९ सालापर्यंत मी कंदाची बाग लावत होतो. सरासरी १६ ते १७ किलोची रास मिळत होती. गुणवत्ता फार चांगली येत नव्हती. कापणीही पुर्ण होत नव्हती त्यामुळे फार काही पैसे शिल्लक राहत नव्हते. मग २००९ मध्ये जैन इरिगेशनचे अॅग्रोनॉमिस्ट श्री. राहुल भारंबे यांनी श्री. टेनु डोंगर बोरोले, एल. ओ. चौधरी, शांताराम राणे कुंभारखेडा यांच्या बागांच्या गोष्टी सांगितल्या आणि मला जैन टिश्यूकल्चर केळी लागवड कशी फायद्याची आहे हे लक्ष्यात आणून दिले. मी तेव्हाच १० हजार रोपांचे बुकिंग करून लागवड केली. माझ्या शेतात सर्वत्र जैन ठिंबक सिंचनच लावले आहे. त्यातून फर्टिगेशन कसे करावे, केळीला संतुलीत खते कशी द्यावीत, त्याचे काय फायदे आहेत. हे केळी पिक तज्ज्ञ श्री. के. बी. पाटील यांनी समजून सांगितले. त्यावर्षी केळीचे पीक खूप चांगले आले त्यामुळे दरवर्षी मी रोपांची लागवड वाढवित गेलो. आणि आता दरवर्षी ४० ते ४५ हजार रोपे लावतो.




माझ्या १३ वर्षाच्या अनुभवावरून आता लक्षात आले आहे की, जैन कंपनीची केळीची टिश्यूकल्चरची रोपे अत्यंत दर्जेदार, रोगमुक्त, व्हायरस फ्री असतात. आणि त्यांना तोड नाही. मी सुरवातीला एक वर्ष पुण्यातून रोपे विकत घेतली. पण मला त्यांचा अनुभव चांगला आला नाही. ती बाग फेल गेली. त्यानंतर मात्र मी ठाम निर्णय केला की, यापुढे केळी लावायची असतील. तर जैनची टिश्यूकल्चर रोपेच लावायची.



एक दिवस आम्ही कुंभारखेड्याला श्री. रमाकांत बोंडे यांनी त्यांच्या केळीला डबल लॅटरल टाकली होती ती बघायला गेलो. या डबल लॅटरल टाकण्याचा श्री. रमाकांत बोंडे यांना इतका मोठा फायदा मिळाला होता की, त्यांना सरासरी ३२ किलोची रास पडली होती. बाग तर अतिशय जोमदार होती हे आम्ही डोळ्यांनी बघितलं. आणि त्वरीत दुसऱ्याच दिवशी २४ हजार केळी रोपांना मी डबल लॅटरल टाकून घेतली. आज जवळपास सात वर्ष झाली. माझी ४० हजार नवीन लागवड व ४० हजार पिलबाग जैन च्या डबल लॅटरलवर आहे. संपूर्णपणे विद्राव्य खते वापरतो आहे. १२:६१:०, ०:५२:३४, ०:०:५०, युरिया, पोटॅश, कॅल्शियमचा मी मोठा प्रमाणात वापर करतो. भवरलाल भाऊंनी जे केळीचे तंत्रज्ञान निर्माण करून आमच्यासारख्या केळी उत्पादकांच्या बांधावर पोहचविले. त्यामुळे माझ्या जीवनात व कुटुंबात आर्थिक क्रांती झाली. १३ वर्षात मी २१ एकर जमीन खरेदी केली. मुलीचे शिक्षण केले. मुलाचे शिक्षण केले. त्याचे लग्न थाटात केले. आर्थिक सुबत्ता आली. प्रचंड प्रतिष्ठा मिळाली. आज मी टोयाटो इनोव्हा गाडीत फिरत आहे हे केवळ जैन तंत्रज्ञानामुळे शक्य झाले. आज माझे कुटुंब अतिशय लक्झरी जीवन जगत आहे. याचा अभिमान व खूप आनंद आहे. तथापि केळी बागयदार पिढीने पुर्णपणे निष्ठेने व अचुक तंत्रज्ञानाचा वापर करून भविष्यात केळीची शेती करावी असे मला वाटते. सध्या माझी ४० हजार पिकबागेची कापणी सुरू आहे. पाच ट्रक पिलबागेची कापणी दोन दिवसात झाली असून १४०० रूपये क्विंटलचा भाव मिळाला आहे. नवीन ४० हजार रोपांची कापणी एक महिन्याने सुरू होणार आहे. दुसरे मला असे वाटते की, भाव कमी जास्त काहिही असू द्या, आपण प्रामाणिक प्रयत्न केल्यास व केळीचे शास्त्रोक्तपद्धतीने व्यवस्थापन केल्यास केळीची चांगली रास व गुणवत्ता मिळते त्यामुळे इतरांपेक्षा चांगला भावपण मिळतो व होणारे नुकसान टळते. येथून पुढे सर्वांनी मिळून केळीच्या निर्यातीसाठी प्रयत्न करावे व केळी पिकाला शाश्वत ठेवावे असे मला वाटते. माझ्या जीवनात परिवर्तन घडून आणणारे आदरणीय भवरलालभाऊंना शतशः नमन!

**१२ डिसेंबर, जैन इरिगेशनचे संस्थापक कै.भवरलाल जैन यांचा जन्मदिवस त्यांच्या जयंतीनिमित्त जळगाव मधील परिवर्तन या संस्थेतर्फे मागील पाच वर्षांपासून भाऊंना भावांजली हा सांस्कृतिक कार्यक्रम भाऊंच्या उद्यानात साजरा करून भाऊंच्या आठवणींना उजाळा दिला जातो. यावर्षी या भावांजलीमध्ये जे विविध कार्यक्रम सादर करण्यात आले त्यांचा हा संक्षिप्त व धावता आढावा...**




# आदरणीय मोठेभाऊ भावांजलीचा कार्यक्रम आम्ही का करतो?

**- शंभू पाटील**

एखादा माणूस तुमच्या मनामस्तकाचा ताबा घेतो. तुम्हाला झपाटून टाकतो. का घडतं असं? कारण काहीतरी भव्य, महनमंगल अस दर्शन घडत आणि आपण थक्क होऊन हे बघत राहतो. तसच काहीसं भवरलाल भाऊ ज्यांना प्रेमाने सर्व मोठेभाऊ म्हणतात त्यांच्या बाबतीत घडलं. खरंतर भाऊ वयाने माझ्या पेक्षा खूप मोठे, कर्तृत्व तर आभाळाइतके मोठे असतांना देखील त्यांच्या सोबत जो स्नेह निर्माण झाला याच श्रेय भाऊंनाच आहे. त्यांनी ज्या सहजपणे मला मित्र मानलं यात त्यांचाच मोठेपणा आहे. इतका मोठा उद्योगसमूह पण त्याचा कुठेही दंभ नाही. अफाट बुद्धीमत्ता पण गर्व नाही. इतका व्याप असून देखील सतत प्रसन्न व हसतमुख असे भाऊ कायम मनात आहेत. गांधी हा आम्हाला जोडणारा धागा होता. मी एकदा विचारलं भाऊंना की भाऊ इतके ताण तणाव असतांना देखील तुम्ही इतके प्रसन्न कसे असता? तेव्हा भाऊ म्हणाले की मी कधीच खोट बोलत नाही. त्यामुळे माझं कधी कधी नुकसान होत. पण दीर्घकालीन फायदाच होतो. मी खोटं बोलत नाही म्हणून काय बोललो हे लक्षात ठेवावे लागत नाही. हे किती सुंदर आहे. अगदी न्यायालयात देखील. गरज असताना देखील, व बिकट परिस्थितीला सामोरं जात असताना व वकिलांनी खोटं बोलायचा दिलेला सल्ला भाऊंनी नाकारला. इथेच त्यांच थोरपण आहे. इतक्या गोष्टी आहेत त्यांच्या मोठेपणाच्या की पुस्तक होऊ शकते. कलेवर मनापासून प्रेम करणारे भाऊ म्हणाले होते, 'कला म्हणजे सृष्टीच रहस्य उघडणाऱ्या किल्ल्या आहेत.' कलेची इतकी सुंदर व्याख्या माझ्या कुठेही वाचनात नाही. इथेच भाऊंसोबत





प्रेमाचा धागा जोडला गेला. भाऊ आपल्यातून निघून गेले. जगाला सुंदर करण्याचं त्यांचं स्वप्न होत. ते गेल्यावर त्यांच स्वप्न काही अंशी पूर्ण करता येईल का? याचा शोध म्हणजे भाऊंना भावांजली हा परिवर्तन कला महोत्सव आहे. भाऊंना आदरांजली द्यायची, त्यांच स्मरण करायचं तर मग ती कलेच्या माध्यमातूनच द्यायची. मी दुसरं काय करू शकतो? या मधून मग भाऊंना भावांजलीची सुरवात झाली. आदरणीय अशोकभाऊ यांनी या कल्पनेला पूर्ण पाठिंबा व सहकार्य दिले. भाऊंच्या स्मृतीप्रित्यर्थ भाऊंचे उद्यान उभारले गेले. याच उद्यानातील ॲम्फी थिएटरमध्ये हा महोत्सव सुरू झाला. माझ्या सोबत पूर्ण परिवर्तन परिवार ७ दिवस या महोत्सवासाठी झोकून देऊन काम करत असतो.याच नियोजन उत्तम व्हावं यासाठी आम्ही शहरातील मोठ्या मंडळींना या महोत्सवाच प्रमुख केलं. अनिलभाई कांकरिया, नंदलाल गादिया, अनिषभाई शहा, अमरभाई कुकरेजा, किरण बच्छाव, छबिराज राणे, नारायणभाऊ बाविस्कर ह्या प्रमुखांनी या महोत्सवाला एक दर्जेदार आयाम दिला. इतकी मोठी माणसं पण घरच कार्य असल्यासारखी १० दिवस राबतात. यामुळेच हा महोत्सव यशस्वी होतो.

# रविवार दि. १२ डिसेंबर, पहिला दिवस

## लॉकडाऊन डायरी

### चित्रकारांचे कोरोना काळातील भावविश्व उलगडविणारे चित्रप्रदर्शन





*प्रा. राजेंद्र महाजन*



*राजू बाविस्कर*



*जितेंद्र सुरळकर*



*श्याम कुमावत*



*निलेश शिंपी*

पद्मश्री डॉ. भवरलाल जैन यांच्या जन्मजयंतीच्या निमित्ताने परिवर्तन जळगाव आयोजित केलेल्या 'भाऊंना भावांजली' या संगीत, नृत्य, नाट्य, चित्रकला आणि साहित्याला वाहिलेल्या परिवर्तन कला महोत्सवाच्या पाचव्या पुष्पाच्या निमित्ताने 'लॉकडाऊन डायरी' हा कोरोना काळातील चित्रकारांचे भावविश्व उलगडवणारे चित्रप्रदर्शन जळगावच्या भाऊंच्या उद्यानातील वसंत वानखेडे आर्ट गॅलरीत दि. १२ ते १९ डिसेंबर दरम्यान आयोजित केले होते.

एक महान द्रष्टा आदरणीय श्री. भवरलाल जैन यांच्या निसर्गाबद्दल आवड, शेतकऱ्यांबद्दलचे प्रेम आणि प्रत्येक सर्जनशील गोष्टीसाठी त्याचे कौतुक यासाठी हे प्रदर्शन श्रद्धांजली म्हणून समर्पीत केले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन बहिणाबाई चौधरी ट्रस्टच्या संचालिका सौ. ज्योतीभाभी जैन, जैन इरिगेशनचे विपणन संचालक श्री. अभय जैन आणि खासदार श्री. उन्मेश पाटील यांनी केले. अमुर्त शैलीतील अनेक चित्रांसमोर उभे राहून दोघाही उद्घाटनकर्त्यांनी चित्रकारांशी बोलून कुतूहलपूर्ण संवाद साधला आणि कौतुक केले.

सद प्रदर्शनात जळगावमधील चित्रकार राजेंद्र महाजन, राजू बावीस्कर, जितेंद्र सुरळकर, विकास मल्हारा, श्याम कुमावत, विजय जैन आणि निलेश शिंपी यांच्यासह प्रसेन बावीस्कर आणि ओशीन मल्हारा या तरूण चित्रकारांची चित्रे प्रदर्शीत केली गेली.

प्रदर्शनात ललित कला केंद्र (चोपडा) महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. राजेंद्र महाजन यांनी नाविण्यपूर्ण निसर्गाची मांडणी केली होती. जितेंद्र सुरळकर यांची 'दुबई' ही वैशिष्ट्येपूर्ण चित्रमालिका, राजू बाविस्कर यांची 'कष्टकरी श्रमिकांची यथा मांडणारी', शाम कुमावत यांची खास अंजिठा चित्रांमधल्या रंगांसह लयदार रेषा दर्शवणारी मोहक चित्रे. विकास

मल्हारा, विजय जैन आणि प्रसेन बाविस्कर यांची वेगवेगळ्या धाटणीची अमूर्त शैलीतील चित्रे समाविष्ट केली होती. पाचोरा येथील निलेश शिंपी यांची वेगळ्या रंगढंगाची लक्ष्य वेधून घेणारी तसेच ओशीन मल्हारा या तरुणीची लॉकडाऊनमधील माणसांची व्यथा दर्शवणारी प्रत्ययकारी पोर्ट्रेट्स लक्ष्यवेधी ठरली.

'जळगावमधील आत्तापर्यंत झालेल्या चित्र प्रदर्शनामधील एक महत्त्वाचे चित्र प्रदर्शन' अशा शब्दात या प्रदर्शनाचे कौतुक शहर व परिसरातील कलाप्रेमी रसिक, चित्रकार आणि कलेच्या विद्यार्थ्यांनी केले. भरभरून प्रतिसाद लाभलेल्या या प्रदर्शनास जैन इरिगेशनचे अध्यक्ष श्री. अशोक जैन, ज्येष्ठ लेखक श्री. भालचंद्र नेमाडे, जैन इरिगेशनचे सह-व्यवस्थापकीय संचालक श्री. अतुल जैन, जैन फार्मफ्रेश फूड्सचे संचालक श्री. अथांग जैन, गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या संचालिका सौ. अंबिका जैन तसेच दिल्लीचे प्रसिद्ध चित्रकार मनिष रा'व यांनी भेट देऊन चित्रकारांचे कौतुक केले. प्रदर्शनाच्या सांगता सोहळ्यात प्रदर्शनामधील सहभागी चित्रकार, रसिक, नागरिक आणि कलेचे विद्यार्थी यांचा संवादात्मक 'कला आणि माणूस' हा चर्चेचा कार्यक्रम आयोजित केला गेला, त्यात देशदूतचे मुख्य संपादक श्री. हेमंत अलोणे, कलाशिक्षक श्री. हरुण पटेल, नितीन सोनवणे, राजू बाविस्कर व विजय जैन यांनी आपले विचार व्यक्त केले. जैन इरिगशेनचे सहकारी श्री. ज्ञानेश्वर शेंडे यांनी सूत्रसंचालन केले.

**लेखन - विजय जैन**

# सोमवार दि. १३ डिसेंबर, दुसरा दिवस

## चर्चासत्र

### सांस्कृतिक समृद्धी आणि माझं जळगाव




*परिसंवादात छबीराज राणे बोलताना व्यासपीठावर शेजारी डावीकडून यजुर्वेद्र महाजन, डॉ. प्रदीप जोशी, डॉ. राजेश पाटील, डॉ. सुधीर भोंगळे, डॉ. रेखा महाजन, भरत अमळकर, अतुल जैन, डॉ. प्रीती अग्रवाल, अनिष शहा, गनी मेमन आणि हर्षल पाटील.*

जळगावातील सामाजिक, सांस्कृतिक नेतृत्व संस्कृतीला समांतर नाही. भ्रष्टाचारी शहर, गुंडगिरी, अवैध धंद्यांचे शहर ही ओळख कधी पुसणार आहोत. नीतिवान लोकांच्या मागे किती समाज उभा राहतो, ही त्या शहराची सांस्कृतिक ओळख असते. ती खरी संस्कृतीची परीक्षा असते. त्यामुळे सहनशील, पराभूत मानसिकता बदलून एकत्रित प्रयत्नाने हा सांस्कृतिक बदल घडवावा लागेल, अशी अपेक्षा वक्त्यांनी चर्चासत्रात व्यक्त केली. खानदेशी संस्कृतीचे एकत्रित दर्शन घडविणारे संग्रहालय जळगावमध्ये उभे राहणे गरजेचे असून खानदेशी गॅझेटियर वाचताना हा भाग ब्रिटिशकाळात किती समृद्ध होता याची कल्पना येते. धरणगावला पूर्वी लाल रंगाचे तलम बहमली वस्त्र बनत असे आणि ते खरेदी करण्यासाठी पर्शियन व अरेबियन लोक येथे येत असत तर नंदूरबारचा फेटा खरेदी करण्यासाठी लंडनमध्ये लोकांच्या रांगा लागत. ही खानदेशी संस्कृती आपण जपून वाढविली पाहिजे.

परिवर्तन आयोजित भावांजली महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी सोमवारी रोटरी भवन येथे सांस्कृतिक समृद्धी आणि माझं जळगाव, या विषयावर परिसंवाद झाला. या वेळी जैन इरिगेशनचे सहव्यवस्थापकीय संचालक अतुल जैन, भरत अमळकर, डॉ. प्रदीप जोशी, संपादक डॉ. सुधीर भोंगळे, डॉ. राजेश पाटील, छबीराज राणे, डॉ. प्रीती अग्रवाल, डॉ. रेखा महाजन, गनी मेमन, यजुर्वेद्र महाजन, शिवराम पाटील सहभागी झाले होते. चर्चासत्राची भूमिका अनिष शहा यांनी सांगितली. 'जळगाव बद्दल कुणी चुकीचे बोलले तर चीड येते, संताप येतो.सर्वांना तसे वाटले पाहिजे. आपल्या वागण्या, बोलण्यावर बाहेरची लोक मत बनवत असतात. सामाजिक रचना कशी बदलली पाहिजेत, त्याला उत्तर द्यायला हवे. जळगाव हे सुंदरच आहे. ते आपल्याला सुंदरच वाटले पाहिजे.' असे विचार अतुल जैन यांनी व्यक्त केले. हर्षल पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

# मंगळवार दि. १४ डिसेंबर, तिसरा दिवस

## अरे संसार संसार

### बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांचे संगीतमय सादरीकरण

भाऊंच्या कार्याला परिवर्तनच्या कलावंतांचे नमन बहिणाबाईंच्या कवितेने व गीतांनी परिवर्तनच्या "अरे संसार संसार" कार्यक्रमाने भावांजली महोत्सवाला सुरवात झाली. संजिवनी फाऊंडेशन संचलित परिवर्तनतर्फे पद्मश्री भवरलाल जैन यांना आदरांजली देणारा आठ दिवसीय 'भावांजली महोत्सवा'चे उद्घाटन भाऊंच्या उद्यानातील ॲम्फि थिएटरमध्ये करण्यात आले. याप्रसंगी सुप्रसिद्ध उर्दू व मराठी गजलकार व राज्याचे माहिती व जनसंपर्क महासंचालक डॉ दिलीप पांढरपट्टे, जैन उद्योग समुहाचे अध्यक्ष अशोक जैन, माजी मंत्री गुलाबराव देवकर, भालचंद्र पाटील, जे के चव्हाण, डॉ राधेशाम चौधरी, सिद्धार्थ बाफना यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी मनोज पाटील यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी महोत्सव प्रमुख अनिश शहा, अमर कुकरेजा, अनिल कांकरिया, छबिलदास राणे, डॉ. रणजित चव्हाण, किरणा बच्छाव, नारायण बाविस्कर, राहुल निंबाळकर हे महोत्सव प्रमुख उपस्थित होते. याप्रसंगी दिलीप पांढरपट्टे यांनी भवरलाल जैन यांच्या कार्याला वंदन करून परिवर्तनच्या महोत्सवाचा गौरव केला.

बहिणाबाईंच्या कवितांवर आधारित 'अरे संसार संसार' हा सांगितिक कार्यक्रम परिवर्तनच्या कलावंतांनी सादर केला. विजय जैन यांची संकल्पना, तर नारायण बाविस्कर यांनी दिग्दर्शित केलेला ह्या कार्यक्रमाने जळगावच्या सांस्कृतिक विश्वाची सफर घडवली.

बहिणाबाई हे जळगावच वैभव आहे. बहिणाबाई यांची कविता ही लोकपरंपरा सांगणारी, खेड्यातल्या कृषिजनपरंपरासंस्कृतीच महत्व पटवून देणारी कविता आहे. हजारो वर्षांपासून गावगाड्यात राबणाऱ्या कष्टकरी महिलांच्या जगण्याचं गाणं म्हणजे बहिणाबाईची कविता आहे. तिची कविता व तीच जगणं यांची अनोखी सांगड घालणारा हा कार्यक्रम म्हणजे बहिणाबाईची ओळख करून देणारा कार्यक्रम आहे. तिच्या कविता वा गाणी आपण ऐकतो पण त्यामागचा गहन अर्थ लक्षात येत नाही. तो अर्थ, त्या मागचं जगण्याचं तत्वज्ञान उलगडून सांगत ती कविता आपल्या मनात पक्की बसवायचं काम या कार्यक्रमात शंभु पाटील नावाचा अवलिया करतो. या माणसाने बहिणाबाईचा जो अभ्यास केला आहे. ज्या पद्धतीने बहिणाबाईच्या कविता समजून घेतल्या आहेत. त्याला जळगावच्या सांस्कृतिक इतिहासाची झालर आहे. कृषी परंपरेची समज आहे. या सोबतच शब्दाच्या अनेक छटा व व्यापक अर्थ आहेत त्या अंगाने बहिणाबाईंच्या जगण्याचा संबंध कवितेत कसा येतो या मुळे ही कविता व गाणी केवळ कळत नाही तर मनात घर करतात. मन तृप्त करणारा हा कार्यक्रम आहे.

'अरे होतो छापीसनी, कोरा कागद शहाना' म्हणणाऱ्या कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचं काव्य मराठी साहित्यविश्वात प्रकाशित झालं आणि 'बावनकशी' सोनच गवसलं, आयुष्याच्या वाटचालीतल्या उन्हापावसानं अनमोल शहाणपण, उपजत समज-उमज, विलक्षण कल्पनाशक्ती, सूक्ष्म आणि तितकीच चौफेर निरीक्षणशक्ती, समाजजीवनातील बरे-वाईट



व्यवहार, मानवी वृत्तीच्या कडाकांगोऱ्यांचा विचार, मार्मिक टिप्पणी करण्याची सहज मिश्कीलता, साध्या शब्दात फार मोठा जीवनविषयक दृष्टिकोन देण्याची ताकद अशा अनेक गुणसंपदेसह कवयित्री बहिणाबाई चौधरींच्या कवितेचा विचार केला जातो. बहिणाबाईंच्या चिरंजीवांनी सोपानदेवांनी आईच्या कविता प्रकाशित करण्यासाठी आचार्य प्र.के. अत्रेंना दाखविल्या आणि मराठी साहित्यदालनाची भरभरुन समृद्धी वाढली, वाढतच गेली. बहिणाबाईंच्या शब्दातच सांगायचं झालं तर 'मस्तकातलं पुस्तकात गेलं, पुस्तकातलं मस्तकात आलं,' बहिणाबाई चौधरींच्या कवितेचा चिकित्सक अभ्यास करणाऱ्यांनी एम. फिल, पीएच. डी. च्या पदव्या प्राप्त केल्या आहेत. अनेक नामांकित लेखक-कवींनी बहिणाबाईंचे काव्यगुण अधोरेखित करणारी पुस्तके लिहिली. बहिणाबाईंच्या परिवाराने त्यांच्या काव्याविषयी प्रकाशित केलेली पुस्तके वाचकप्रिय ठरली आहेत. बहिणाबाईंच्या काव्यावरील ऑडिओ-व्हिडीओ-डीव्हीडीही आवर्जून पाहिल्या-ऐकल्या जातात.

'लेकीच्या माहेरासाठी, माय सासरी नांदते' इतक्या संवेदनशीलतेनं ओथंबलेलं भावस्पर्शी काव्य बहिणाबाईंचं आहे. लेवागणबोलीतलं बहिणाबाईंचं काव्य साध्या, सरळ-सोप्या शब्दात मोठा आशय समजावून देते. आसोदा हे बहिणाबाईच माहेर, जळगाव पासून ५ किलोमीटर असलेलं गाव. या गावच्या रस्त्यावर असलेल्या प्रत्येक गोष्टीत बहिणाबाई काय काय बघते. निर्जीव गोष्टींचा पण ती कसा विचार करते. कसा संवाद करते हे सगळंच विलक्षण सुंदर आहे. मग माहेरची कविता सादर करणाऱ्या सोनाली पाटील व सिद्धी सिसोदे यांनी बहिणाबाईच माहेर आपल्या वाचनामधून जिवंत केल. तर विलक्षण गोड गळ्याच्या श्रद्धा पुराणिक कुळकर्णी यांच्या आज माहेराले जाणं, हे गाणं कधीही कुठंही एकल नव्हतं. त्या गाण्याचे स्वर अजूनही कानात आहेत. इतकी गुणी गायिका परिवर्तन परिवारात आहे म्हणूनच परिवर्तन परिवारचा दर्जा उंच आहे.

**अरे, संसार संसार**
**जसा तावा चुल्ह्यावर**
**आधी हाताले चटके**
**तव्हा मियते भाकर!**



**अरे, संसार संसार**
**खोटा कधी म्हनू नही**
**राऊळाच्या कयसाले**
**लोटा कधी म्हनू नही**



**अरे, संसार संसार**
**नही रडनं कुढनं**
**येड्या, गयातला हार**
**म्हनू नको रे लोढनं!**

माहेर, माही माय सरसोती, सुगरीणीचा खोपा, आखाजी अशी अनेक गाणी परिवर्तनच्या कलावंतांनी सादर केली. सुदिप्ता सरकार यांचा घनगंभीर स्वर, घरोटा हे गाणं त्या ज्या पद्धतीने सादर करतात ते अनुभवायला हवे असेच आहे.

**अरे घरोटा घरोटा**
**तुह्यातुन पडे पिठी**
**तस तस माह्य गाणं**
**पोटातून येत व्हटी**



**दाने दयता दयता**
**जशी घामानं मी भिजे**
**तुझी घरोटा घरोटा**
**तशी पाऊ तुझी झिजे**



**झिजिसनी झिजिसनी**
**झाला संगमरवरी**
**अरे, तुले टाकलाये**
**टकारीन आली दारी!**



या अतिशय सुंदर ओळी तितक्याच गंभीर स्वरामधून ज्या सुंदर पणे येतात ही सौ. सरकार यांची जादू आहे. मंजुषा भिडे व हर्षदा कोल्हटकर यांनी पारंपरिक ओव्या अत्यंत उत्कटपणे सादर केल्या. या दोघी कलावंतांनी आपल्या स्वरांचा अत्यंत खुबीने वापर करत त्यातली आर्तता पुरेपूर पोहचवली आहे. प्रतीक्षा कल्पराज यांनी मुजांची वही खूपच जबरदस्त सादर केली. नेमांडे यांची ही वही श्रोत्यांना सुखावून गेली. खड्या आवाजात गाणाऱ्या प्रतीक्षा यांना उत्तम दाद मिळाली.

बहिणाईच्या कविता नारायण बाविस्कर, मंजुषा भिडे, प्रतिक्षा कल्पराज, मंगेश कुलकर्णी, उर्जा सपकाळे, सद्धी शिसोदे, सोनाली पाटील यांनी सादर केल्या. या सादरीकरणात भाषेचा लेहजा व त्यातील सौंदर्य या कलावंतांनी उत्तम उलगडून दाखवलं. सुयोग गुरव यांची हार्मोनियम वरची साथ अत्यंत सुरेल होती. तर मनीष गुरव यांचा तबला, खंजीरी या वाद्याच्या साथसंगतीने कार्यक्रमात बहार आली. योगेश पाटील यांची बासरी बहारदार होती. बुद्धभूषण मोरे हे साथसंगत करत होते. चंद्रकांत इंगळे यांच्या लोकपरंपरेतील खड्या व मोकळ्या गायकीने रसिकांना भरभरून आनंद दिला. कार्यक्रमाची सांगता श्रद्धा पुराणिक यांनी सदा जगाच्या कारणी चंदनापरी घसला या गीताने केली. कार्यक्रमाची सांगता झाली पण कार्यक्रम मनात घेऊनच रसिक घरी गेले.

'जे जे उत्तम उदात्त म्हणती। ते ते शोधत रहावे जगती॥' हाच दृष्टिकोन असणाऱ्या पद्मश्री डॉ. भवरलालजी जैन तथा श्रद्धेय मोठ्याभाऊंनी सामाजिक बांधिलकीचे व्रत आयुष्यभर जोपासले. साहित्य, समाज, संस्कृती, आरोग्यसंवर्धन, क्रीडा, सांस्कृतिक, शिक्षण, अध्यात्म अशा क्षेत्रात श्रद्धेय मोठ्याभाऊंनी भरीव योगदान दिलं. कवयित्री बहिणाबाई चौधरींचं काव्य भाऊंच्या अतिशय आदराचा, संवादाचा विषय. इतिहासाच्या अस्तित्वाला सातत्य आणण्यासाठी किंवा अमरत्व प्रदान करण्यासाठी जे दोन प्रमुख स्तंभ वापरले जातात त्यात पहिला आहे तो क्रिएट डिस्कव्हरी ऑफ मॉन्युमेंटस् (भव्य-दिव्य वस्तू, वास्तू किंवा स्मारक अथवा दीर्घ काळापर्यंत कायम सिद्ध राहू शकेल अशी कलाकृतींची निर्मिती अथवा त्यांचा शोध) दुसरा स्तंभ आहे डॉक्युमेंटस् (दस्तऐवज, ताम्रपट, शिलालेख, वह्या पुस्तके, खर्डे, भुर्जपत्र, ताडपत्र, साखळीपत्र शासकीय दरबारी अथवा खाजगी नोंदी पर्यटकांच्या प्रवास नोंदी, वह्या, वर्णने इ.) यांच्या आधारेच आपण तत्कालीन समाज, सामाजिक परिस्थिती व परंपरा-संस्कृती यांचे सारासार अंदाज बांधू शकतो, ऐतिहासिक वारशाचा तसा व्यापकदृष्ट्या विचार करणाऱ्या भाऊंनी कवयित्री बहिणाबाई चौधरी मेमोरिअल ट्रस्टची स्थापना केली. साहित्य-समाज, संस्कृतीच्या कार्यक्षेत्रात या ट्रस्टने अल्पावधीतच फार मोठी प्रतिष्ठा प्राप्त केली आहे. ट्रस्ट अंतर्गत बहिणाबाईंचे वास्तव्य असलेल्या जुन्या जळगावातील त्यांच्या चौधरीवाड्यात, राहत्या घरात 'बहिणाई स्मृती' हे वस्तुसंग्रहालय साकार करण्यात आले आहे. या संग्रहालयात दैनंदिन वापरातल्या वस्तुंचीही मांडणी करण्यात आली आहे.

श्रद्धेय मोठ्याभाऊंच्या स्मरणार्थ होत असलेल्या महोत्सवाची सुरवात बहिणाबाईच्या कार्यक्रमाने होते. या पेक्षा अधिक चांगली सुरवात भावांजलीची काय असू शकते.

बहिणाबाईच्या कवितेची निर्मितीप्रक्रिया, त्यातील गोडवा, बोलीभाषेतील सौंदर्य, जळगावची संस्कृती आणि कवितेतील तत्वज्ञान शंभू पाटील यांनी उलगडून दाखवले. परिवर्तनची निर्मिती असलेल्या या कार्यक्रमाला महाराष्ट्रभर मागणी आहे.

कृषीधनाने महोत्सवाचे उद्‌घाटन

कृषी परंपरेशी भवरलाल जैन यांचं अतुट नातं होतं. आणि याच कृषीजनसंस्कृतीमधील वस्तूंना हाती घेत भाऊंना भावांजली महोत्सवाचं उद्‌घाटन करण्यात आलं. यात कापुस, केळीचे खांब व घड, धान्याचे कणीस, पांभरी, कुदळ, पावडी, विळा हे कृषीधन मान्यवरांच्या हाती देऊन या धनाला वंदन करून महोत्सवाचे उद्‌घाटन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात बुद्धभूषण मोरे यांनी भवानी आईचा गोंधळ सादर करून करण्यात आले. महोत्सवाला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद होता. जागे अभावी अनेकांना परत जावे लागले.घरातून मळ्याकडे ही बहिणाबाईंची कवीता म्हणजे जळगाव शहराचा इतिहास आहे. बहिणाबाई जुन्या जळगावातील चौधरीवाडा येथे राहत होत्या. ममुराबाद रोडवरती त्यांचं शेत होत. बहिणाबाई या रोज शेतात जायच्या. या प्रवासाचं वर्णन म्हणजे ही कविता आहे. पण केवळ हे वर्णन नाही किंवा निर्जीव गोष्टींचं चित्र नाही तर आपल्या आसपासच्या भवताल हा आपल्या जगण्याप्रती कसा परिणाम करतो याचं अत्यंत वस्तूनिष्ट चित्रण या कवितेत आहे. पण या सोबतच कवी जगाकडे कसं बघतो सामान्य माणसाला दिसणारं जग आणि कविला दिसणारं जग यात नेमका काय फरक आहे. कवी श्रेष्ठ का असतो याचं दर्शन या कवितेत होतं. उदा.

**छापीसनं होतो कोरा कागद शहाणा**
**माणसापरि माणूस राहतो येडा-जाणा**

नाना फडणवीस यांचा छापखाना रस्त्यात होता, या छापखान्यात काव्यरत्नावली हे कवितेला वाहिलेलं मराठीतलं पहिले मासिक छापले जात होते. या छापखान्याचे वर्णन करताना बहिणाबाई छापून निर्जीव कागद शहाणा होतो पण माणूस मात्र कितीही शिकला सवरला तरी मुर्खपणा करतोच. कागदाचे प्रतिक वापरून, छापखान्याची प्रतिमा वापरून माणसाचं संपूर्ण दर्शन घडविणाऱ्या बहिणाबाईंची प्रतिभा आपल्याला धक्क करते. दहा शब्दात केवढा मोठा आशय व्यक्त करण्याची लोक विलक्षण प्रतिभा या कवियत्रिमध्ये आहे म्हणूनच बहिणाबाई ही सर्वकालीन थोर कवियत्रि आहे. कृषिजनपरंपरासंस्कृतीची अखेरची कवियत्रि जिला लोक परंपरा व आधुनिकता याची सांगड घालता आली म्हणूनच तिची कवीता कालातीत होऊन आजही सर्व रसिकांच्या मनात आहे. जुनं जळगाव हे जळगाव शहराच्या इतिहासाचं ते केंद्र आहे. या जुन्या गावाची कविता ज्याला जूनं गाव आंतरबाह्य माहिती आहे, जो माणूस जुन्या जळगावमध्ये राहीला आहे असाच माणूस ही कविता उलगडून सांगू शकतो व समजवूही शकतो हे काम शंभू पाटील यांनी फार समर्थपणे केले. त्यामुळे जळगावचा जुना इतिहास आजच्या जळगावकरांना उलगडला.

**लेखन - होरीलसिंग राजपूत**

# बुधवार दि. १५ डिसेंबर, चौथा दिवस

# पर्ल्स ऑफ बॉलीवूड

## कथ्थक नृत्य-सादरकर्ते प्रभाकर कला अकादमी

जळगावचं नाव ज्यांच्यामुळे जगभर सुप्रसिद्ध झालं ते। म्हणजे आमचे आदरणीय मोठे भाऊ पद्मश्री भवरलालजी जैन. दरवर्षी भाऊंसाठी होणा-या "भावांजली" ह्या कार्यक्रमात मला सहभागी होण्याची संधी मिळते ही माझ्यासाठी, माझ्या मूलींसाठी आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे.

१५ डिसेंबर २०२१ रोजी झालेल्या ह्या कार्यक्रमात प्रभाकर कला संगीत अकॅडमी ने १९५१ ते २०१८ पर्यंत च्या काही निवडक सिनेगीतांवर कथक शैलीत नृत्य प्रस्तुत केलेत. त्यात काही प्रयोगात्मक प्रस्तुती सुध्दा होत्या. जसं की १९५१ मधे प्रदर्शित झालेला 'बाजी 'चित्रपटातील" तदबीर से बिगडी हुई तकदीर बना ले" हे पाश्चात्य संगीतावर आधारित गीत, १९५८ च्या 'हावडा ब्रिज' ह्या चित्रपटातील "आईये मेहेरबान" हे क्लब सॉन्ग ह्या वर कथक शैलीत नृत्य प्रस्तुत केले, तसेच १९६८ ला प्रदर्शित झालेला 'किस्मत' चित्रपटातील क्लब सॉन्ग " आओ हुजुर तुमको " ह्यावर कथक शैली आणि मूजरा शैलीत नृत्य सादर केले. कैलाश खेर यांनी गायलेल्या सूफी गीतावर कथक शैलीत नृत्य सादर केले. ह्या प्रयोगात्मक नृत्यासोबतंच पारंपरिक कथक शैली वर आधारित नृत्य सादर केलेत.

कार्यक्रमाची सुरवात परंपरेनुसार गणेश वंदनेने केली,तसेच नटराजाचे रूप असलेल्या शिवाचे वंदन केले, कथक शैलीचे अतिप्रिय दैवत कृष्णाच्या गीतांवर नृत्य सादर केले आणि कार्यक्रमाचे समापन सुप्रसिद्ध मराठी चित्रपट ' बालगंधर्व' ह्यातील “परवरदीगार” ह्या अतिशय सुंदर आणि भक्तिरसपूर्ण गीतावर केला...

सहभागी विद्यार्थिनी....कोमल चौहान, हिमानी पिले, दिशा ढगे, रिध्दी जैन, दीपिका पैसास, आकांक्षा शिरसाटे, मधूरा इंगळे, आनंदी याज्ञिक, समृद्धी पाटील, जान्हवी पाटील, संस्कृती गवळे.

संजिवनी फाऊंडेशन संचलित परिवर्तन आयोजित भावांजली परिवर्तन कला महोत्सवाच्या सहाव्या दिवशी ‘दास्तान -ए-बडी- बांका’ याचे सादरीकरण झाले. उर्दू व हिंदीमधील पुरातन असा गोष्टी सांगण्याचा हा कलाप्रकार खुप प्रसिद्ध होता. एक किंवा दोन कलावंतांनी बैठक मारून दस्तान ए गोई सादर करण्याची ही कला खूपच प्रसिद्ध होती. एकदा बैठक मारली की गोष्ट संपेपर्यंत उठायचं नाही. बैठक मारून गोष्ट सांगायची व प्रेक्षकांना धरून ठेवायचं याला किती सामर्थ्य लागत असेल.पण असे सामर्थ्यवान अनेक लोक होते. या नव्या काळात ही परंपरा नष्ट झाली. पण हीच परंपरा धरून नाटकात आणून तीच स्मरण तर केलंच. पण मराठीत ही परंपरा आणून अक्षय शिंपी व धनश्री खांडेकर यांनी एक नवा फॉर्म मराठी नाटकाला दिला आहे. भावांजली महोत्सवात ‘दास्तान -ए-बडी- बांका’ चे सादरीकरण केले.





दोन तास चाललेल्या या नाटकाने प्रेक्षकांना आपलंस केलं. सहज सोपं पण प्रवाही सादरीकरण व तितकंच आशयगर्भ होतं. मुंबईच्या गमती व किस्से यातून वेगळ्याच पण अनोख्या मुंबईचं दर्शन या कलावंतांनी घडवलं. मुंबई ही जशी मराठी माणसाची तशी देशाची असून विविध भाषा, बोली माणसांचे गुण अवगुण अनेक उदाहरणातून आपल्या कायिक व वाचिक अभिनयातून कलावंतांनी हुबेहुब चित्र उभे केले. लोकलमधील गोष्टी, मुंबईचा इतिहास व तिच्या बदलत्या स्वरूपाने हसता हसता प्रत्येक प्रेक्षकाला अंतर्मुख व्हायला लावणारा हा नाट्य प्रयोग होता. या दोन्ही कलावंताच्या अभिनय सामर्थ्याचा परिचय रसिकांना झाला . प्रचंड ऊर्जा, भाषिक पकड, उच्चार कौशल्य, कायिक अभिनय व नैसर्गिक अभिनय कौशल्य, अभिनयामधील सहजता, या सगळ्यांचा इतका सुंदर मिलाफ यांच्या अभिनयात आहे की बघून थक्क व्हावं. इतर कोणत्याही अवडंबराची गरजच मग उरत नाही. उपलब्ध बैठक व्यवस्था, समोर पाणी पिण्याचे भांडे, उपलब्ध प्रकाशयोजना बस या पलीकडे काहीही नाही. या दोन अभिनेत्याचा अभिनय हीच मग शिल्लक उरते. ती इतकी परिपूर्ण की या अनुभवाचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा इतकं हे सुंदर आहे . अक्षय शिंपी हा मुळातच कवी आहे . समकालीन जगण्याची सगळी तगमग त्याच्या कवितेमध्ये प्रकट होते. नव्या पिढीचा महत्वाचा कवी असा त्याचा नावलौकिक आहे. या मुळेच कवितेचा अत्यंत चपखल वापर हे या नाटकाच बलस्थान आहे. त्याला अतिशय उत्तम साथ धनश्री खांडेकर हिने दिली. हा प्रयोग प्रायोगिक रंगभूमीवरील महत्वाचा प्रयोग आहे हे नक्कीच. परिवर्तनने भावांजली महोत्सवात याचे आयोजन करून जळगावकरांना अतिशय उत्तम नाटक पहायची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दलच्या भावना अनेक रसिकांनी व्यक्त केल्या. कार्यक्रमासाठी सुनील पाटील, पुष्पा भंडारी, शिरिष बर्वे, रंगकर्मी अनिल कोष्टी, अनिल पाटील हे अतिथी होते. प्रास्ताविक महोत्सव प्रमुख किरण बच्छाव यांनी केले. तर अनिल कांकरिया, अमर कुकरेजा, या महोत्सव प्रमुखांची उपस्थित होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रतिक्षा कल्पराज यांनी केले.

**- लेखन : अपर्णा भट**



# गुरूवार दि. १६ डिसेंबर, पाचवा दिवस

## भिजकी वही

### अरूण कोलटकरांच्या कवितेचं सादरीकरण

मराठी व इंग्रजीतील जगप्रसिद्ध कवी अरूण कोल्हटकर यांच्या भिजकी वही या प्रसिद्ध कविता संग्रहातील कवितांचे नाट्यात्मक सादरीकरण परिवर्तनच्या कलावंतानी भावांजली महोत्सवात केले. जगभरातील आदिम काळापासूनच्या महिलांच्या वेदनांची कविता असलेल्या हा संग्रह अतिशय वेगळा व कठीण समजला जातो. परिवर्तनच्या दिग्दर्शक पुरुषोत्तम चौधरी यांनी आपल्या दिग्दर्शकीय कौशल्यातून या कवितांचे नाट्यात्मक सादरीकरण अतिशय प्रवाहीपणे परिवर्तनच्या कलावंतांकडून करवून घेतले तसेच या नाट्यरुपांतराची संकल्पना नीलिमा जैन आणि निर्मिती प्रमुख वसंत गायकवाड आणि भाऊसाहेब पाटील यांची होती. या प्रसंगी काळानुसारची पुरक वेशभूषा व रंगभूषा, देखणे नेपथ्य, अतिशय समर्पक प्रकाशयोजना या वैशिष्ट्यांनी हा प्रयोग रसिकांना अंतर्मुख करून गेला. महिलांचे दुःख हे जागतिक आहे. जगातील अनेक अशा कर्तृत्वान महिला आहेत त्यांची कविता नाट्यरूपाने रंगमंचावर आली. त्यात 'टिपं' - जयश्री पाटील, यांनी ही कठीण कविता अत्यंत समरसपणे सादर केली. त्यांचा रंगमंचावरील वावर व आत्मविश्वास एखाद्या कसलेल्या अभिनेत्री सारखा होता.

'अपाला' - हर्षदा कोल्हटकर यांनी आपल्या गोड स्वरात सुंदर सादर केली. खरतर आपाला आपल्या वैदिक काळातील प्रसिद्ध विदुषी. तिची व्यथा व कथा अनेकांना माहितपण नाही. आत्रेय ऋषी यांची मुलगी केवळ त्वचारोगाने नाकारली जाते. मुलीचं दुःख बापाला कळतच नाही. हे सगळं ज्या पद्धतीने हर्षदा कोल्हटकर यांनी मांडल ते खूपच सुंदर होत. याला जोड होती ती हर्षल पाटील यांच्या ओघवत्या निवेदनाची. संपूर्ण कविता अगदी सहजपणे उलगडून सांगत या कवितेचा गाभा आपल्या सुंदर आवाजात हर्षल पाटील यांनी उलगडून सांगितला.

'मेरी' - अंजली पाटील या नखशिखांत मदर मेरी वाटत होत्या. मदर मेरिच दुःख हे फक्त मदर मेरिच दुःख उरत नाही तर ते जगातल्या समस्त आयांच दुःख आहे. त्या दुःखाच्या तीव्रतेची अनुभूती आपल्या स्वरामधून, आपल्या अभिनयामधून अतिशय उत्कटपणे सादर करणाऱ्या अंजली पाटील यांनी रसिकांना अंतर्मुख केले. त्या मेरीची भूमिका करत नव्हत्या तर मेरीची भूमिका जगत होत्या .त्यांना निवेदनामधून साथ केली ती नारायण बाविस्कर यांच्या अभ्यासपूर्ण व सखोल निवेदनामधून.ख्रिस्त,



ज्यू यांच्या एकूण धार्मिक इतिहासामधून मेरीच्या वाट्याला आलेली उपेक्षा हे सगळं सांगून मेरीची व्यथा उलगडून दाखवली.

'हिपेशिया' - प्रतिक्षा कल्पराज अलेक्झांड्रीया शहरातील ही गणितज्ञ, तत्वज्ञान या विषयातील विदुषी व तत्कालीक धर्मवेडे यांचा संघर्ष आपल्या उत्स्फूर्त अभिनयशैलीने सादर करत प्रतीक्षाने मैफल जिंकली. हा संपूर्ण व्यापक पट उलगडून दाखवायला गणिताचे प्राध्यापक मनोज पाटील सर यांच निवेदन म्हणजे गणित व तत्वज्ञान यांचा अनोखा मिलाफ होता. ५ व्या शतकातील हे कथानक आजही कस समकालीन आहे याचा अनुभव रसिकांना प्रतीक्षा कल्पराज व प्रा मनोज पाटील यांनी दिला.

'रबिया' - सुदिप्ता सरकार

रबिया ही सुफी संत. तिची भक्ती व अल्ला ने घेतलेली परीक्षा याची ही कविता. बंगाली असलेल्या सुदिप्ता सरकार यांनी मराठी मधून खूपच सुंदर सादर केली. मुळात अवघड असलेली ही कविता त्यांनी ज्या सहजतेने सादर केली या मधून सुदिप्ता सरकार यांच्या अभिनय व भाषिक सामर्थ्याचा प्रत्यय रसिकांना आला. ह्या कवितेची पार्श्वभूमी व इतिहास व कवितेचं सौंदर्य हे मंगेश कुळकर्णी यांनी अत्यन्त अभ्यासपूर्ण उलगडून दाखवलं. या मुळेच रबिया संपूर्ण कळली.

'मजनू' - राहूल निंबाळकर

लैला मजनू हे मानवी इतिहासातील गाजलेलं प्रेमप्रकरण आहे. ही कल्पित कथा असली तरी ती खरी वाटावी इतकी ती जनमानसात रुजली आहे. या कथेचा कोल्हटकर जो वेध घेतात व त्याला प्रेमाचा जो आयाम देतात. हे आव्हान पेलून मजनू सादर करणारे राहुल निंबाळकर ह्यांनी आपल्या अभिनय सामर्थ्याच दर्शन या कवितेमधून दाखवलं. निवेदक व मजनू अश्या वेगवेगळ्या भूमिका मधून स्वर व अभिनय या मधून ही कविता त्यांनी सादर केली. मोना निंबाळकर यांनी ही कथा व कवितेचा सार यांची सांगड घालत खुमासदार निवेदनामधून ही कविता सोपी करून उलगडून दाखवली. मंचावर एक शब्दपण न उच्चारता केवळ आपल्या डोळ्यांमधून व अभिनयामधून क्रूर पुरुषी मानसिकतेच दर्शन घडवणारा मिलिंद जंगम लक्ष वेधून घेत होता.

'लैला' - सोनाली पाटील - मजनू या कवितेचा उत्तरार्ध म्हणजे लैला, लैला नेमकी कशी, लैला म्हणजे नेमकं काय अशी ही कविता सोनाली पाटील यांनी लैला बनून झोकात सादर केली. लैलेच्या मनातला कल्लोळ आपल्या स्वरामधून व्यक्त करत सोनाली पाटील यांनी सुरेखपणे लैला सादर केली. शंभु पाटील यांच बहारदार निवेदन आनंद देणारे होते.

'मैमुन' - मंजुषा भिडे या संग्रहातील कविता या वैदिक, पुराण, वा हजारो वर्षापूर्वी असलेल्या स्त्रियांच्या होत्या . पण मैमून ही समकालीन मुलगी, हरियाणा मधील नुह जिल्ह्यातील सुदक या गावच्या मैमूनच्या कहाणीने संपूर्ण नाट्यगृह हादरून गेले होते. कोल्हटकर यांची कविता व मंजुषा भिडे या कसलेल्या अभिनेत्रीच अतिशय जबरदस्त सादरीकरण यामुळे मैमूनचा दाहक अनुभव अस्वस्थ करणारा होता. मंजुषा भिडे यांच्या धारदार आवाजाला जेव्हा भावनांची किनार आली तेव्हा सगळ्यांच्याच डोळ्यांच्या कडा पाणावल्या होत्या. स्त्रियांच्या या आदिम दुःखाला कवितेत मांडणाऱ्या कवीला रंगमंचावर आणण्याच धाडस परिवर्तन जळगावने दाखवलं हीच परिवर्तनची प्रयोगशीलता आहे. या अफाट दुःखाला आजची स्त्री कस बघते व भविष्य कस बघते ह्याच दर्शन जयश्री पाटील यांनी अत्यंत आत्मविश्वासाने सादर केलं. या आशावादा मधून हे नाट्यमय सादरीकरण संपन्न झाले. कार्यक्रमासाठी अशोकभाऊ जैन, आनंद मल्हारा, ॲड. जमील देशपांडे, सुहास वेलणकर, अनंत जोशी, प्रा. किशोर पवार, अशोक कोतवाल, संदीप देवरे, दिलीप तिवारी हे प्रमुख अतिथी होते. सुत्रसंचलन ज्ञानेश्वर शेंडे यांनी केले.

**लेखन - डॉ. किशोर पवार**



# शुक्रवार दि. १७ डिसेंबर, सहावा दिवस

## दास्तान-ए-बडी बांका

### सादरकर्ते-धनश्री खंडकर आणि अक्षय शिंपी



भाऊंना भावांजली परिवर्तन महोत्सवाचा पाचवा दिवस कथ्थक नृत्याने संपन्न झाला. संजिवनी फाऊंडेशन संचलित परिवर्तन संस्थेतर्फे श्रद्धेय भवरलाल जैन यांना आदरांजली वाहणारा महोत्सव भाऊंच्या उद्यानात सुरू आहे. विविध कलांचा समावेश हे या महोत्सवाचे वैशिष्ट्य आहे. नाटक, नृत्य, संगीत, चित्रकला, साहित्य अशा विविध कलाप्रकारानी हा महोत्सव साजरा होतो. विशेष म्हणजे स्थानिक कलावंत या महोत्सवात आपली कला सादर करतात. जुन्या जाणत्या कलावंतासह नवे कलावंत देखील या महोत्सवात सामील होतात. या मुळेच हा महोत्सव केवळ मनोरंजन या विषयापुरता मर्यादित न राहता, कलावंतांची नवी पिढी घडवण्याचं काम देखील या महोत्सवामधून होत. हे या महोत्सवाचे आणखी एक वैशिष्ठ आहे. गेल्या पाच वर्षांपासून सुरू असलेल्या या महोत्सवात अपर्णा भट व त्यांची प्रभाकर कला अकादमी दरवर्षी वेगवेगळ्या नृत्याचे कार्यक्रम सादर करतात. शास्त्रीय नृत्या सोबतच समकालीन नृत्य ते पण कथ्थक शैलीत विविध प्रयोग करून सादर कृतज्ञता. या वर्षी देखील प्रभाकर कला अकादमीच्या विद्यार्थीनीनी पर्ल्स ऑफ बॉलिवुड सादर केला. प्रसिद्ध कथ्थक नृत्यांगणा अपर्णा भट यांच्या मार्गदर्शनाखाली कथ्थक शास्त्रीय नृत्याचे प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थीनी बॉलिवुडमधील १९५७ ते २०१८ या काळातील चित्रपट गीतांवर कथ्थकचे सादरीकरण केले. यात प्रामुख्याने 'हे गजवज महाकाय वक्रतुंड' या गणरायाला वंदन करून कथ्थक नृत्यास सूरवात झाली. नमो नमो शंकरा, महो रंगदो लाल नंद, ना मानोगे तो, फिर भोर भयी, परवरदीगार, या सोबतच हिंदी सिनेमाची अवीट गोडी असलेली आओ हुजूर तुमको सितारोमे ले चलू... आई ये मेहरबा, राधा ढुंढ रही या गाण्यावर नृत्य सादर केली. ही गाणी केवळ श्रवणीय नाहीत तर देखणी पण आहेत याचा प्रत्यय या नृत्यांगनानी दिला. कथ्थक या नृत्याची नजाकत, त्यातला पदन्यास या सोबतच अनुरूप असे हावभाव या मुळे उच्च दर्जाच्या नृत्यानुभव रसिकांना येत होता. समृद्धी पाटील, संस्कृती गवळे, आनंदी याज्ञीक, जान्हवी पाटील, पुर्वा कुलकर्णी, श्रावणी अर्णीकार, भाग्यश्री पाटील, मधुरा इंगळे, आकांक्षा शिरसाठे,

रिद्धी जैन, दिपीका घैसास, दिशा ढगे, हिमानी पिले, कोमल चव्हाण यांनी नृत्यात सहभाग घेतला. अतिशय सुंदर असा कार्यक्रम कायम स्मरणात राहील असा होता. याप्रसंगी राष्ट्रवादी व कृषितीर्थ मासिकाचे संपादक डॉ. सुधीर भोंगळे, माजी नगरसेविका अश्विनी देशमुख, डॉ रवी महाजन, नंदू अडवाणी हे प्रमुख अतिथी होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महोत्सव प्रमुख अनिल कांकरिया यांनी केले. तर सुत्रसंचालन हर्षदा कोल्हटकर यांनी केले. प्रेक्षकांच्या उदंड प्रतिसादात परिवर्तनचे कार्यक्रम सुरू आहे. आजही अनेकांना जागेअभावी निराश होत परत जावे लागले.

**लेखन - राहुल निंबाळकर**

# शनिवार दि. १८ डिसेंबर, सातवा दिवस


## अहिराणी विनोदी कथाकथन - तुन्ह मन्हं तोंड शे

### सादरकर्ते : प्रा. योगीता पाटील, प्रवीण माळी

संजिवनी फाऊंडेशन संचलित परिवर्तन आयोजित 'भावांजली महोत्सवात' सातव्या दिवशी अहिराणी बोलीतील सादरीकरणाने रसिकांना पोट धरून हसवले. धुळे येथील प्रा योगिता पाटील यांनी 'तुन्ह मन्हचं तोंड शे' हे कथाकथन सादर केले. रोजच्या जगण्यातील छोट्या छोट्या गोष्टींतून त्यांनी माणसांच्या स्वभावाचे चित्रण अचुक उभे केले. या कथाकथनाला विनोदासोबत प्रेक्षकांना भावगंभीर करत विचार करायला लावले. अतिशय सुरेख पद्धतीने योगिता पाटील यांनी हे कथाकथन सादर केले. आपल्या परंपरा, या मधून स्त्रियांच होणार शोषण, अंधश्रद्धा या मधून होणार नुकसान या सगळ्याचा आढावा सहज अश्या संवाद स्वरूपात उभा करून प्रा योगिता पाटील यांनी मनोरंजन व विचार यांची सांगड मोठ्या खुमासदार पध्दतीने घातली. स्टॅण्डअप कॉमेडी वा कथाकथन वा एकपात्री अश्या अनेक फॉर्मचा उपयोग करत त्यांनी एकट्याने तासभर प्रेक्षकांना खीळऊन ठेवले.



यानंतर 'आयतं पोयतं सख्यानं' या अहिराणी बोली भाषेतील धमाल विनोद एकपात्री प्रयोग रसिकांना पोट धरून हसवले. खान्देशातील विविध भागात बोलल्या जाणाऱ्या या भाषेतील गमती जमती, आपल्या बोलीभाषेविषयीचा लोकांच्या मनातील न्युनगंड यावर प्रकाश टाकत बोलीभाषेचा अभिमान बाळगा. मराठी सोबत अहिराणी जगली तरच मराठीही जगू शकते हे त्यांनी पटवून दिले. खान्देशासह महाराष्ट्रभर गाजलेला हा नाट्यप्रयोग अभिनेते प्रविण माळी यांनी सादर केला. लग्नातील गमती जमती, सुख दुःखाचे प्रसंग रंगवताना त्यांनी आवाजातील बदलांनी संपूर्ण खान्देशाचं दर्शन घडवलं. उद्यानातील वेळ संपली पण तरी प्रेक्षक जागा सोडत नव्हते. दीड तास सलग हा प्रयोग सुरू होता. वेळ संपली होती पण प्रेक्षकांना उठावस वाटत नव्हतं. यात सगळं आलं. ही किमया होती प्रवीण माळी नावाच्या सामर्थ्यशाली अभिनेत्याची. परिवर्तनच्या भावांजली महोत्सवातील अहिराणी कथाकथन व एकपात्री प्रयोग पहायला प्रेक्षकांनी गर्दी केली होती. कार्यक्रमाला ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित भालचंद्र नेमाडे, चंद्रकांत सुर्यवंशी, विनोद देशमुख, जेष्ठ पत्रकार हेमंत अलोने प्रमुख अतिथी होते. याप्रसंगी महोत्सव प्रमुख अनिल कांकरिया, अनिष शहा, किरण बच्छाव, अमर कुकरेजा, नारायण बाविस्कर, छबिराज राणे उपस्थित होते. सुत्रसंचालन मनोज पाटील यांनी केले.



**लेखन - ऊर्जा सपकाळे**

# रविवार दि. १९ डिसेंबर, आठवा दिवस

## गज़ल: रेगिस्तान से हिंदुस्थान



परिवर्तन संस्थेच्या 'भाऊंना भावांजली' च्या पाचव्या वर्षीच्या महोत्सवाचा समारोप "गज़ल रेगिस्तान से हिंदुस्थान तक" या कार्यक्रमाने झाला. या कार्यक्रमात श्रोते तल्लीन झाले. कार्यक्रमात अमर भाई कुकरेजा परिवर्तनाच्या कार्याचा गौरव करतांना सांस्कृतिक क्षेत्रात परिवर्तन उत्तम काम करत असून जळगावचे सांस्कृतिक चेहरा बदलताना बघतोय. लहान मुलांपासून मोठ्या माणसांपर्यंत सगळ्यांच्या आवडीचे दर्जेदार कार्यक्रम परिवर्तन करत असते त्याचा मी साक्षीदार आहे असे मत खास सिंधी भाषेत व्यक्त केलं. परिवर्तन जळगाव शहरातील नागरिकांची सांस्कृतिक भूक भागवण्यासाठी चांगल्या कार्यक्रमांची निर्मिती करत असून या कार्यक्रमांद्वारे आपल्या शहराचं सांस्कृतिक वातावरण समृद्ध होतंय हे आजही सिद्ध झाले आहे असे मत नारायण बाविस्कर ह्यांनी खास मारवाडी भाषेत व्यक्त केले. तर लीना निंबाळकर ह्यांनी पावरी भाषेत सर्वांचे आभार मानलेत. चित्रकार राजू बाविस्कर, विकास मल्हारा आणि विजय जैन यांना कलाक्षेत्रातील ललित कला अकादमी दिल्लीच कायमच सदस्यत्व सन्मानाने देण्यात आलं या बद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. उत्तम कामगिरीबद्दल त्यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी जैन उद्योग समूहाचे उपाध्यक्ष अतुल जैन, उद्योजक साजिदभाई शेख, सुचेता पाटील, डॉ. अमोल सेठ, प्राचार्य डॉ. एल पी देशमुख, अनिल शहा, परिवर्तनचे कार्याध्यक्ष नारायण बाविस्कर आदी उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर परिवर्तन निर्मित 'गजल रेगिस्तान से हिंदुस्तान तक' या कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. गझल हा आता मराठीत सुध्दा रुजलेला काव्यप्रकार आहे. गझलचा उगम जो अरबस्ताना मध्ये झाला असला तरी तो रुजला तो हिंदुस्थानात. हा जो गझलचा हजार वर्षाचा इतिहास आहे तो पूर्ण उलगडत हा गझल प्रवास रेगिस्थान पासून हिंदुस्थाना मध्ये स्थिरावला. शंभु पाटील यांच निवेदन नेहमीच जबरदस्त असत. ते बोलतात ते ऐकत राहावंसं वाटत, हा माणूस बोलतो तेव्हा प्रत्येक उपस्थिताला ते आपल्या सोबत बोलता आहेत असं वाटत. हे बोलणं नसत तर ते प्रत्येकासोबत केलेलं हितगुज असत. या मुळेच हे निवेदन म्हणजे पारंपरिक रीतीने केलेलं निवेदन नाही. एक स्वतंत्र निवेदनाची शैली शंभु पाटील यांनी विकसित केली आहे. भाषेवर असलेलं प्रभुत्व हे आणखी एक वैशिष्ट्य, अत्यंत सुंदर मराठी, त्यात ओघवत्या शैलीत बोलीभाषा असते. त्या मुळे सहजता असतेच पण संवाद सुद्धा असतो. ऐकणारा रसिक मंत्रमुग्ध होऊन हे ऐकत असतो. गझल मध्ये तर मराठी, हिंदी व सोबत उर्दू या भाषाचा वापर करताना या भाषांवर पण त्याचं किती



*शंभू पाटील निवेदन करताना*

प्रभुत्व आहे, हे नव्याने लक्षात आलं. गालिब सारखा अवघड शायर तो पण इतक्या सहजतेने उलगडून सांगणं हे फक्त शंभु पाटीलच करू शकतात. हा माणूस कार्यक्रमाला एका वेगळ्याच उंचीवर घेऊन जातो. एक दर्जेदार कार्यक्रमाचा विलक्षण सुंदर अनुभव या गझलच्या कार्यक्रमात आला. किती शायर व किती शेर या माणसाच्या स्मरणात आहेत हे बघून थक्क व्हायला होतं. त्या शायरांची शायरी, त्यांचे किस्से, त्याचा इतिहास व त्याच सौंदर्यशास्त्र अस उलगडून दाखवतात की जणू उर्दू शायरी हा माणूस अक्षरशः जगला आहे. केवळ जळगाव मध्ये आहेत म्हणून आपल्याला ते ऐकायला मिळतात. अन्यथा हा माणूस खरच खूप मोठा आहे.

परिवर्तनची संगीताची टीम हे देखील आता परिवर्तनच वैशिष्ट्य आहे. अत्यंत दर्जेदार मंडळी जी कमालीच्या तयारीची आहेत. हे जळगावच्या संगीत क्षेत्रातील मानाच पान आहे. व्यावसायिक सफाई असलेली टीम जळगावच नाव आता सर्वत्र मोठं करत आहेत. अन्यथा बाहेरून येऊन कार्यक्रम सादर करणारे अशीच परंपरा असलेल्या जळगाव मधील कलावंत आता बाहेर जाऊन व्यावसायिक कार्यक्रम करतात. हे मोठं परिवर्तन आहे. श्रद्धा कुलकर्णी ही अतिशय गुणी व प्रतिभासंपन्न गोड गळ्याची गायिका आहे. बहिणाबाई असेल, अभंग असतील कोणत्याही गायन प्रकारात अगदी सहजपणे गाणाऱ्या श्रद्धा यांनी गझल हा प्रकार तर खूपच सुंदर सादर केला. अमीर खुसरो यांचे छाप तिलक सब छिनी ही सुफी शैलीतील गझल अगदी सुफी असल्या सारखी गायली. तर इतर अनेक गझल त्यातल्या अर्थछटां सह व त्यातले बारकावे, त्यातल्या अवघड तान हे सगळं अत्यंत ताकतीने सादर केलं. अक्षय गजभिये हे शास्त्रीय संगीताची साधना करणारे गुणी कलावंत आहेत. त्यांना ऐकतांना प्रत्यक्ष गुलाम अलीं ना ऐकतो आहोत असा भास होतो. पूर्ण तयारी असलेला हा कलावंत गळ्याने जितका सुंदर गातो. तितक्याच ताकदीने त्यांची हार्मोनियम देखील गाते. हार्मोनियम वर जबरदस्त पकड व स्वरांवर असलेली हुकूमत यामुळे त्यांची गझल ऐकण हा सुंदर अनुभव आहे. हर्षदा कोल्हटकर या नवख्या पण गुणी गायिकेने आपल्या स्वरांनी सगळ्यांची मन जिंकली.

तर तबल्यावर साथ-संगत भूषण गुरव यांनी केली होती. तबल्यावर भूषण यांची बोट अक्षरशः नृत्य करतात. सुरांची उत्तम समज व तालाचा रियाज या मुळेच त्यांचा तबला साथसंगत तर करतोच पण कार्यक्रमला एक दर्जा प्राप्त करून देतो.

बुद्धभूषण मोरे यांनी स्वरांचा भरणा केला. या कार्यक्रमात आदिम काळापासून उर्दू, हिंदी, मराठी गझलेचा इतिहास, प्रवास मांडण्यात आला. सुन्या सुन्या मैफिलीत माझ्या, मालवून टाक दीप, दिले नादान तुझे हुवा क्या, सिमटी हुई ये घडीयॉं, फिर छेडे रात, ए दिल या गझल सादर झाल्या. यात गालिब, सुरेश भट, साहिर लुधियानवी यांच्या गझलांचा समावेश होता. २ तास सलग कार्यक्रम सुरू होता. पण तरी मन भरले नाही. अजून काहीतरी हवे अशी अतृप्तीची भावना मनात होती. निदा फाजली यांच्या पासून सुरू झालेला हा कार्यक्रम निदा फाजली यांच्या नज्म संपन्न करत. फैज अहमद फैज यांच्या आपकी याद आती रही रातभर या गझलला श्रद्धा कुळकर्णी यांनी अशा आर्त स्वरात गायली की ते स्वर मनात भरून राहिले. कार्यक्रमाचे दिग्दर्शन नारायण बाविस्कर यांचे होते. तर संकल्पना गझलकार दिलीप पांढरपट्टे यांची होती.तर निर्मिती प्रमुख विनोद पाटील व मंगेश कुलकर्णी होते.

समारोपाच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंजुषा भिडे यांनी केलं तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनिता दप्तरी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी राहूल निंबाळकर, अक्षय नेहे, प्रतिक्षा, ऊर्जा सपकाळे, सिद्धी सिशोदे, मिलिंद जंगम, वसंत गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.

**लेखन - राजू बाविस्कर**



*भाऊंच्या उद्यानातील ॲम्फी थिएटर मध्ये झालेल्या कार्यक्रमांना रोज अशी भरगच्च गर्दी होत असे.*

## कृषिभक्ती भाऊंची

जन्मतःच लाभली ही
दुर्दम्य इच्छाशक्ती।
हृदयात प्रगटली
शेतीवरती भक्ती ॥१॥

कर्मयोग्याचा हात फिरता
डोंगरमाथा हसला।
निष्ठेचा हा घाम गाळूनी
माळरान फुलला ॥२॥

शेतीवरती मन लावले (जडले)
नंदनवन ते झाले।
देशविदेशात आपुले
नावरूपाला आले ॥३॥

जलदेवता प्रसन्न करूनी
अभिषेक केला।
वनराईच्या आनंदाला
कसा बहर आला ॥४॥

शेती माऊलीचे वैभव
पाहून मन थक्क होते।
कर्मयोग्याचे कर्म पाहूनी
नत मस्तक होते ॥५॥

शेती माऊलीचे आशीर्वाद
हे वरदान झाले।
मोठे भाऊ यामुळे
'कृषिभक्त' झाले ॥६॥

*- चिमणबापू ठाकरे*



## भरारी

शून्यातून झेप घेतली उत्तुंग ध्येयासाठी,
झेप घेताना संकटे आली सामोरे जाण्यासाठी.
संकटावरती मात केली ध्येय साधण्यासाठी,
करूनी दृढनिश्चय संकटेही मित्र होण्यासाठी.

सहकाऱ्यांची साथ लाभली भरीव यशासाठी,
यश खेचूनी आणले त्यांनी आपल्या सर्वांसाठी.
भविष्य घडविले प्रेरणेने आपल्याच सहकाऱ्यांसाठी,
असे प्रेरणास्थान लाभले आपणा सर्वांसाठी.

अशी गाठली शिखरे भाऊंनी भूमिपुत्रांसाठी,
आज नाव तयांचे गाजत आहे जगाच्या पाठीवरती.
असे प्रेरणा स्थान राहो सदैव आपल्या सर्वांसाठी,
भाऊंच्या ह्या कठोर परिश्रमांची हीच खरी पावती !

*- अमर पाटील*



जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.®

जैन प्लास्टिक पार्क, रा.म.क्र. ६, पो.बॉ. ७२, जळगाव-४२५००१. (महाराष्ट्र.)
**दूरध्वनी:** ०२५७-२२५८०११; **ई-मेल:** krushitirth@jains.com; संकेतस्थळ: www.jains.com

**मुद्रक, प्रकाशक मनिष अमृतलाल शहा** यांनी जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. जळगाव यांच्यावतीने आनंद पब्लिकेशन, १०६/१/ए, एन. एच. क्र.६, मुसळी फाटा, ता. धरणगाव, जि. जळगाव (महाराष्ट्र) येथून छापून जैन प्लास्टिक पार्क, पोस्ट बॉक्स नं.७२, बांभोरी, जळगाव-४२५००१ येथून अंक प्रकाशित केला आहे.
**संपादक: डॉ. सुधीर जगन्नाथ भोंगळे**; वर्ष: ४; अंक: २ (३३) (फेब्रुवारी २०२२/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.)

Post Regn. No.: JAL/417/2022-2024
Published on 19th of every month, posted on 28th of every month at Jalgaon-425001

RNI NO. MAHMAR/2018/76944

देशाचे उद्याचे भवितव्य,
सुजाण बालकांच्या हाती.
'अनुभूती' च्या संस्कारांनी मिळती
सज्जनशक्तीच्या रितीभाती.
दादाजींच्या शिकवणुकीची
मिळता नामी युक्ती.
विकासाचा गाडा
पळे पुढती पुढती.

अनुभूति
स्कूल
अनुभवाधारित निवासी आंतरराष्ट्रीय विद्यानिकेतन

